# प्रकरण चार

## बांधकाम विभाग

**4.101 पिंपळास दलित वस्ती अंतर्गत पायवाट तयार करणेबाबत.**

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती भिवंडी (बांधकाम विभाग) यांनी सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पिंपळास दलित वस्ती अंतर्गत पायवाट तयार करणे कामी रक्कम रुपये 2,90,000/- इतका खर्च केलेला आहे. सदरबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनाम्यासाठी स्टँप पेपर क्रमांक MW950915, दिनांक 08/03/2016 ला खरेदी केला आहे. परंतू करारनाम्यावर दिनांक नमूद नाही. तसेच करारनाम्यावर ठेकेदार तसेच सहा. अभियंता यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

2) ठेकेदाराची बांधकाम नोंदणी प्रमाणपत्राव्यतिरीक्त कोणतीच कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 107 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 नुसार प्रथम प्रशासकीय मंजुरी घ्यावी व नंतर तांत्रिक मंजुरी घ्यावी असे आदेश असताना व प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक नमूद नसताना तांत्रिक मंजुरी व कामाचे आदेश कशाच्या आधारे दिले. सदर नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

4) विमा संचालनालय यांचे पत्र क्रमांक प्रविवि 2903/सहविमा/जिप/संकीर्ण/अभियंत्रिकी/एम-2, दिनांक 27/06/2003 अन्वये 1 टक्के विमा कपात करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने रक्कम रुपये 1,450/- कमी कपात केलेली आहे. ती वसूल करावी.

5) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 नुसार बांधकामावरील खर्चाच्या 1 टक्के रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसूल करून संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक असताना पंचायत समितीने अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तरी रक्कम रुपये 2,900/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

6) सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक जीआर-34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 नुसार साहित्य वापरण्यापूर्वी त्यांचे शासकीय प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त करून साहित्य वापरणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग, नियमावलीचे ॲपेंडिक्स 24 चे नियम 12 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेली मापे संबंधित ठेकेदारास मंजूर असलेबाबत कंत्राटदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तिकेवर घेतलेली नाही.

8) कामाचे पूर्वीचे व नंतरचे फोटो नाहीत.

9) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/2009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराच्या बिलातून कमी वसूल केलेली आहे. सदर कामासाठी रुपये 2,377/- इतकी कमी कपात केलेली स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) कामाच्या ठिकाणी कामाचा बोर्ड लावलेला नाही. रुपये 1,568/- संबंधित जबाबदार व्यक्तीकडून वसूली करुन सेस फंडात भरणा करावी.

11) सदर काम जयशंकर मजूर कामगार सहकारी संस्था यांना दिले आहे. परंतू प्रत्यक्ष बील जिल्हा परिषद फॉर्म नंबर 58 वर रोहीणी मजूर कामगार सहकारी संस्था यांचे नावे आहे. बिलावर ठेकेदार यांची रक्कम मिळाल्याची पोच नाही.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार कामाची नोंद नमुना क्रमांक 69 मध्ये घेतलेली नाही. तसेच काम पूर्णत्वाचा दाखला नमुना क्रमांक 65 मध्ये देणे आवश्यक असताना तो नमूना क्रमांक 83 मध्ये दिलेला आहे.

**4.102 ग्रामपंचायत चिरनेर कातळपाडा, श्री. नारायण केणी ते मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता तयार करणे.**

**पंचायत समिती उरण, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदर बाबत खर्चाची नस्ती व मोजमाप नोंदवही तपासता प्रमाणक क्रमांक 9, दिनांक 28/12/2015 अन्वये रक्कम रुपये 1,05,269/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुरी आदेशामधील अट क्रमांक 8 प्रमाणे काम सुरु होण्यापूर्वी, चालू असताना व काम पूर्ण झाल्या नंतर स्थिती दर्शविणारे छायाचित्र जोडण्यात यावे. परंतू, अशा प्रकारे छायाचित्रे नस्ती सोबत जोडलेली नाहीत.

2) प्रशासकीय मंजुरी आदेशामधील अट क्रमांक 17 प्रमाणे सदर कामाच्या साहित्याची चाचणी अहवाल प्रधानमंत्री ग्रामसडक योजना प्रयोगशाळा, अलिबाग येथून घेण्यात यावे. परंतु सदर कामांसाठी वापरलेल्या साहित्याची चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडलेली नाही.

3) कामाच्या अनुक्रमणिकेच्या वर्णनातील अनुक्रमांक 1 ते 14 मधील पृष्ठ क्रमांक 3 ते 72 वर ठेकेदार म्हणून सरपंच, ग्रामपंचायत, चिरनेर यांनी स्वाक्षरी केलेली आहे. परंतू, कार्यकारी अभियंता/ उपअभियंता यांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

4) करार पत्रकात काम पूर्ण करण्याची मुदत नमूद केलेली नाही. गटविकास अधिकारी / उपअभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. करार पत्रक कोणत्या तारखेला केले ती तारीख करार पत्रकावर नमूद नाही.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्के कामगार उपकराची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वसुल करणे अनिवार्य होते. परंतू, तसे केलेले नाही. तरी देय रकमेच्या 1 टक्के रक्कम रुपये 1,057/- व्याजासहित वसुल करुन शासनखाती जमा करावी.

6) सदर कामातील बाब क्रमांक 1 मध्ये जास्त केलेल्या बाबीस सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेतलेली नाही.

7) सदर कामावर वापरण्यात आलेल्या सिमेंट खरेदीच्या पावत्या नस्ती सोबत उपलब्ध झाल्या नाहीत. कामावर वापरण्यात आलेले सिमेंट हे चांगल्या प्रतीचे असल्याबाबतचा दाखला लेखापरीक्षणास नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही.

8) शासन परिपत्रक क्रमांक जीपर-2009/प्रक्र/180/पं.रा.8, दिनांक 04/07/2009 नुसार सदर कामाच्या जागेवर कामाची संपूर्ण माहिती, दोषनिवारण कालावधी सहित दर्शविणारा 150 से.मी.X90 से.मी. मापाचा नाम फलक बसविणे बंधनकारक आहे. परंतू, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.103 मौजे ढवळी अंतर्गत रस्त्याला गटार बांधणे.**

**पंचायत समिती खालापूर, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर कामाबाबत प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 2,44,494/- खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि/10/1009/प्र.क्र.309ख, दिनांक 11/02/2010 प्रमाणे गौण खनिज स्वामीत्व धनाची रक्कम रुपये 5,204/- वसूल करावयाचे आहे. प्रत्यक्ष रक्कम रुपये 800/- वसूल केलेली आहे. उर्वरीत रक्कम रूपये 4,404/- संबंधीतकडून वसूल करावे.

2) कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे अट क्रमांक 2 नुसार कामाची मुदत 6 महीने असतांना काम दिनांक 01/03/2016 रोजी पुर्ण झाले आहे. म्हणजेच 6 महीने काम उशीरा पुर्ण करणेंत आले आहे. त्यामुळे अटी शर्तीनुसार ठेकेदार यांचेकडून दंड (विलंब शुल्क) आकारण्यात यावे. दंडाची रक्कम वसूल करून तसे अनुपालन दाखवावे.

3) साहित्य गुणवत्ता चाचणी अहवाल दिनांक 31/03/2016 चे आहेत व काम पुर्ण झाले. दिनांक 01/03/2016 रोजी म्हणजेच काम पुर्ण झाल्यानंतर गुणवत्ता चाचणी अहवाल घेण्यात आले.

4) मोजमाप पुस्तिकामध्ये बाब निहाय शेवटी गोषवारा काढणे आवश्यक आसतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

**4.104 शेलू अंतर्गत गटार बांधणे कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 11/09/2015 अन्वये रक्कम रुपये 1,94,070/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारपत्र विहित मुद्रांकावर करतेवेळी सर्व अटी व शर्ती करारनामा निर्दिष्ट करून करारनामा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. करारपत्र पूर्ण झाले शिवाय कार्यादेश कशाचे आधारे देण्यात आला, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपील/प्र.क्र.1864/53, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असलेबाबत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र दिलेले नाही.

3) महाराष्ट्र बांधकाम नियमावली 296 (ब) नुसार फेब्रुवारी / मार्च मध्ये कामाचे आदेश देऊ नये. तथापि, सदर कामाचे कार्यादेश दिनांक 23/03/2015 रोजी देण्यात आलेले आहेत.

4) कामाची मुदत दिनांक 22/06/2015 पर्यंत असताना काम दिनांक 02/09/2015 रोजी पूर्ण झालेले असून 2 महिने 10 दिवस विलंबाने झालेले असल्याने टेंडर अटी शर्ती क्रमांक 2 व लेखा संहिता 1968 चे नियम 148 (1) अन्वये काम विलंबाने केल्याने कामाचे देयकातून दंडाची रक्कम वसूल केलेली नाही, याचा खुलासा करावा व दंडाची रक्कम संबंधिताकडून वसूल करून दाखवावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (4) मोजमाप नोंदवहीत मोजमापे घेऊन दिनांक नमूद करणे आवश्यक असताना केवळ मोजमाप केल्याच्या नोंदी आहेत. तथापि, दिनांक नमूद केलेला नाही. खुलासा करावा.

6) प्रत्यक्ष कामाचे मुल्यांकन मोजमाप नोंदवहीप्रमाणे रक्कम रुपये 2,46,790/- असताना देयकाची रक्कम रुपये 2,50,000/- घेणेत आलेली असल्याने रुपये 3,210/- चे अतिप्रदान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करून अतिप्रदान रक्कम संबंधीतांकडून वसूल करावी.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग दिनांक 19/08/1998 व विमा संचालनालय दिनांक 30/07/2002 च्या पत्रानुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जीवअ-2000/प्र.क्र.847/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय पत्र क्रमांक प्रविवि 2903/सहविमा/जि.प./संकीर्ण/अभियांत्रिकी/एम-2, दिनांक 27/06/2003 अन्वये काम सुरु करताना कामावर काम करणा-या कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. त्यामुळे 1 टक्के विमा रक्कम वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षाखाली शासनाकडे जमा करावी.

8) मोजमाप नोंदवहीत शेवटी कामावर वापरलेल्या साहित्याचा एकत्रित गोषवारा काढणे आवश्यक असताना गोषवारा का काढण्यात आला नाही, याचा खुलासा करावा.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार कामाची नोंद नमुना नंबर 69 मध्ये घेणेत आलेली नाही.

**4.105 खान नडवली बौध्दवाडी स्मशान चौथरा व परिसर क्राँकीटीकरण.**

**पंचायत समिती रोहा, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 55, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,20,000/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यादेशानुसार सदर काम ही दिनांक 03/03/2016 नंतर सुरु करण्यात आलेले आहे आणि काम दिनांक 20/03/2016 रोजी पूर्ण झाल्याचे मोजमाप नोंदवहीवरुन दिसून येते. सिमेंट कामाकरिता कमीत कमी 21 दिवस पाणी मारणे आवश्यक आसतांना आणि कामाची मुदत दोन महिने असताना सदरचे काम केवळ 16 ते 17 दिवसांत पूर्ण कसे व का करण्यात आले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) काम सुरु होण्यापूर्वी, चालू असताना व कामपूर्ण झाल्यानंतर कामाची स्थिती दर्शविणारे छायाचित्र नस्ती सोबत जोडणे आवश्यक असताना छायाचित्र (फोटो) जोडण्यात आलेले नाही.

3) जागा ग्रामपंचायतीचे / जिल्हा परिष्द मालकीचे असले बाबत लेखे नस्ती सोबत जोडलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/ परा-8, दिनांक 04/07/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा फलक लावणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याबाबत गुणनियंत्रण जिल्हा प्रयोग शाळा यांचे चाचणी घेणे आवश्यक असतांना चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

6) सदर कामाची ग्रामपंचायत नमुना नंबर 25 ला नोदं घेणे आवश्यक आहे. ते घेतले बाबतचे लेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध केले नाही.

7) सदर कामासाठी वापरण्यात आलेले सिमेंट खरेदी केल्याचे व त्यात कामासाठी सिमेंटचा वापर केले असल्याबाबतचे दाखला जोडणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सिमेंट खरेदी केले असलेबाबत त्याची खरेदी बिले नस्ती सोबत जोडणे आवश्यक आहे.

**4.106 राज्य जिल्हा परिषद शाळा चोर्लई शाळागृह दुरुस्ती करणेबाबत.**

**पंचायत समिती पोलादपूर, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 29/03/2015 अन्वये रक्कम रुपये 2,99,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) देयकातून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक दिनांक 22/07/2010 नुसार कामगार उपकर रक्कम 1 टक्के प्रमाणे रुपये 2,990/- वसुल केली नसल्याने सदर रक्कम वसूल करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी-2008/प्र.क्र.472, दिनांक 09/02/2009 नुसार ग्रामपंचायत आर्थिकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र नसताना कामाचा आदेश कसे देण्यात आले.

3) प्रशासकीय मंजूरी आदेशातील अट क्रमांक (04) कामाच्या ठिकाणी कामाचा माहिती फलक लावलेला नाही.

4) कामासाठी वापरलेल्या साहित्याची चाचणी (Test Report) शासकीय प्रयोगशाळेतून करणे आवश्यक असताना ठेकेदाराने चाचणी अहवाल SKG Project & Engg. Pvt. Ltd., खालापूर या खाजगी प्रयोग शाळेतून घेण्याचे प्रयोजन काय? नियमानुसार उचित कार्यवाही आवश्यक आहे.

5) सोबत सिमेंट वापर प्रमाणपत्रात नमुद केल्यानुसार उपरोक्त कामासाठी 74 गोणी सिमेंट वापरणे आवश्यक असताना ठेकेदार यांनी 100 गोणी सिमेंट मे. रामदेव स्टिल ट्रेडर्स, काटेतळी, पोलादपूर यांजकडून खरेदीचे प्रमाणक जोडले आहे. ज्यादा सिमेंट खरेदी 26 गोणी x 330 = 8560.00 रक्कम लेखा परीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

मंजूरी आदेशातील अट क्रमांक (06) नुसार सदरचे काम इतर कोणत्याही निधीमधून मंजूर / पूर्ण झाले नसल्याचे सक्षम प्राधिका-यांचे आवश्यक प्रमाणपत्र देयकासोबत नसल्याने याबाबत आवश्यक प्रमाणपत्र जोडून खात्री पटवावी.

**4.107 आदगांव पाष्टेआळी अंगणवाडी इमारत बांधणे.**

**पंचायत समिती श्रीवर्धन, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2015-16 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने बांधकाम विभागातील एकूण रक्कम रूपये 4,50,000/- च्या 4 प्रमाणकांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) काम पूर्ण करण्याची मुदत दिनांक 20/03/2014 पर्यंत होती. परंतु काम 17 महिने विलंबाने म्हणजेच दिनांक 26/08/2015 रोजी पूर्ण झाले आहे. काम विलंबाने पूर्ण झाल्यामुळे बी.1 टेंडर मधील अटी शर्थी क्रमांक 2

तसेच लेखा संहिता 1968 चे नियम 148 (1) नुसार काम विलंबाने केल्यामुळे कामाच्या देयकातून कमीत कमी 1 टक्के व जास्तीत जास्त 10 टक्के दंडाची रक्कम का कपात केली नाही ? याचा खुलासा करावा.

2) अंगणवाडी इमारत पूर्ण सुस्थितीत हस्तांतरित झाली म्हणून हस्तांतरण टिप्पणीवर एकात्मिक बालविकास अधिकारी यांची स्वाक्षरी आढळत नाही.

3) कामावर वापरलेले साहित्य चांगल्या प्रतीचे असलेबाबत शासकीय प्रयोग शाळेचा दाखला तपासणीस उपलब्ध झाला नाही.

4) कामाचे मोजमाप पुस्तकात मक्तेदार यांची मापे मान्य असलेबाबत स्वाक्षरी आढळत नाही.

5) मक्तेदार यांना निविदा फॉर्म विक्री केलेबाबत शुल्क वसूल केलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक विकअ-1998/प्र.क्र.43/कारधान-1, दिनांक 05/05/1999 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बिडीजी/2005/प्र.क्र.324/ इमारत-2, दिनांक 03/03/2006 मधील अट क्रमांक 5 नुसार कार्यकंत्राट व मूल्यवर्धित कर अधिनियम 2005 नुसार मक्तेदार यांचे देयकातून 5 टक्के व्हॅट कपात करणे आवश्यक आहे. परंतु देयकातून रुपये 22,500/- इतकी रक्कम कपात करणे आवश्यक असताना रुपये 13,109/- इतके वसूल केले असून रुपये 9,391/- व्याजासह वसूल करून पूर्तता सादर करावी.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग दिनांक 19/08/1998 व विमा संचालनालय दिनांक 30/07/2002 च्या पत्रानुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीवअ-2000/प्र.क्र.847/35, दिनांक 08/05/2005 अन्वये कामगार नेमलेल्या मजुरांचा विमा उतरविणे अत्यंत आवश्यक असून तसे मक्तेदाराने पावती सादर केल्याशिवाय अंतिम प्रदान करू नये अशी तरतूद असताना देखील अंतिम प्रदान करणेत आले आहे. देयकातून रक्कम रुपये 4,500/- इतकी वसूल करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 2,682/- इतकी वसूल केली असून रुपये 1,818/- व्याजासह वसूल करावी.

**4.108 चिखली साळुंखेवाडी येथे रस्ता तयार करणे.**

**पंचायत समिती संगमेश्वर-देवरुख, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 25, दिनांक 21/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,95,588/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो नाहीत.

2) कामाचा नकाशा नाही.

3) बाब क्रमांक 7 नुसार अंदाजपत्रकानुसार सोलिंगचे काम 33.75 सी.एम.टी चे करणेचे असतांना मोजमाप पुस्तकानुसार 36.00 सी.एम.टी चे केले आहे. सदरचे काम जादा झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रक व निविदेचा उद्देश साध्य झाला नाही. सदर रचनात्मक बदलांबाबत पूर्व मंजूरी घेण्यात आली नाही.

4) बाब क्रमांक 4 नुसार 60 मी.मी.खडी रस्त्याच्या कडेला पुरवठा करणे व पसरविण्याच्या कामाची उंची 0.15 ऐवजी 0.50 व रुंदी 3.00 ऐवजी 2.00 मीटरचे केले आहे. रस्त्याची रुंदी कमी करुन जादा उंचीचा रस्ता तयार करण्यात आलेला आहे. याबाबत पूर्व मंजूरी घेण्यात आली नाही.

5) बाब क्रमांक 1 नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे 52.05 स्के.मी.चे काम करणेचे असतांना मोजमाप पुस्तकानुसार 1.20 स्के.मी.चे काम केले आहे. कमी काम केलेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. रस्त्याची लांबी 360 मीटर ऐवजी 100 मीटरचा रस्ता केला आहे. रस्त्याची रुंदी कमी करुन जादा उंचीचा रस्ता खोदाई केल्याचे दिसून येते. ही बाब नियमबाहय असून याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) बाब क्रमांक 9 नुसार कामाचे ठिकाणी कामाची माहिती दर्शविणारा माहिती फलक बसविल्याचे दिसून येत नाही.

7) बाब क्रमांक 8 नुसार पॉवर रोलरचे काम 1800 स्के.मी. ऐवजी 660 स्के.मी.चे केले आहे. रस्त्याची दबाई कमी केल्याने योग्य दर्जाचे काम केल्याचे निदर्शनास येत नाही. अंदाजपत्रक तयार करतांना प्रत्यक्षात कामाचे ठिकाणाची पाहणी केली नसल्याचे दिसून येते.

**4.109 वॉल कंपाऊंड बांधकाम करणेबाबत.**

**पंचायत समिती मंडणगड, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती मंडणगड सन 2015-16 मध्ये शाळेला वॉल कंपाऊड बांधकाम करणे याकरिता रक्कम रूपये 1,75,000/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 134 नुसार कार्यवाही केले बाबत लेखे उपलब्ध झाले नाही.

2) सदर कामाबाबतचे प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व करारनामा उपलब्ध झाले नाही.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जी आर-31/सा-415990, दिनांक 08/01/2007 नुसार साहित्य वापरणे पुर्वी चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क नुसार 2.30 टक्के आयकर कपात करण्यात आलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 208/प्र.क्र.123 परा-7, दिनांक 30/10/2001 अन्वये कामगार उपकाराची 1 टक्का रक्कम कपात केलेली नाही.

6) शासन निर्णय क्रमांक निवर-2000/प्र.क्र.837/45, दिनांक 08/05/2002 अन्वये कामगार नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा कामास सुरवात करण्यापुर्वी उतरविणे आवश्यक आहे. सदर रक्कम कपात केली नाही.

7) विक्रीकर विभागाकडील अधिसुचना दिनांक 04/04/2012 च्या अनुसुचीतील अनुक्रमांक 1 मध्ये स्तंभ 3 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराच्या देयकातुन 4 टक्के ऐवजी 5 टक्के विक्रीकर कपात करावे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन अधिसुचना क्रमांक गौणखनिज 10/201/प्र.क्र.24/29(3), दिनांक 15/01/2003 व गौणखनिज 10/2006, दिनांक 15/12/2006 नुसार देयकातुन गौण खनिज रक्कम कपात केलेली नाही.

9) सदर विकासकामाबाबतची मोजमाप नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

10) काम पुर्ण झालेबाबतचा दाखला, मुल्याकंन, अंदाजपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

**4.110 जिल्हा परिषद सेस अनुदानातून मागासवर्गीय वस्तीत अंतर्गत जोडरस्ते तयार करणे.**

**पंचायत समिती कणकवली, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** मागासवर्गीय वस्ती अंतर्गत जोडरस्ते तयार करणे एकूण 6 बांधकामांसाठी रक्कम रुपये 10,99,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आक्षेपात नमूद कामांपैकी अनुक्रमांक 4 व 5 च्या कामांचे चॅनेज नमूद नसल्यामुळे काम कोठून कोठे केले याचा बोध होत नाही.

2) निधी वितरण आदेश अटीनुसार कामाचे अंदाजपत्रक पंचायत समिती स्तरावर ठेऊन लेखापरीक्षणावेळी उपलब्ध करून दयावयाचे आहे. परंतु, अनुक्रमांक 2 व 4 च्या कामांचे अंदाजपत्रक नस्तीसोबत तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही.

3) अनुक्रमांक 1 व 3 च्या कामांच्या अंदाजपत्रकावर कोणाचीही स्वाक्षरी दिसून येत नाही.

4) जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार सक्षम प्राधिका-याने तांत्रिक मंजुरी देणे आवश्यक आहे. परंतु, अनुक्रमांक 1, 3, 5 च्या कामाच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच सदर कामांच्या अंदाजपत्रकात सर्वसाधारण वर्णन समाविष्ट केलेले नाही. त्यामुळे वापरलेले दर कोणत्या दरसुचीतील आहेत याचा उलगडा होत नाही.

5) निधी वितरण आदेश अटीनुसार सदर रस्त्यांची नोंद नमुना नंबर 23 ला असलेबाबत खात्री करूनच कार्यारंभ आदेश दयावयाचा आहे. अनुक्रमांक 2 व 4 च्या रस्त्यांचा नमुना नंबर 23 नस्तीसोबत नाही.

6) निधी वितरण आदेश अटीनुसार अनुक्रमांक 2 व 4 च्या कामांची मोजमाप वही छायांकित प्रत, काम पूर्णत्वाचा दाखला नमुना नंबर 65 सादर करावा.

7) निधी वितरण आदेश अटीनुसार काम पूर्ण झाल्याची खात्री स्वतः गटविकास अधिकारी यांनी करणेची असून त्यानंतरच 100 टक्के रक्कम पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतला अदा करणेची आहे. अनुक्रमांक 1 चे काम दिनांक 30/05/2016 रोजी पूर्ण झाले आहे. परंतु, रक्कम पूर्वीच दिनांक 31/03/2016 रोजी वर्ग केली आहे. तसेच इतर रक्कमा दिनांक 31/03/2016 रोजी वर्ग करण्यात आल्या आहेत.

8) अनुक्रमांक 6 च्या कामाच्या मोजमाप नोंदवही व काम पूर्णत्व दाखला नमुना नंबर 65 वर काम पूर्ण झाल्याचा दिनांक नमूद केलेला नाही.

**4.111 रानबांबुळी अणावकरवाडी ते प्रविण अवसरे यांचे घरापर्यंत जाणारा रस्ता करणे कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती कुडाळ, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,53,185/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची पंजिका व मोजमाप वही तपासली असता कामामध्ये बाब क्रमांक IV मध्ये 60 एमएमची 92 क्युबिक मिटर काळी खडी वापरण्यात आलेली आहे. महसुल व वन विभाग अधिसूचना दिनांक 11/02/2010 अन्वये बांधकामासाठी वापरलेल्या वाळू, खडी, डांबर इत्यादीवर प्रति ब्रास स्वामित्व धन (रॉयल्टी) वसूल करणे आवश्यक होते. त्या नुसार वापरण्यात आलेल्या काळयाखडीची रॉयल्टीची रक्कम रुपये 6,501/- एवढी होते. तथापि, प्रमाणक व मोजमाप वही तपासली असता संबधित मक्तेदार यांचेकडून रक्कम रुपये 5,600/- एवढया रॉयल्टीची वसुली केलेली आहे. म्हणजेच रक्कम रुपये 901/- एवढया कमी रकमेची वसुली केलेली असल्याने कमी वसुलीची रक्कम वसुल करण्यात यावी.

2) नमुना नंबर 23 मध्ये रस्त्याची एकूण लांबी 200 मिटर तर रुंदी 0.60 दर्शविलेली आहे. त्या अनुषंगाने रस्ता कोणत्या टप्प्यात केला हे तपासण्यासाठी नस्तीमध्ये आराखडा (Key Plan) उपलब्ध झालेला नाही. परिणामी केलेल्या रस्त्याचा आरंभ बिंदू व अंतिम बिंदू याबाबत खात्री होत नाही.

3) शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एस./1099/प्र.क्र.99/08, दिनांक 15/01/1997 नुसार झालेल्या कामाच्या संदर्भात कामाच्या ठिकाणी नामफलक तपशिलवार खर्चासहीत नोंदीचा फलक लावणे तसेच फोटो काढून पंजिकेसोबत जोडणे आवश्यक आहे. सदर कागदपत्र नस्तीसोबत नसल्याचे आढळले. त्यामुळे सदर काम पूर्ण झाले किंवा कसे, याबाबत खात्री करता आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रा./र.प.जि. शासन परिपत्रक क्रमांक वि.स. व ज.वि.-2000/प्र.क्र.873/35, दिनांक 08/05/2002 परिपत्रकान्वये शासकीय विमा निधीची वर्गणी रक्कम ही मक्तेदाराला कार्यारंभ आदेश देताना मक्तेदाराकडून भरून घेणे कामाच्या व कामगारांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असताना वर्गणीची रक्कम देयकातून कपात करणे ही बाब वरील परिपत्रकातील तरतुदीच्या विसंगत आहे. यापुढे विमा वर्गणी रक्कम कार्यारंभ आदेश देतानाच वसूल करण्याची कार्यवाही करावी.

**4.112 पंचायत समिती, नाशिकच्या सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील 13 वित्त आयोग पंचायत समिती स्तर 2015-16 अंतर्गत केलेल्या विकास कामांमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती नाशिक, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, नाशिकच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील 13 वा वित्त आयोग

(जनरल परफॉर्मन्स ग्रँट, जनरल बेसीक ग्रँट व व्याज) पंचायत समिती स्तर 2015-2016 मधून सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रुपये 35,63,628/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) बांधकाम विभाग नाशिकच्या दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना 8 (a) मध्ये नमूद केल्यानुसार ज्या बाबींकरीता गुण नियंत्रण चाचणी (Quality Control Test) करणे आवश्यक आहे त्या बाबींचे दरपृथ:करण करतांना मूळ दराच्या 0.5 टक्के जादा रक्कम समाविष्ट करणेबाबत किंवा प्रत्यक्ष गुण नियंत्रण चाचणी (Quality Control Test) केल्याचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करणेबाबत सुचीत करणेत आलेले आहे. तथापि कामाचे अंदाजपत्रक करतांना गुण नियंत्रण चाचणी (Quality Control Test) करणे आवश्यक आहे, त्या बाबींचे दरपृथ:करण करतांना मूळ दराच्या 0.5 टक्के जादा रक्कम तसेच प्रत्यक्ष गुण नियंत्रण चाचणी (Quality Control Test) केल्याचा खर्च असा दोनही प्रकारचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करणेत येवुन, रक्कम रुपये 2,765/- चुकीच्या दराने प्रदान केल्याने रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

2) कामाचे अंदाजपत्रक करतांना गुण नियंत्रण चाचणी (Quality Control Test) करणे आवश्यक आहे त्या बाबींची गुण नियंत्रण चाचणीबाबत, चाचणी अहवाल जोडलेला त्यामुळे प्रत्यक्ष अदा केलेली रक्कम रुपये 3,470/- वसुल पात्र आहे.

3) चांदशी येथे गंगापुर कॅनाल पाटील वस्ती ते महानगर पालिका हद्द रस्ता खडीकरण करणे तालुका नाशिक या कामातील बाब क्रमांक 1 - cutting down the road side thorny bushes करीता Qty. 860 Sqm x 8.88/Sqm दराने रक्कम रुपये 7636.80 प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी, सदरहु रस्त्याचे काम हे किलोमीटर 0/00 ते 0/220 दरम्यान केलेले असल्याने सदरहु बाबी करीताचे मोजमाप हे 2 (No.) x 220 (L) x 1 (B) = 440 Sqm ऐवजी 860 Sqm. या दराने परीगणीत केल्यामुळे रक्कम रुपये 3,730/- कंत्राटदारास जादा प्रदान करण्यात आलेली आहे.

4) महसुल व वन विभाग, शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 नुसार रुपये 141.34 प्रति घनमीटर दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. एकूण 9 कामांसाठी वापरलेल्या दगड, वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम जुन्याच दराने म्हणजेच रुपये 70.67 प्रति घनमीटर दराने परिगणित करुन वसुल करण्यात आलेली आहे. उर्वरीत फरकाची रक्कम रुपये 1,31,721/- वसुल करावी. (13 वा वित्त आयोग जनरल परफॉर्मन्स ग्रँट)

5) लेखापरिक्षणाचे वेळेस मागणी करुनही एकूण 4 कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.

6) एकूण 3 कामांमध्ये चुकीच्या व जादा दराने प्रदान झाल्याने रक्कम रुपये 54,555/- वसुलपात्र आहे.

7) कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या/उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेल्या नाहीत.

**4.113 बोंढारमाळ ते घाटेविहीर रस्ता दुरुस्ती करणे.**

**पंचायत समिती पेठ, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** प्रमाणक क्रमांक 03, दिनांक 03/11/2015, रक्कम रुपये 4,40,003/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महसुल व वन विभाग शासन, अधिसूचना दिनांक 11/05/2015 नुसार रुपये 141.34 प्रति घनमीटर दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड, वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम रुपये 7,420/-वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- व्हीपीएम-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 मधील परिच्छेद(ब) नुसार सर्व प्रकारच्या नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधिक रकमेच्या कामाच्या ठिकाणी शासन निर्णयातील परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेप्रमाणे

बांधकामाबाबत फलक लावणे आवश्यक असतांना सदर कामावर बांधकामाबाबत फलक लावलेला नाही. त्यामुळे सदर कामावरील फलकाची रक्कम रुपये 5,262/- संबंधित मक्तेदाराकडून वसुल करण्यात येवून अनुपालन दर्शवावे.

3) सदर कामाचे अंदाजपत्रकात साहित्य चाचणी करणेसाठी रक्कम रुपये 4,275/- तरतुद करुन अंतिम बिलांत रक्कम अदा करण्यांत आलेली आहे. परंतु कामाचे नस्ती सोबत साहित्य चाचणी केलेबाबत अहवाल जोडलेला नाही. त्यामुळे चाचणी शिवाय अदा केलेली रक्कम लेखापरीक्षणांत मान्य करता येत नाही. तरी सदरची रक्कम संबंधीतांकडुन वसुल करुन शासन निधीत जमा करावी.

4) बाब क्रमांक 4 अर्थवर्क एम्बॅकमेंटचे एकुण काम 2757.90 घनमीटर केलेले आहे. त्यामधुन रेडबुक स्पेसिफिकेशन मधील तरतुदी अन्वये 10 टक्के श्रींकेज वजा करणे आवश्यक असतांना श्रींकेज वजा केलेले नाही. त्यामुळे 275.79 घनमीटरचे प्रति घनमीटर दर रुपये 60.50 प्रमाणे एकुण रक्कम रुपये 16,685/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रक्कम संबंधीतांकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968, नियम-197 नुसार पुर्ण कामांच्या नोंदी नमुना नंबर 69 मध्ये नियम-97 नुसार नमुना नंबर 39 मधील अचल मालमत्ता नोंदवहीत व नमुना नंबर 40 मधील रस्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. सदर नोंदी घेतलेल्या नाहीत.

**4.114 पंचायत समिती सेसमधून केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दिंडोरी, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती दिंडोरी कार्यालय अंतर्गत उप अभियंता (ई व द) उपविभाग दिंडोरी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या सन 2015-2016 मधील पंचायत समिती सेसमधुन केलेल्या कामांचे बाबतीत रक्कम रुपये 10,11,687/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आक्षेपातील अनुक्रमांक 1 ते 5 प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढ-घट तक्त्यानुसार एकूण रुपये 1,03,721/- जास्त केलेला खर्च आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153(1)नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे. उपरोक्त कामावर एका बाबीं वर बचत करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केलेला असल्याने नियम 153(2) नुसार सक्षम प्राधिका-यांची लेखी मान्यता घेतलेली नाही.

2) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशा नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमुद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 1093/प्र.क्रं.1516 भाग 2/33, दिनांक 27/06/2000 नुसार कामांचे तुकडीकरण करु नये असे असतांना अनुक्रमांक 1 व 3 कामांचे नियमबाह्य तुकडीकरण केलेले आहे. दोन्ही कामाचे ठेकेदाराचे जय आंबे म.स.स. मर्यादीत, दिंडोरी हे एकच आहेत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 व शासन निर्णस क्रमांक- स्थाविका-2003/प्र.क्र.369/का1445, दिनांक 28/11/2003 नुसार रक्कम रुपये 20,000/- वरील कामाचा माहिती फलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नयेत. फलकाचा फोटो नस्ती सोबत जोडलेला नाही. कामाचे फलकाचा फोटो सादर करावे अन्यथा उदाहरणार्थ अनुक्रमांक 4 कामाचे बाब क्रमांक 28 प्रदान रक्कम रुपये 5,789/- संबंधीतांकडुन वसुल करुन शासन निधीत भरणा करणेत यावी.

5) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968, नियम 87 नुसार कामासाठी वापरण्यात यावयाचे साहित्य सिमेंट, वाळू, खडी, स्टिल इत्यादी व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक

सिमेंट-1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार साहित्य कामास वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेकडून चाचणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6) गौणखनिज कमी कपात रक्कम रुपये 2,659/- वसुल करुन शासन निधीत भरणा करावी.

7) करंजवण येथील समाजमंदीर दुरुस्तीचे काम पुर्ण करण्याची मुदत दिनांक 13/10/2014 होती. तथापि काम दिनांक 08/07/2015 रोजी पुर्ण करण्यात आले. विलंबाबाबत मुदतवाढ अर्जावर ठेकेदार यांची स्वाक्षरी नाही. विलंब कालावधी (268 दिवस) साठी का. अ. ई व द. विभाग क्रमांक 1 यांचे पत्र क्रमांक जिपना-बांखा/लेखा-1/279/12,दिनांक 17/11/2012 सोबतचे दंड आकारणी तक्त्यानुसार दंड रुपये 5,250/- वसुल करण्यात यावा.

8) करंजवण येथील समाजमंदीर दुरुस्ती कामाचे करारनाम्यावर ठेकेदार यांची स्वाक्षरी नाही.

9) पंचायत समिती दिंडोरी येथे ATM साठी रुम बांधणे कामाचे नस्ती सोबत Quarry chart नमूद नाही त्यामुळे लीड दर खात्री करता आली नाही. Quarry chart वर प्रत्यक्ष किलोमीटर नमुद करून व लीड खात्री करून जादा प्रदान रक्कम ठेकेदाराकडून वसुल करावी. देयकातून विक्रिकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, दिनांक 04/04/2012 च्या अधिसूचना सुचनांनुसार मुल्यवर्धीत करासाठी दिनांक 01/04/2012 पासुन 5 टक्के मुल्यवर्धीत कर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराकडून 5 मुल्यवर्धीत करा ऐवजी 4 टक्के वसुल करण्यात आली, तफावत रक्कम रुपये 2,897/- वसुल करुन शासन भरणा करुन अनुपालन सादर करावे.

10) महाजे ते जालखेड रस्ता दुरुस्ती कामाचे जिल्हा परिषद बांधकाम विभाग कामकाज वाटप समिती मार्फत ठेकेदार श्री.नितीन एच. जाधव, सु.बे.अ. यांना दिनांक 07/11/2014 अन्वये कामकाज वाटप करण्यात आले आहे. मात्र कामकाज वाटप होण्यापुर्वीच ठेकेदारास निविदा विक्री- पावती दिनांक 11/09/2014 रोजी वाटप करण्यात आली.

11) महाजे ते जालखेड रस्ता दुरुस्ती कामाचे मोजमाप पुस्तक क्रमांक 2622 पृष्ठ 80 वर उप अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

12) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबंधीत कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत पंचायत समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

13) भावडी ते सदाशीव, धुळे वस्ती रस्ता दुरुस्ती कामाचे मोजमाप पुस्तकानुसार खर्च रुपये 91,568/- मात्र प्रदान 92,000/- जादा प्रदान रक्कम रुपये 432/- वसुल करावी.

14) पंचायत समिती सेस अंतर्गत वरीलप्रमाणे कामे पुर्ण केलेले असून बांधकाम उपविभाग दिंडोरी यांचेकडील पंचायत समिती सेस कामाची नस्ती तपासतांना अंदाजपत्रकात 10 टक्के डोंगरी भाग / आदिवासी क्षेत्र मुळ दरात प्रथम वाढीव न धरता अंतिम धरल्याने वाढीव दरापोटी प्रत्यक्ष कामे केलेल्या बाबीवर संबंधीत मक्तेदाराला रक्कमेचे अतिप्रदान झालेले आहे. सदरची रक्कम संबधीत मक्तेदाराकडून वसुल का करण्यात येऊ नये याबाबत अभिलेख्यासह खात्री पटवावी.

**4.115 पंचायत समिती, सटाणाच्या सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील 13 वा वित्त आयोग पंचायत समिती स्तर 2015-16 अंतर्गत केलेल्या विकास कामांमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, सटाणाच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील 13 वा वित्त आयोग पंचायत समिती स्तर 2015-2016 मधून रक्कम रुपये 1,74,69,442/- इतका खर्च केला आहे. उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता, सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रुपये 1,74,69,442/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महसुल व वन विभाग, शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 नुसार रुपये 141.34/- प्रति घनमीटर दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. आक्षेपातील एकूण 13 कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम रुपये 65,200/- शासन सदरी भरणा करण्यात

आलेली नाही. सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. तसेच 5 कामाची काही बाबींची रॉयल्टीची परिगणना केलेली नाही. ती करुन त्याप्रमाणे रॉयल्टीची रक्कम वसुल करावी.

2) एकुण 4 कामासाठीच्या अंदाजपत्रकात रस्त्याच्या कडेल्या असलेल्या काटेरी झाडे-झुडपे (वेडी बाभुळ इ.) काढणेकरिता रक्कम रुपये 54,648/- खर्च करण्यात आलेला आहे. तथापि, पंचायत समिती, सटाणाच्या आस्थापनेवर एकूण 46 मैल मजुर कार्यरत असुन, रस्त्याच्या कडेल्या असलेल्या काटेरी झाडे-झुडपे, वेडी बाभुळ काढणे इत्यादी कामे त्यांचेकडून करुन घेणे अपेक्षीत आहे. त्यामुळे सदर कामावर केलेला खर्च रक्कम रुपये 54,648/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.18/वित्त-9/33, दिनांक 30/06/2004, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये निविदेशिवाय कामे देताना ग्रामपंचायतीस प्राधान्य दयावे. ग्रामपंचायतीने सदरचे काम करण्यास नकार दिल्यास मजूर संस्थांना प्राधान्य देण्यात यावे. असे असताना ग्रामपंचायतीने नकार दिल्याबाबत कोणतेही लेखे नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

4) एकूण 13 कामासाठीचे साहित्याच्या चाचणी अहवालासाठी एकूण रक्कम रुपये 13,240/- खर्ची दाखविण्यात आलेले आहे. तथापि सदर कामाच्या नस्ती सोबत कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल जोडलेला नाही. त्यामुळे कामावर वापरलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ता बाबत खात्री करता आली नाही.

5) 14 कामांच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 5110, 671, 5966, 2252, 5123, 5101 व 5115 लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) नुसार आदेश देणेपुर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते कधी पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती नमूद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अट/शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. तथापी, असा करारनामा केलेला असला तरी त्यावर मक्तेदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

7) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-01/05/प्र.क्र.26/प्रमा-2, दिनांक 31/03/2005 मधील मुद्दा क्रमांक 2 व 5 नुसार विभागाकडील एकूण कामांची वाटपासाठी विगतवारी विहित करण्यात आलेली आहे. या नियमाप्रमाणे वाटप करण्यात आले असल्याबाबत काम वाटप समितीचे शिफारस पत्रे व कंत्राटदाराचे पासबुक अभावी खात्री करता आली नाही.

8) उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या/उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेल्या नाहीत.

**4.116 नैताळे ते घायाळ वस्ती दुरुस्ती करणे 0/00 ते 0/500 तालुका निफाड**

**पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** प्रमाणक क्रमांक 19 दिनांक 06/11/2015 रक्कम रुपये 2,99,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परीपत्रक क्रमांक संकिर्ण -2003/प्र.क्र.128/ रस्ते-1, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 06/05/2003 नुसार रस्त्याच्या कामासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा 7/12 उताऱ्यामध्ये शासनाच्या नावे नोंदी करण्यात याव्यात, असे असतांना सदर कामाच्या नस्तीसोबत 7/12 उतारा जोडण्यात आलेला नाही.

2) बांधकाम नियमपुस्तिका परीच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करून तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकित नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमूद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.18/ वित्त -9/33, दिनांक 30/06/2004 व शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/ वित्त -9/33, दिनांक 09/02/2009 अन्वये निविदेशिवाय कामे देतांना ग्रामपंचायतीस प्राधान्य दयावे. ग्रामपंचायतीने सदरचे काम करण्यास नकार दिल्यास मंजूर संस्थांना प्राधान्य देण्यात यावे, असे असतांना ग्रामपंचायतीने नकार दिल्याबाबत कोणतेही लेखे नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148 (1) नुसार आदेश देणेपुर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते कधी पुर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती नमुद करणे आवश्यक असतांना तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही.

5) लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य चाचणी अहवाल हा शासकीय प्रयोगशाळेकडून काम सुरु करण्याअगोदर घेणे आवश्यक आहे.

6) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास /1098/प्र.क्रं.29/98 शासन हमी दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक -जि.प. 2/2000/प्र.क्रं.837/पंरा 8 (35), दिनांक 15/09/2003 तसेच विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि/1801/सीआर/जिप संकिर्ण दिनांक 30/07/2002 नुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबंधीत कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापी तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 व निविदा अटीनुसार निविदेच्या प्रत्येक पानावर निविदा स्विकारतांना उप अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

8) सदरचे काम दुरस्तीचे असून यापुर्वी हे मुळ काम कोणत्या योजनेतून करण्यात आले व ते केव्हा करण्यात आले याबाबत मालमत्ता नोंदवही उपलब्ध झाली नाही. तसेच दुरुस्ती पुर्वी सदरचे काम केव्हा करण्यात आले होते त्याची दुरुस्ती करणे आवश्यक होते किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

9) कामावरील वापरण्यात आलेले एकूण गौणखनिज 426.32× नविन दर 141.34 = 60,256/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये 30,128/- कपात करण्यात आली आहे तरी रक्कम रुपये 30,128/- मक्तेदाराकडून वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम -1099/ प्र.क्रं. 54/08, दिनांक 20/05/1999 नुसार रुपये 20,000/- चे वरील कामाचे माहिती फलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये, असे असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच अंदाजपत्रक व मोजमाप नोंदवहीची नस्तीसोबत तपासणी करतांना खालील बाबीनुसार मक्तेदारास बोर्ड न लावता त्यास देयकात माहिती फलकाची रक्कम रुपये 4,784/- अदा करण्यात आलेली ती संबंधीताकडून त्वरीत वसुल करण्यात यावी.

11) मंजूर सहकारी संस्थेचे नोंदणी प्रमाण पत्राची प्रत नस्ती सोबत जोडणेत आलेली नाही.

**4.117 13 वा वित्त आयोगामधून केलेल्या कामातील अनियमीततेबाबत.**

**पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सदरबाबत रक्कम रुपये 99,27,133/- खर्च नोंदविला आहे. पंचायत समिती सिन्नर कार्यालय अंतर्गत उप अभियंता (ईवद) उपविभाग सिन्नर यांनी उपलब्ध करून दिलेल्या सन 2015-2016 मधील 13 वा वित्त आयोगामधून केलेल्या कामांचे खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुक्रमांक 1 या कामांमधील Compacting WBM या बाबींसाठी खडी व मुरुम वाहतुक केल्याचे दर्शविले असून त्याचे लिड चार्जेस घेतांना, एकूण लिड चार्जेस मधून 5 किलोमीटर इनिशियल लिड चार्जेस वजा केलेले नाहीत. 5 किलोमीटर इनिशियल लिड चार्जेस वजा न केल्यामुळे परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे रक्कम रुपये 43,492/- चे अतिप्रदान झालेले आहे. अतिप्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसुल करुन शासन लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन अधिसूचना दिनांक 15/05/2015 नुसार गौणखनिज दर रुपये 141.34 प्रति घनमीटर झालेला आहे. गौण खनिज दरात वाढ झाल्याने रक्कम रुपये 141.34 प्रती घनमीटर प्रमाणे अंदाजपत्रकात तरतूद करणे आवशक होते व त्यानुसार वसुली करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही. कामांमध्ये गौण खनिज रक्कम रुपये 2,30,844/- कमी कपात करण्यात आली. तरी सदरची कमी कपात रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करून शासन लेखाशिर्षात भरणा करुन अनुपालन सादर करावे.

3) काही कामामध्ये सप्लाईंग 40 एमएम मेटल वापरण्यात आलेले आहे. सदर मेटलचे दर पृथ्थ:करण करतांना डबलचे लीड चार्जेस वापरले आहेत. त्यामुळे गौणखनिज/रॉयल्टीची परिगणना करताना एकूण परिमाणाच्या 1.25 पट रॉयल्टीची परिगणना करणे आवश्यक आहे. तथापि, मोजमाप पुस्तिकेत मुळ परिमाणावर रॉयल्टीची परिगणना केल्यामुळे ठेकेदारास रक्कम रुपये 52,395/- चे जादा प्रदान झालेले आहे.

4) कामाचे अंदाजपत्रकात बाब क्रमांक 1 वेडया बाभळी तोडणेसाठी रक्कम रूपये 2,77,694/- ठेकेदारास प्रदान करणेत आलेले आहे. बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचे चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेले नाही. त्यामुळे पाहणी अहवालानुसार नमुद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही. तरी ठेकेदाराने प्रत्यक्ष काम केले असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा सदरची रक्कम संबधितांकडुन वसुल करून शासन सदरी भरणा करून पुर्तता दाखवावी.

5) 4 कामामध्ये कामाचे माहिती दर्शविणारे फलकाचे फोटो जोडलेले नाहीत. त्यामुळे रक्कम रुपये 14,628/- संबंधित ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

6) 2 कामामध्ये बाब क्रमांक 3 Watering and compacting of embankment हे काम 477.90 घनमीटर करण्यात आलेले आहे. सदर बाबींमधून रेड बुक आर डी 13.7 नुसार 10 टक्के श्रींकेज वजा करणे आवश्यक होते. तथापी 10 टक्के श्रींकेज वजा न केल्याने 47.79 घनमीटर साठी रुपये 31.08 प्रमाणे एकूण रुपये 2,970/- चे जादा प्रदान झालेले आहे.

7) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 नियम 5 नुसार सदर मंजूर संस्था ह्या नोंदणीकृत असल्याबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

8) शासन निर्णय क्रमांक सीआर-448/आ.39, दिनांक 17/09/2004 अन्वये दुरुस्ती किरकोळ कामाच्या नोंदी इतिहास नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. इतिहास नोंदवहीला नोंद घेतल्याचे आढळुन आले नाही.

9) अंदाजपत्रकासोबत शासकीय क्वारी चार्ट जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे कामासाठी साहित्य शासकीय खाणीवरून आणल्याबाबत पडताळणी करता येत नाही. तसेच Rate Analyasis मधील लीड दराची खात्री करता आली नाही.

### 4.118 बांधकाम विभागाकडील 13 वा वित्त आयोग पंचायत समिती स्तर 2015-2016 मधुन पुर्ण केलेल्या विकास कामांमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती देवळा, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती, देवळाच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील 13 वा वित्त आयोग पंचायत समिती स्तर 2015-2016 मधुन केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता, सदर कामांवर रक्कम रुपये 18,31,223/- इतका खर्च केला आहे.

उपरोक्त कामाचे प्राकलन, निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका इत्यादीची पडताळणी करून झालेला खर्च रुपये 18,31,223/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/प्र.क्र.18/वित्त-9/33, दिनांक 30/06/2004, व शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये निविदेशिवाय कामे देताना ग्रामपंचायतीस प्राधान्य द्यावे. ग्रामपंचायतीने सदरचे काम करण्यास नकार दिल्यास

मजूर संस्थांना प्राधान्य देण्यात यावे. असे असताना ग्रामपंचायतीने नकार दिल्याबाबत कोणतेही लेखे नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) नुसार आदेश देणेपुर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते कधी पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अट/शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. तथापि, असा करारनामा केलेला असला तरी त्यावर मक्तेदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

3) महसुल व वन विभाग शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 नुसार रुपये 141.34 प्रति घनमीटर दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. 8 कामांमध्ये वापरलेल्या दगड, वाळु, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम परिगणित करुन शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. तरी रक्कम रुपये 141.34 प्रति घनमीटर या दराने उपरोक्त कामासाठीची रॉयल्टीची रक्कम रुपये 41,054/- वसुल करून शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम क्रमांक 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर (कामावर) खर्च करण्याची तरतुद नाही. तसेच नियम क्रमांक 153(3) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे व अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेणे ही देखील अभियंता यांची जबाबदारी आहे.

योग्य प्रकारे कामाची प्रथम पाहणी करुन त्या सर्वेक्षणानुसार अंदाजपत्रक तयार करणे हे अभियंता/उपअभियंता यांची जबाबदारी आहे. या ठिकाणी योग्य प्रकारे अंदाजपत्रक तयार न केल्यामुळे जादा खर्च झालेला दिसून येतो.

इतर बाबींवर जादा खर्चाबाबत तांत्रिक अधिका-याची पुर्वमंजुरी देखील घेतलेली नाही. फक्त वाढ/घट तक्त्यात As per work done असे कारण नमुद केले आहे. हे कारण संयुक्तिक नाही. तांत्रिक कारण नमुद करणे आवश्यक आहे. कामासाठी जादा खर्चाबाबत तांत्रिक अधिका-याची पुर्वमंजुरी घेतलेली नसल्याने जादा केलेला खर्च रक्कम रुपये 1,13,995/- वसुल होणे आवश्यक  आहे.

5) 6 कामाच्या नस्ती सोबत कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल जोडलेला नाही तसेच एका कामाच्या बाब क्रमांक 10 अन्वये साहित्याच्या चाचणी अहवालाचे रुपये 765/- खर्ची दाखविण्यात आलेले आहे. तथापि, सदर कामाच्या नस्तीसोबत कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल जोडलेला नाही त्यामुळे कामावर वापरलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ताबाबत खात्री करता आली नाही. चाचणी अहवाला अभावी झालेला खर्च योग्य असल्याबाबत चाचणी अहवाल उपलब्ध करुन अनुपालन दर्शवावे.

6) एका कामाच्या अंदाजपत्रकाच्या गोषवा-यावर, क्वारी चार्ट तसेच साहित्याच्या लीड चार्जेस तक्त्यावर उप अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

7) एका कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या/उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेल्या नाहीत.

**4.119 मौजे वाघाडी बु, तालुका शिंदखेडा येथे गावांतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.**

**पंचायत समिती शिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 42, दिनांक 22/01/2016 अन्वये रक्कम रुपये 4,11,619/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 148(1) नुसार मक्तेदारास कार्यादेश देण्यापुर्वी करारनामा करुन घेण्यात येईल. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984, नियम 193(1) नुसार कंत्राटाच्या अटी नेमक्या व सुनिश्चित असल्या पाहिजेत. विभागाने या नियमाप्रमाणे परिपुर्ण असा करारनामा न करता, अत्यंत त्रोटक अशाप्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

2) कामाची जाहिरात दैनिक मर्डर मध्ये प्रसारीत करण्यात आली आहे. सदरचे दैनिक माहिती व जनसंपर्क कार्यालयाच्या चक्रानुक्रमे जाहिरात देण्यासाठी तसेच ई-निविदा रकमेसाठी पात्र असलेबाबतचे कागदपत्र नस्तीसोबत आढळुन आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक-जिपर-2009/प्र.क्रं.180/पंरा-8, दिनांक 31/12/2009 व कार्यादेशातील अट क्रमांक 11 नुसार कामाचा दोषनिवारण कालावधी निविदेत व करारनाम्यात नमुद केलेला नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 अन्वये मुल्यवर्धीत अधिनियमानुसार नोंदणी झालेल्या ठेकेदाराच्या देयकातुन 2 टक्के व अनोंदणीकृत ठेकेदाराकडुन 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्तप्रमाणे वसुलपात्र मुल्यवर्धीत कर रुपये 8,232/- वसुल करुन शासन सदरी भरणा करुन पुर्तता करावी.

5) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक व्ही.पीएम/1099/प.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- जिपर-2009/प्र.क्र.180/पंरा-8, दिनांक 31/12/2009 नुसार कामाच्या ठिकाणी माहितीफलक बसविणे आवश्यक असतांना व प्राकलनात व देयकातील बाबींप्रमाणे रुपये 2,538/- प्रदान केले असतांना तशी कार्यवाही केली नाही. रुपये 2,538/-ठेकेदाराकडून वसुल करुन शासन सदरी भरणा करण्यात यावा.

6) आयकर अधिनियम 1961 चे  कलम 194 (क) नुसार होणारा 1 टक्के आयकर रक्कम रुपये 4,116/- वसुल करुन शासन सदरी आयकर खाती भरणा केलेला नाही. तरी संबंधितांकडुन आयकर वसुल करुन शासन सदरी योग्य़ त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन पुर्तता करावी.

7) कॉंक्रीट 1:4:8 संधाणकाचे कामाचे प्राकलनातील दर व जिल्हा दरसुचीतील दरांची पडताळणी केली असता समितीने या बाबीचे दर हे बिल्डिंग कामाचे नमुद केलेले आहे. परंतु, सदरचे काम रस्त्याचे असल्याने जिल्हा दरसुचीतील सीडी वर्कचे सदर बाबीसाठी दर नमुद करणे आवश्यक होते. जिल्हा दरसुचीतील बिल्डिंग कामाचे कॉंक्रीट 1:4:8 संधाणकाचे दर रुपये 2,615/- व सीडी वर्कचे दर रुपये 2,406/- प्रती घनमीटर आहेत. प्रती घनमीटर फरक रुपये 209/- एकुण 81.47 घनमीटर रक्कम रुपये 17,027/- एवढे जादा प्रदान संबंधितांकडुन वसुल करावी.

8) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार - अ अधिसुचना क्रमांक गौखनि 10/1012/प्र.क्र. 603/ख, दिनांक 19/05/2015 महसुल व वन विभाग अन्वये गौण खनिज रक्क़म रुपये 141.34 प्रमाणे परिगणना करणे आवश्य़क असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

9) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.428/वित्त-9, दिनांक 30/12/2008 अनुसार कंत्राटाचे मुल्यानुसार 5.00 लक्षपर्यंत 100/-, प्रमाणे निविदा फी वसुल करावयाची आहे. त्याप्रमाणे कामाच्या नस्तीत संबंधित ठेकेदारांकडून निविदा फी वसुल करण्यात आली असल्याबाबत वसुल पावती/भरणा चलन जोडलेले नाही. तरी नियमाप्रमाणे निविदा फी वसुल करण्यात आली असल्याची साधार खात्री पटविण्यात यावी.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परीपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.109/रा.म.2, दिनांक 22/03/2005 मधील 2 अ,ब,क प्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच कामावर वापर केलेले साहित्य़ व कॉंक्रीटीकरणाचे साहित्याचा चाचणी अहवाल कामाचे अंतिमिकरण झालेनंतरचा असल्याने 0.5 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 2,058/- संबंधीतांकडुन वसुल करावी.

**4.120 रा.मा. 5 ते वडदे शिर्वे जोड रस्ता ग्रामा.- 9/0/00 ते 3/700 पर्यंत रस्त्याची दुरस्ती करणे.**

**पंचायत समिती नवापूर, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,95,947/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नवापूर तालुक्यातील रस्ता बार चार्टनुसार Vr. No. 09 नुसार SH-5 to Vadade, Shirve Joint Road रस्त्याची मुळ लांबी 0.00 ते 0.2 असल्याची नोंद आहे. तथापि, सदर रस्त्याची दुरुस्ती 0.00 ते 3.700 करुन रक्कम अदा करण्यात आलेली आहे. मुळ बार चार्टनुसार रस्त्याची लांबी 0.00 ते 0.2 असतांना 1.700 मीटर लांबीचा जास्तीचा रस्ता नसतांना दुरुस्ती कशी केली याचा खुलासा करावा. त्यामुळे 1.700 मीटरचे कामच झालेले नाही असे दिसून येते त्यामुळे त्यावर झालेला खर्च रुपये 1,35,976/- वसुल करण्यात यावा.

2) अंदाजपत्रकातील Item No 9 नुसार shooting still photography साठी रुपये 152/- ची तरतुद करण्यात येऊन देयकात अदा करण्यात आलेला आहे. तथापी नस्तीनुसार फोटो कॉपी लावण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे अदा रक्कम रुपये 152/- वसुल करण्यात यावेत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- जिपर-200/प्र.क्र.180/पंरा-5, दिनांक 31/12/2009 अन्वये कामाचे आदेश देतांना त्यामध्ये कामाचा दोष उणिवा दायित्व कालावधी नमुद करणे आवश्यक आहे. संबंधीत कंत्राटदाराकडून निविदा करारातील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास तसेच कामाचा गुणात्मक दर्जा राखला न गेल्यास संबंधीत कंत्राटदारावर महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण -05/06/प्र.क्र.53/ इमा-2,दिनांक 28/09/2006 अन्वये कारवाई करणेबाबत तरतुद असतांना पंचायत समिती बांधकाम विभाग यांचेकडुन देण्यात आलेल्या कामाचे आदेशात उपरोक्त प्रमाणे बाबी नमुद करण्यात येत नाहीत.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 परिशिष्ट 24 चा 13 व 15 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये सदर कामाचे प्रदान झाल्यानंतर लालशाईने क्रॉस करणे आवश्यक असतांना कामाबाबत तशी कार्यवाही केलेली नाही.

5) कामांवर वापरण्यात आलेल्या साहित्याची टेस्टींग करुन वापर करणे आवश्यक असतांना टेस्टींग रिपोर्ट प्राप्त न करता सदर रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

6) काम पुर्ण झाल्यानंतर तालुक्याच्या रस्त्यांचा बार चार्ट नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असतांना तशी नोंद घेण्यात आलेली नाही.

**4.121 पंचायत समिती सेसमधून पथदिवे (हायमास्ट) बसविणे.**

**पंचायत समिती जळगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10 ते 20) -** 11 कामावर पथदिवे बसविण्यासाठी रक्कम रुपये 19,89,611/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार वाढीव कामास मान्यता घेतलेली नाही.

2) पथदिवे (हायमास्ट) बसविले नंतर कार्यान्वीत झालेबाबत त्रयस्थ विज तांत्रिक यंत्रणेचे चाचणी अहवाल प्राप्त केलेले नाहीत. तसेच जिल्हा परिषदेचे/शासनाचे ऊर्जाअधिकारी यांचेकडून पथदिवे कार्यान्वीत झालेबाबत आणि सुस्थितीत चालू असलेबाबत प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.29/98 शासन हमी दिनांक 19/08/1998 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- जि.प.2/2000/ प्र.क्र.837/ पं.रा.8(35) दिनांक 15/09/2003 तसेच विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि/ 1/ 1801/ सीआर/जि.प.संकीर्ण दिनांक 30/07/2002 नुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत पंचायत समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते कधी पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती नमूद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अट/शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही. पथदिवे कार्यान्वीत झालेनंतर मक्तेदाराने देखभाल दुरुस्तीबाबत कोणतीही हमी दिल्याचे दिसून आले नाही.

5) शासन निर्णय क्रमांक स्थाविका/2003/प्र.क्र.369/का-1445, दिनांक 28/11/2003 नुसार रक्कम रुपये 20,000/- चे वरील कामाचे माहितीफलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये, असे आदेश असतां मोजमाप पुस्तीकेत नमूद केलेनुसार कामाचे माहितीचा फलक, खर्च नोंदविला आहे. तथापि, सबब कामाचा माहिती फलक अंदाज पत्रकात नमुद असतांना सदरची बाब मोजमाफ पुस्तीकेत नोंद न घेता मक्तेदारास रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. अंदाज पत्रकात कामाचा माहिती फलक बसविणे अशी बाब नमुद असतांना फलक बसविलेला नसल्याने एकूण 11 कामांची रक्कम रूपये 33,539/- वसुलीस पात्र ठरते.

6) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 अन्वये विदयुत साहित्य तपासणी बाबतचा शासकीय प्रयोग शाळेकडून गुणवत्ता व चाचणी अहवाल काम सुरु करणे अगोदर घेणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही. उपरोक्त कामाची नस्ती, प्राकलन, मोजमाप पुस्तीका, तपासणीस उपलब्ध न झालेने नमुद काम प्रशासकीय, तांत्रिक मंजुरीने बाब निहाय तंतोतंत झाल्याची पडताळणी करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए- 1093/ प्र.क्र.1516 (भाग 2)/ 33 दिनांक 27/06/2000 नुसार कामाचे तुकडे करता येत नाही. तथापि, सदर कामाचे तुकडीकरण करण्यात येवून तसे वेगवेगळे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

8) आयकराची रक्कम रूपये 27,980/- वसूल केलेली नाही.

**4.122 मौजे नेरि दिगर, तालुका जामनेर अतंर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण बांधकामातील अनियमितता.**

**पंचायत समिती जामनेर, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,99,732/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप/2009/ प्र.क्र.180/ पंरा 8, दिनांक 31/12/2009 नुसार कामाचे निविदेमध्ये दोष निवारण कालावधी तंतोतंत नमुद करणे आवश्यक आहे व त्यानुसार काम पुर्ण झालेनंतर कंत्राटदाराने दोष निवारण कालावधीमध्ये रस्त्यांचे देखभाल व दुरुस्ती त्याचे स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक आहे व दोष निवारण कलावधी कामाचे ठिकाणी लावलेल्या माहिती फलकामध्येही स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे. तथापी याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही संयुक्तीक खुलासा सादर करावे.

2) लेखा संहिता नियम 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांची 5 टक्के व उप अभियंता यांची 100 टक्के तपासणी आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- झेडपीए/ 2000/ प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 या शासन निर्णयातील बाब क्रमांक 13 नुसार काम पुर्ण झाल्यावर काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. पुर्तता दर्शवून अनुपालन दर्शवावे.

4) अंदाजपत्रकात तरतुद केलेली रक्कम रुपये 7,003/- ही दक्षता व गुणनियंत्रक सीमितीने तपासणी केली असता प्रदान करावयाची आहे असे असतांना रुपये 7,003/- ग्रामपंचायतीला प्रदान केले जादा प्रदान रुपये 7,003/- वसुल करुन शासन खाती भरणा करावा. तसेच अशाप्रकारे इतरही कामात प्रदान झाले असण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे तपासणी करुन वसुली करावी.

**4.123 पहाण येथे रस्ता कॉंक्रीटीकरण**

**पंचायत समिती पाचोरा, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,95,039/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 146 नुसार आदेश देणेपुर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात व ते कैंव्हा पुर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती करणे आवश्यक आहे करारातील कोणताही अटी/शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी, तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका

1984 नियम 193(1) नुसार कंत्राटाच्या अटी नेमक्या व सुनिश्चित असल्या पाहिजेत विभागाने हया नियमाप्रमाणे परिपुर्ण असा करारनामा न करता अत्यंत त्रोटक अशा प्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 118 नुसार कार्यकारी अभियंत्याच्या मान्यतेशिवाय फेरफार करणार नाही, तसेच नियम 153(1)(2) व नियम 156 अन्वये मक्तेदाराने प्राकलनानुसार काम करणे आवश्यक आहे. नियम 120 नुसार एका कामात झालेली बचत इतर कामासाठी वापरता येत नाही, असे असतांना देखील वाढ/घट तक्त्यानुसार अधिक खर्च पुर्व परवानगीशिवाय करण्यात आलेला आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप/2009/ प्र.क्र.180/ पंरा 8, दिनांक 31/12/2009 नुसार कामाचे निविदेमध्ये दोष निवारण कालावधी तंतोतंत नमुद करणे आवश्यक आहे व त्यानुसार काम पुर्ण झालेनंतर कंत्राटदाराने दोष निवारण कालावधीमध्ये रस्त्याचे देखभाल व दुरुस्ती त्याचे स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक आहे व अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे माहिती फलक लावणे आवश्यक आहे. तथापि, नस्तीसोबत जोडलेल्या फोटोमध्ये माहिती फलक दिसुन येत नाही. सबब माहिती फलकाकरीता अदा करण्यात आलेली रक्कम रुपये 2,523/- वसुलपात्र आहे. शासन निर्णयानुसार कार्यवाही केले बाबतचे अनुपालन सादर करावे अथवा रक्कम रुपये 2,523/- वसुल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

4) सिमेंट कंझम्शन स्टेटमेंट नुसार सिमेंट वापरलेले आहेत. तथापी नस्तीसोबत बील जोडलेले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 191 नुसार पुर्ण करण्यात आलेल्या कामाचा नकाशा ठेवणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.फी.एम-099/प्र.क्रं.54/08, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) सदर कामाची नोंद नमुना नंबर 39/40 नोंदवहीत नोदवून लेखापरिक्षणात पुर्तता दर्शवावी.

8) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 144 अन्वये ग्रामपंचायतीने घेतलेल्या कामांची सुरक्षा अनामत रक्कम कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- विकास-2011/प्र.क.217/ पं.रा.8, दिनांक 15/11/2011 मधील अनुक्रमांक 5 मध्ये योजनेंतर्गत होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ व्हावीत यासाठी सध्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता समन्वयक यांचे अधिपत्याखालील पॅनेलवरील राज्य गुणवत्ता नियंत्रक यांचेकडून संबंधित जिल्हा परिषदेने कामाची तपासणी करुन घ्यावी. यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1 टक्का या दराने मोबदला देण्यात यावा व ही रक्कम कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भुत करावी असे नमुद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 207 नुसार गोळा केलेली सर्व खडी नमुना नंबर 77 मधील खडी विवरणात नोंदली जाईल. तसेच आवश्यकतेपेक्षा जास्त खडी गोळा करण्यात आलेली नाही व गोळा केलेली खडी खराब झालेली नाही. त्याची ठरावीक मुदतीने तपासणी केली जाईल व त्याचा अहवाल नमुना नंबर 78 मध्ये नोंदले जातील असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.124 शालेय पोषण आहार खर्चाबाबत. (राज्य निधी)**

**पंचायत समिती पाचोरा, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 41) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,30,25,498/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत रुपये 2,55,74,381/- अनुदान प्राप्त झालेले असून योजनेवर रुपये 2,30,25,498/- खर्च झालेला आहे व रक्कम रुपये 25,48,883/- अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2015/प्र.क्र.177/एसडी-3, दिनांक 12/10/2015 नुसार दुपारचे जेवण योजनेंतर्गत इयत्ता 1 ते 5 वीच्या विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिनेयुक्त व इयत्ता 6 ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारात घटक असणे आवश्यक आहे. तथापि, आहाराची प्रयोग शाळेकडून तपासणी अहवाल घेतलेला नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार विदयार्थ्यांना त्याच प्रमाणात आहार देण्यात आल्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक म.आ.क्र./0099/प्र.क्र.36/99, विनियम दिनांक 28/10/2004 अन्वये दुबार देयके प्रतिबंधक नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबारा प्रदानाची खात्री करता आली नाही.

3) गटाने वित्तीय वर्षामध्ये उचलेल्या धान्यांच्या हिशोबाची गट स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, शासन पुरकपत्र क्रमांक शापोआ 2006/8201/06 प्र.शि.-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रतिदिन विद्यार्थ्यांना उपस्थित असल्याची संख्यानुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वाटप केल्याबाबत संबंधीत मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त केलेला नाही.

5) दर दिवशी प्रति विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करुन त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) पंचायत समितीकडून शाळा स्तरावर वेळोवेळी भेटी देऊन शासन निर्णय क्रमांक शापोअ 2009/प्र.क्र./136 प्र.शि.-4, दिनांक 18/06/2009 मधील खर्चानुसार जमा असलेल्या पोषण आहाराचा पाहणी अहवाल नस्ती आढळून आली नाही.

7) प्राथमिक शाळेवर खिचडीसाठी लागणारी साहित्याची प्रत्येक महिन्यांत गोषवारा काढलेली शिल्लक साहित्य दर्शविले जात नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 29(4) नुसार रुपये 500/- वरील रक्कम प्रदान धनादेशाव्दारे करणे आवश्यक असतांना रोखीने दिली जाते.

9) ग्रामसमिती अध्यक्षांची रोखपुस्तकात स्वाक्षरी घेतली जात नाही.

10) शालेय शिक्षण क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोअ 2004/155/04, दिनांक 31/03/2005 अन्वये इंधन मंजूरी व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक वेळा अंडी, बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅल्शियम आयर्न गोळया देण्यांचा निर्देशाप्रमाणे कोणत्याच शाळेने नियमाचे पालन केलेले नाही.

11) रक्कम रुपये 25,48,883/- अखर्चित असल्याने सदर रक्कमांचा वर्ष निहाय गोषवारा काढण्यात न आल्याने अखर्चित निधी कोणत्या वर्षापासुन आहे याबाबत पडताळणी करता आली नाही.

**4.125 मांदुर्णे येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे.**

**पंचायत समिती चाळीसगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12)** - सदरबाबत रक्कम रुपये 2,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) बाब क्रमांक 2 Providing dry trap rubble15cm to 20cm एकूण परिमाण 59.53 घनमीटर आणलेले आहे. गौणखनिजाची परिगणना करतांना पर घनमीटर 1.25 ने करणे आवश्यक असतांना ती प्रति घनमीटर 1 प्रमाणे केल्याने 0.25 ने कमी आकारणी केली आहे. वापरलेले परिमाण 59.52 घनमीटरसाठी रक्कम रुपये 2,103/- गौणखनिज कमी वसुल करणेत आला आहे.

3) बाब क्रमांक 2 Providing dry trap rubble15cm to 20cm सदर बाबीसाठी दर Road works चा दरपृ:थकरण करून रक्कम रुपये 226.11 घेणे ऐवजी Building works चा दरदरपृ:थकरण करून रक्कम रुपये 390.93 प्रमाणे घेतल्याने केलेले परिमाण 59.52 घनमीटर साठी रक्कम रुपये 9,810/- जादा प्रदान झाले आहे.

4) कार्यारंभ आदेशावर कामाची मुदत किती हेही नमुद नाही. त्यामुळे मुदत किती होती काम मुदतीत पुर्ण झाले किंवा कसे, हे समजु शकले नाही. सदर अनियमितता झालेली आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण झालेल्या कामाची नोंद व त्यावर झालेला खर्च नोंदविणे आवश्यक आहे. परंतु, सदर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

**4.126 पिंपळवाड नि. ते माळशेवगे रस्ता दुरुस्ती करणे.**

**पंचायत समिती चाळीसगाव**, **जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,89,998/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- झेडपीए-2002/प्र.क्र. 44/ 33 दिनांक, 22/12/2000 नुसार काम पुर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना नबंर 69 मध्ये पूर्ण झालेल्या कामाची नोंद व त्यावर झालेला खर्च नोंदविणे आवश्यक आहे. परंतु, सदर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) कामाचा बोर्ड लावणेसाठी अंदाजपत्रकात तरतुद करणेत आलेली होती. त्याप्रमाणे देयकामध्ये बोर्ड लावणेसाठी रक्कम रुपये 3,049/- व फोटो साठी रक्कम रुपये 228/- अशी एकूण रक्कम रुपये 3,277/ ठेकेदारास प्रदान केले आहे. परंतु, नस्ती सोबत फोटो नसल्याने अदा केलेली रक्कम मान्य करता येत नाही. तरी रक्कम वसुल करणेत यावी.

4) नस्ती सोबत चाचणी अहवाल नाही.

5) बाब क्र.1 Cutting dwon the road side thorney bushes (wedibabhul) साठी परिमाण 1501 दर रुपये 6/- प्रमाणे रक्कम रुपये 9,009/- प्रदान केले आहे. परंतु Rd-1-1.General नुसार सदर बाबीचे स्वतंत्र प्रदान करणे आवश्यक नव्हते. त्यामुळे सदर बाब लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही. रक्कम वसूल करणेत यावी.

6) बाब क्रमांक 2 Excavation for catch/side water gutter in all. सदर बाबीसाठी केलेले परिमाण 1242 घनमीटर असुन D.S.R. नियमानुसार 500 घनमीटरच्या पुढे खोदाई करावयाची असल्यास मशनरीचा दर रक्कम रुपये 37/- घेणे आवश्यक असतांना मानवी खोदाईचा दर रक्कम रुपये 110/- घेतल्याने रुपये 73/- प्रमाणे परिमाण 1242 घनमीटरसाठी रक्कम रुपये 90,666/- जादा प्रदान झाले आहे. रक्कम वसूल करणेत यावी.

**4.127 मौजे तळई ते भालखेडे रस्त्याच्या साईडपट्टया दुरुस्त करणे.**

**पंचायत समिती एरंडोल, जिल्हा जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदरबाबत रक्कम रूपये खर्च 2,90,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमूद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

2) लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार वाढीव कामास मान्यता घेतलेली नाही.

3) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.29/98 शासन हमी दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक जि.प.2/2000/प्र.क्र. 837/पं.रा. 8(35) दिनांक 15/09/2003 तसेच विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि/ 1/ 1801/ सीआर/ जि.प.संकीर्ण दिनांक 30/07/2002 नुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत पंस.कडे सादर करणे आवश्यक आहे. नोंदणी नसलेल्या मक्तेदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर

वसुल करणे आवश्यक आहे.आणि नोंदणी कृत असलेल्या मक्तेदाराकडून 4 टक्के मुल्यवर्धित कर वसुल करणे आवश्यक असतांना 2 टक्के मुल्यवर्धित कर रुपये 5,800/- कमी कपात केलेला असून सदरची रक्कम वसुलीस पात्र ठरते.

4) अंदाजपत्रकासोबत शासकीय कॉरी चार्ट जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे कामासाठी साहित्य शासकीय खाणीवरुन आणल्याबाबत पडताळणी करता येत नाही

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए-1093/ प्र.क्र.1516(भाग 2)/ 33 दिनांक 27/06/2000 नुसार कामाचे तुकडे करता येत नाही. तथापि सदर कामाचे तुकडीकरण करण्यात येवून तसे वेगवेगळे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सोबत परिशिष्टाप्रमाणे अ.क्र. 6,9 आणि परिशिष्ट अ.क्र. 1,2,9,14 कामांचे तुकडीकरण करुन मोठी अनियमीतता केलेली आहे. प्रशासकीय व तांत्रीक मान्यता देतांना अडचणी येवू नयेत म्हणून संबधीतांनी कामाचे तुकडीकरण केलेचे दिसून येते.

6) शासन निर्णय क्रमांक स्थाविका/2003/प्र.क्र. 369/का-1445, दिनांक 28/11/2003 नुसार रक्कम रुपये 20,000/- चे वरील कामाचे माहितीफलक बसविल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये, असे आदेश असताना प्राकलनात नमुद केले नुसार कामाचे माहितीचा फलक, खर्च नोंदविला आहे. माहिती फलकाची रक्कम रु 2973.88 वसुलीस पात्र ठरते.

7) 13 वा वित्त आयोगातून रस्ता बांधकाम केलेले असून बांधकाम उपविभागाकडे कडेस 15 मैल मजूर कार्यरत असून त्यांना रस्ता निहाय नेमूण रस्त्याच्या बाजूची काटेरी झाले झुडपे तोडणेचे काम दिलेले असून कामाच्या अंदापत्रकात मक्तेदराला झाडे झुडपे तोडणे या बाबतची बाब समाविष्ट करून रक्कमेचे अतिप्रदान झालेले आहे. सदरची रक्कम संबधीत मक्तेदाराकडून वसुल का करण्यात येऊ नये या बाबत अभिलेख्यासह खात्री पटवावी.अन्यथा रक्कम रूपये 15,678/- वसुल करुन योग्य खाती भरणा करावी.

**4.128 मौजे बोरगांव बु. ते बांभोरीकडे जाणारा रस्ता तयार करणे (13 वा वित्त आयोग)**

**पंचायत समिती धरणगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,99,315/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमुद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

2) लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार वाढीव कामास मान्यता घेतलेली नाही.

3) लेखा संहिता 1968 चे नियम 153(1)(2) 156 प्रमाणे मंजूर आराखडयाप्रमाणे काम करणे आवश्यक असताना तसे काम केलेले नाही.

4) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबंधीत कामाचा व त्याअनुषंगाने कामगारांचा विमा उतरवुन सदर विमापत्राची प्रत पंचायत समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) नुसार आदेश देणेपुर्वी कराररनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडुन कामाची सुरुवात व ते कधी पुर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अट/शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी. तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही.

6) अंदाजपत्रकासोबत शासकीय कॉरी चार्ट जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे कामासाठी साहित्य शासकीय खाणीवरुन आणल्याबाबत पडताळणी करता येत नाही. नमुद कामाचे साहित्याचे तपासणी अहवाल प्राप्त केलेले नसल्याने संबंधीतांकडुन चाचणी अहवाल तपासणीची रक्कम रुपये 997/- वसुलीस पात्र ठरते.

7) बाब क्रमांक 2 कठीण मुरुमाचा पुरवठा करणे/बाब 1/60 एमएम खडी पुरवठा करणे या बाबींकरीता एकूण लिड रक्कमेतुन 5 किलोमीटर लिड वजा करुन उर्वरीत लिड देणे आवश्यक असतांना (मुळदरात बांधकाम सुची

प्रमाणे 5 किलोमीटर लिड समाविष्ट आहे.) संबंधीतांनी पुर्ण 10 किलोमीटर लिड देऊन अनियमितता केल्याचे दिसुन येते. एकूण रक्कम रुपये 58,395/- वसुल करणे आवश्यक आहे.

8) उपरोक्त कामाच्या देयकातून आयकराची रक्कम 4,584/- वसुल करुन शासकीय लेखाशिर्षात भरणा केलेली नाही.

**4.129 मौजे पष्टाणे ते धानोरा रस्ता तयार करणे.**

**पंचायत समिती धरणगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदर बाबत रक्कम रुपये 1,63,350/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार वाढीव कामास मान्यता घेतलेली नाही.

2) लेखा संहिता 1968 चे नियम 153(1)(2) 156 प्रमाणे मंजूर आराखडयाप्रमाणे काम करणे आवश्यक असताना तसे काम केलेले नाही.

3) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबंधीत कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवुन सदर विमापत्राची प्रत पंचायत समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) नुसार आदेश देणेपुर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडुन कामाची सुरुवात व ते कधी पूर्ण होईल अशा विविध प्रकारच्या अटी/शर्ती नमुद करणे आवश्यक आहे. करारातील कोणतीही अट/शर्त भंग केल्यास दंडात्मक कारवाईची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी. तशी पध्दत अवलंबण्यात आलेली नाही.

5) अंदाजपत्रकासोबत शासकीय कॉरी चार्ट जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे कामासाठी साहित्य शासकीय खाणीवरुन आणल्याबाबत पडताळणी करता येत नाही.

6) बाब क्रमांक 1 काटेरी झाडे झुडपे तोडणे या बाबीकरीता रूपये 2,641.14/- इतका खर्च नोंदविलेला असुन नमुद काम करण्याकरीता पंचायत समितीकडील कार्यरत मेल मजुरांकडून होणे अपेक्षित असतांना कंत्राटदाराला नमुद बाबीं करीता रक्कम प्रदान करणे योग्य नाही. रस्त्याचे बांधकाम स्पेसिफिकेशन बुक (आर डी बुक) मध्ये नमुद बाबींचा कोठेही उल्लेख नसतांना कंत्राटदाराला रक्कमेचे अतिप्रदान झालेचे दिसून येते. नमुद बाबीचे काम मेल मंजुराकडून का करण्यात आलेले नाही. याबाबत स्पष्टीकरण सादर करावे. रक्कम नियमाप्रमाणे वसुलीस पात्र ठरते.

7) बाब क्रमांक 4 कठीण मुरुमाचा पुरवठा करणे/बाब 3/60 एमएम खडी पुरवठा करणे या बाबींकरीता एकूण लिड रक्कमेतुन 5 किलोमीटर लिड वजा करुन उर्वरीत लिड देणे आवश्यक असतांना (मुळदरात बांधकाम सुची प्रमाणे 5 किलोमीटर लिड समाविष्ट आहे.) संबंधीतांनी पुर्ण 10 किलोमीटर लिड देऊन अनियमितता केल्याचे दिसुन येते. एकूण रक्कम रुपये 31,426/- वसुल करणे आवश्यक आहे.

8) उपरोक्त कामाच्या देयकातून आयकराची रक्कम रूपये 3,855/- वसुल करुन शासकीय लेखाशिर्षात भरणा केलेली नाही.

**4.130 कामरगाव येथील कातोरेवाडी मधील जिल्हा परिषद शाळा क्रमांक 1 च्या दुरुस्ती खर्चाबाबत.**

**पंचायत समिती अहमदनगर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15)** - कामरगांव येथील कातोरेवाडी मधील जिल्हा परिषद शाळा क्रमांक 1 च्या दुरुस्तीवर रक्कम रुपये 2,96,757/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर बांधकामाच्या 1 ते 11 बाबी मिळून रुपये 2,67,219/- इतक्या रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आलेले असून त्यापैकी बाब क्रमांक 5,7,10 बाबी कार्यान्वित केल्या नसल्याचे दिसुन आले. सदर बाबी कार्यान्वित न केल्यामुळे बांधकामाचे प्राकलीत मुल्य रुपये 1,52,607/- {2,67,219/-(-)1,14,612/-} इतके होत असल्याने, त्याअनुषंगाने कामाचे मुल्यांकन करणे आवश्यक असतांना सदर बांधकामाचे रुपये 2,67,085/- इतके मुल्यांकन करण्यात आले. त्यामुळे सदर बांधकामाच्या मुल्यांकनात 175 टक्के वाढ झाल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व

पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152(2)अन्वये सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना, तशी कार्यवाही करण्यात न आल्याने केलेला खर्च मान्य करता येत नाही.

2) सदर बांधकामामध्ये रक्कम रुपये 1,14,612/- इतक्या रक्कमेची बचत झाल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120(1) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरी शिवाय बचतीच्या रक्कमे मधुन खर्च करता येत नसतांना, सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता खर्च करण्यात आला. त्यामुळे झालेला खर्च मान्य करता येत नाही.

3) कामाचे मोजमाप पुस्तक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाले नाही.

**4.131 13 वा वित्त आयोग अंतर्गत केलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत.**

**पंचायत समिती अहमदनगर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** बांधकाम उपविभाग “अ" ”नगरच्या सन 2015-2016 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी 13 वा वित्त आयोग अंतर्गत “हायमॅक्स बसविणे” या बाबीवर रक्कम रुपये 26,82,461/- खर्च करण्यात आल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मध्ये 13 वा वित्त आयोगाच्या निधी मधून ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद या स्तरावरून हाती घ्यावयाच्या बाबी नमुद करण्यात आल्या असुन त्यामध्ये “हायमॅक्स बसविणे” या बाबींचा समावेश होत नसल्याने वरील प्रमाणकान्वये केलेला खर्च मान्य करता येत नाही. तरी झालेल्या खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

**4.132 13 वा वित्त आयोग निधीतून टाकळीमियाँ, डिग्रस,धानोरे,सोनगाव, सात्रळ, अनापवाडी, डक्रेवाडी, रामपुर, कानडगाव, तिळापूर, निंबेरे, तांदुळनेर, कोल्हार खुर्द येथे हायमॅक्स दिवे बसविणे कामी केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती राहुरी, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** अहवाल वर्षात 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी रक्कम रुपये 7,15,333/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हायमॅक्स दिवे बसविणे या कामांचा मुल्यवर्धीत कर अनोंदणीकृत ठेकेदारांकडून 5 टक्के कपात करणे आवश्यक असताना तो 2 टक्के कपात केला आहे. कमी कपात रक्कम रुपये 21,460/- वसुलपात्र असुन अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

2) आक्षेपातील नमुद कामांचा केलेला करारनामा अपुर्ण व त्रोटक आहे. कामाची मुदत लिहीलेली नाही तसेच गटविकास अधिकारी व मक्तेदार यांच्या स्वाक्ष-या नाही. दुरुस्ती कालावधी नमुद नाही. यावरुन मक्तेदाराचे हित जोपासल्याचे दिसुन येते. यामुळे करारनामा करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-विमास-1098/प्र.क्र.29/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटदाराने काम सुरु करणेपुर्वी संबंधीत कंत्राटी कामाचा व त्याअनुषंगाने कामगारांचा विमा उतरवुन सदर विमा पत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. तथापि वरील अनुक्रमांक 1 ते 4 या कामांचा विमा देयकातुन कपात करण्यात आलेला असून विम्याचा भरणा संचालनालयाकडे उशीराने करण्यात आला आहे. सदर अनियमिततेबाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

4) कामे पुर्ण करुन घेणेसाठी वापरणेत आलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल नस्तीत आढळुन आलेला नाही. सबब दर्जेदार काम झालेची खात्री करता येत नाही.

5) काही कामांचे निविदा फॉर्म संपुर्ण भरलेले नाही. तसेच मक्तेदार व कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

6) डक्रेवाडी, रामपुर, कानडगाव, तिळापुर या कामांचे हायमॅकस दिवे बसवल्याचे फोटो कामाचे नस्तीमध्ये दिसुन आले नाही.

**4.133 13 वा वित्त आयोग निधीतुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** बांधकाम उपविभाग, श्रीगोंदाने 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी रक्कम रुपये 30,88,763/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मध्ये 13 वा वित्त आयोगातुन हाती घ्यावयाची कामे नमुद असुन त्यात उपरोक्त नमुद केलेल्या हायमॅक्स दिवे बसविणे कामाचा समावेश नसताना सदर योजनेतुन नियमबाहय उपरोक्त नमुद केलेप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. 13 वा वित्त आयोगातुन हाती घ्यावयाच्या कामात समावेश नसल्याने सदर हायमॅक्स दिवे बसविणेसाठी केलेला खर्च रक्कम रुपये 30,88,763/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.134 13 वा वित्त आयोग निधीतुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पारनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** बांधकाम उपविभाग, पारनेर कडील 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन 38 हायमॅक्स दिवे उभारणी कामी लेखापरीक्षणास सादर केलेली यादी अहवालासोबत जोडण्यात आली असून सदर यादीत नमुद केल्याप्रमाणे 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी रक्कम रुपये 14,64,598/- नियमबाहय खर्च केलेला आहे. सदरबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 14/09/2016 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला असुन बांधकाम उपविभाग, पारनेरने उत्तरासह मुळ अर्धसमास पत्र परत केलेले नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मध्ये 13 वा वित्त आयोगातुन हाती घ्यावयाची कामे नमुद असुन त्यात हायमॅक्स दिवे बसविणे कामाचा समावेश नसताना सदर योजनेतुन नियमबाहय केलेला खर्च रक्कम रुपये 14,64,598/- लेखा परीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.135 13 वा वित्त आयोग निधीतुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती अकोले, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम उपविभाग, अकोले कडील 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन 14 हायमॅक्स दिवे उभारणी कामी लेखापरीक्षणास सादर केलेली यादी अहवालासोबत जोडण्यात आली असून सदर यादीत नमुद केल्याप्रमाणे 13 वा वित्त आयोग निधी खात्यातुन हायमॅक्स दिवे उभारणी कामी रक्कम रुपये 21,66,290/- नियमबाहय खर्च केलेला आहे. सदरबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 4, दिनांक 27/07/2016 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला असुन बांधकाम उपविभाग, अकोलेने उत्तरासह मुळ अर्धसमास पत्र परत केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010 / प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 मध्ये 13 वा वित्त आयोगातुन हाती घ्यावयाची कामे नमुद असुन त्यात हायमॅक्स दिवे बसविणे कामाचा समावेश नसताना सदर योजनेतुन नियमबाहय केलेला खर्च रक्कम रुपये 21,66,290/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.136 धामारी ते खैरेनगर रस्ता सुधारणा कामातील अनियमिततेबाब तालुका शिरुर.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** वरील कामाची नस्ती, अंदाजपत्रक, दरपृथ:करण, मोजपाम पुस्तकातील नोंदी व प्रमाणकाची नस्तीतील प्रत यांचे लेखापरीक्षण केले असता रक्कम रुपये 9,73,203/- खर्च नोंदविला असून लेखापरिक्षणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) बाब क्रमांक 2 providing, laying, spreding and companting stone aggregates by mechanical mean grading a)using screening crushabite type such as moorum or graveal करिता दरपृथ्थ:करणानुसार देय दर (DSR-15-16 PEAGE NO217 80BII a/ 23 morth 404) नुसार रक्कम रुपये 990/- अदा न करता सदर बाबींकरिता प्रथम देयक अदा करतेवेळी 69.43 cumt करिता रक्कम रुपये 108/- ने जादा दर अदा करण्यात आल्याने रक्कम रुपये 7498.44 अंतिम अमान्य करण्यात येत आहे. याबाबत अंदाजपत्रकाच्या तांत्रिक तपासणी समयी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 150 प्रमाणे तंत्रशाखेत परिनिरीक्षणात तपासणी न करता तसेच्या तसे दर मान्य करण्यात आल्याने सदर नियम दुर्लक्षीत करुन वरील बाबींकरिता दर मान्यतेबाबत नियमबाहयता झाल्याने रक्कम वसुलपात्र ठरते.

2) कामाच्या अंदाजपत्रकात 1) बाब क्रमांक 10 basic test of aggeegate sieve analysis-550/- 2) बाब क्रमांक 11-soil murum/ sieve analysis -550/- 3) बाब क्रमांक 12- bitumen penetration softening रूपये 2,500/- चाचणी करणेचे नमुद आहे. सदर चाचणी अहवाल नस्तीसोबत घेतल्याचे दिसून आले नाही. परंतू, देयक तपासले असता चाचणीचे रक्कम रुपये 3,600/- अदा करण्यात आल्याने लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. शासन निधीमध्ये जमा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 180 व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली, परिशिष्ट-24 (नियम-13 ते 15)नुसार लेखाशाखेने मोजमाप पुस्तकात दुसरी कर्णरेषा मारुन पुर्तता केलेली नाही.

**4.137 पिंपरखेड अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** पिंपरखेड अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे या कामांवर रक्कम रुपये 9,82,689/- खर्च नोंदविला असून सदर कामाचे लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालील अभिप्राय देणेत येत आहेत.

1) एखादया बाबीवर तरतुदीपेक्षा 25 टक्के अधिक वाढ होत असेल किंवा खर्चात रूपये 5,000/- पेक्षा वाढ होणार असेल तर महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा सहिंता 1968 नियम 114, 118, 152 (2) अन्वये त्या कामास तांत्रिक मंजुरी देणा-या सक्षम अधिका-याची निरिक्षण टिपणीद्वारे पुर्व मान्यता घेवुनच पुढील काम करावयाचे असताना या नियमाचे पालन न करता बाब क्रमांक 1 व 2 साठी विनामान्यता रक्कम रुपये 22,685.08/- खर्च केला आहे. सदरचा जादा केलेला खर्च लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही. सदरची रक्कम रुपये 22,685/- वसुल करून शासन सदरी भरणा करावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिंता 1968 नियम 120 अन्वये झालेली बचत ही कामातील इतर बाबीसाठी वापरू नये असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**4.138 झारगडवाडी नाळेवस्ती ते राऊतवस्ती रस्ता दुरुस्ती करणे.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 36) -** 13 वा वित्त आयोग योजनेतून झारगडवाडी नाळेवस्ती ते राउतवस्ती रस्ता दुरुस्ती करणे यासाठी रक्कम रुपये 97,866/- खर्च नोंदविला असून सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक- गौणखनि 10/1009/प्र.क्र.309/ब, दिनांक 11/02/2010 (मुंबई गौणखनिज उत्खनन नियम 1955, अनुसूची 1 व 2 नुसार गौणखनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची रक्कम प्रती क्यु.मी.चा दर रुपये 70.68 प्रमाणे कपात केलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन अधिसुचना नंबर 67 दिनांक 15/05/2015 अन्वये गौणखनिजाच्या वापराची स्वामित्वधनाचा दर प्रती क्यू.मी. रुपये 141.34 प्रति घन मिटर झाल्याने स्वामित्वधनाची रक्कम रुपये 15,901/- कमी वसूली झाली आहे. सदर रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

**4.139 मौजे वारुळ येथे चाचवली अंतर्गत रस्ता कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती मुळशी, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 58) -** सदर कामाचे उपलब्ध नस्तीनुसार लेखापरीक्षण केले असता पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) सदर काम करण्यास परवानगी मिळावी याकरीता ग्रामपंचायतीचा दिनांक 01/09/2014 चा अर्ज नस्तीस उपलब्ध आहे. मात्र सदर अर्ज पंचायत समितीस प्राप्त झालेबाबत आवक नोंदवहीत नोंद व अर्जावर आवक व दिनांक नमूद नाही.

2) गटविकास अधिकारी यांनी सदर काम करण्यास ग्रामपंचायत सक्षम असलेबाबतचा दाखला दिनांक 03/09/2014 चा आहे. मात्र सदर दाखल्यावर जावक क्रमांक नमूद नाही.

3) सदर कामासाठी करण्यात आलेल्या करारनाम्यावर कराराचा दिनांक नमूद नाही. त्यामुळे करारनामा काम सुरु होण्यापुर्वी केलेबाबत खात्री करता आली नाही.

4) सदर कामाची नोंद मोजमाप पुस्तिका क्रमांक 5469 मध्ये पान क्रमांक 34 ते 36 वर घेण्यात आली आहे. या मोजमापावर सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट क्रमांक 24 नुसार मोजमाप करणाऱ्या अधिकाऱ्याने दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

5) उपरोक्त कामाच्या कार्यारंभ आदेशानुसार दिनांक 10/11/2014 ते दिनांक 09/03/2015 (चार महिने) अशी आहे. सदर कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 नुसार काम विहित मुदतीत पूर्ण होत नसल्यास विहित कालावधी संपणेपूर्वी मुदतवाढ मागणी अर्ज शाखा अभियंता यांचे मार्फत किमान 1 महिनेपुर्वी कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील, असे नमूद असताना देखील सदर कामाचे ठेकेदार ग्रामपंचायत वारूळ यांनी कामास मुदतवाढ मिळणेचा अर्ज दिनांक 20/03/2015 रोजी सादर केला आहे व सदर अर्जास कार्यकारी अभियंता इ व द जिल्हा परिषद पुणे उत्तर यांचे जावक क्र. जी.प./बांध/उत्तर/लेखा 784, दिनांक 22/10/2015 नुसार 177 दिवसांच्या कालावधीसाठी प्रती दिन 10/- रुपये प्रमाणे एकूण रुपये 1,770/- दंड आकारून मुदतवाढ दिली आहे.

6) मोजमाप क्रमांक 5469 मध्ये सदर कामाच्या मोजमापाच्या नोंदी पाहिल्या असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता दिसून आल्या.

1. सदर कामाचे मंजूर प्राकलन व अंदाजपत्रकानुसार कामासाठी खालीलप्रमाणे काम करण्याचे योजीले होते. खडी / मुरूम ई. चा 15 सें.मी. ते 20 सें.मी. चा थर लांबी 63 मीटर रुंदी 3 मीटर तसेच उंची 0.15 मीटर याप्रमाणे 28.35 (63X3x0.15) घनमीटर वापर करणे तसेच M20 ग्रेड सिमेंट कॉंक्रेटचा लांबी 63 मीटर रुंदी 3 मीटर तसेच उंची 0.15 मीटर याप्रमाणे 28.35 (63X3x0.15) घनमीटर वापर करणे याप्रमाणे 63 मीटर लांबीच्या रस्त्याचे काम करण्याचे अंदाजपत्रक होते.

2. सदर कामासाठी फक्त 43.10 मीटर पर्यंतच खडी / मुरूम पसरवण्यात आला मात्र कॉंक्रिटीकरण 46.70 मीटर पर्यंत करण्यात आले. 43.10 मीटर नंतर केलेले 3.60 मीटर चे कॉंक्रिटीकरण हे खडी / मुरूम न पसरवता करण्यात आले असल्याने ते व्यर्थ आहे.

3. सदर मंजूर काम हे 63 मीटर लांबीचे असताना 46.70 मीटर लांबीचा रस्ता केला आहे. मंजूर प्राकलनापेक्षा 16.30 मीटर कमी लांबीचे काम करण्यात आले असतानाही अंतिम देयक अदा करण्यात आले आहे.

**4.140 पंचायत समिती मावळ येथे रेकॉर्ड रुमसाठी शेड बांधणे व पंचायत समिती मावळ येथे रेकॉर्ड रुमसाठी आवश्यक इतर दुरुस्ती करणे या एकाच कामाची विभागणी करुन केलेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती वडगांव-मावळ, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती मावळ, सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामांच्या प्रशासकीय मान्यतेनुसार बांधकाम एकात्मिक बालविकास विभागाच्या शेजारील मोकळ्या जागेत करण्यासाठी मान्यता मिळाली असताना बांधकाम इतरत्र केलेले आहे.

2) नियमानुसार रक्कम रुपये 50,000/- वरील कामांची विभागणी करू नये असे नमूद असताना नियमांचे उल्लंघन झाले आहे.

3) मोजमाप पुस्तकांचे लेखापरीक्षण केले असता काम क्रमांक 1 मध्ये बाब क्रमांक 1 नुसार अंतर्गत सिमेंट प्लास्टर करणे कामी विंडो सील करीता केलेल्या प्लास्टर कामामध्ये अंकगणितीय चुकांमुळे जादा अदाई झालेचे दिसून येते. विंडो सील मध्ये 0.55 चौ.मी. होत असताना 5.59 चौ.मी. नुसार अदाई झाली आहे. त्यामुळे जादा रक्कम रुपये 1,705/- वसूल करावी. तसेच याच कामातील बाब क्रमांक 2 नुसार नीरु प्लास्टरकरीता जादा अदाई रक्कम रुपये 130/- वसूल करावी.

4) काम क्रमांक 1 मधील बाब क्रमांक 16 नुसार वॉटरप्रुफ सिमेंट कलरचे काम केले आहे. मात्र सदर काम करताना दरवाजा व खिडक्या यांच्या क्षेत्रफळाच्या वजावटी न दाखवल्यामुळे जादा अदाई झालेली आहे.

5) काम क्रमांक 2 मध्ये बाब क्रमांक 1 नुसार विटांच्या भिंतीचे बांधकाम केलेचे दिसून येते. मात्र सदर काम करताना दरवाजा व खिडक्या यांच्या क्षेत्रफळाच्या वजावटी न केल्यामुळे जादा अदाई झालेली आहे. खिडक्यांसाठीची जादा अदाई रक्कम रुपये 14,280/- व दरवाज्याकरीताची जादा अदाई रक्कम रुपये 4,929/- वसूल करावी.

6) काम क्रमांक 2 मध्ये बाब क्रमांम 4 नुसार वाळू प्लास्टरचे काम केले आहे. मात्र सदर काम करतांना दरवाजा व खिडक्या यांच्या क्षेत्रफळाच्या वजावटी न दाखवल्यामुळे जादा अदाई झालेली आहे. रक्कम रुपये 6,632/- (14.86 x दर 446.30) वसूल करावी.

### 4.141 कोंढवली येथील शिंगटेवस्ती सिध्देश्वर मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व गटर बांधकाम करणे.

**पंचायत समिती वाई, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती वाई बांधकाम विभागाने लेखाशीर्ष 2515 मधून ग्रामपंचायत कोंढवली येथील शिंगटेवस्ती सिध्देश्वर मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व गटर बांधकामाकरिता प्रमाणक क्रमांक 54, दिनांक 26/06/2015 रक्कम रुपये 9,75,978/- अन्वये खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मान्यता पाहता मुळ मंजूर काम कोंढवली येथील शिंगटेवस्ती सिध्देश्वर मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व गटर असून त्यामध्ये सुधारीत प्रशासकीय मंजूरी दिनांक 11/09/2014 नुसार बदल केला आहे.

कामातील बाब क्रमांक 4 वरील बचत बाब क्रमांक 2 व 3 वर वापरण्यात आलेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील 120 नुसार एखादया बाबीवर बचत करुन दुसऱ्या बाबींवर खर्च करता येत नसताना कमी जादा खर्च झाला आहे.

2) कामाच्या नस्तीसोबत शिंगटेवस्ती ते सिध्देश्वर मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या नोंदीचा ग्रामपंचायत नमुना नंबर 26 च्या उताऱ्याला सदर रस्त्याची लांबी 200 मीटर आहे असे असतांना 222 मीटर लांबीचे अंदाजपत्रक कशाचे आधारे केले तसेच सदर नमुना नंबर 26 ला 200 मीटर लांबीचा रस्ता असतांना 222 मीटर लांबीचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिली आहे. प्रत्यक्ष काम करताना मोजमाप पुस्तक क्रमांक 4106 पान क्रमांक 81 ते 87 वर सदर काम 250 मीटर लांबीचे झालेचे नोंद आहे. अंदाजपत्रकानुसार 222 मीटरसाठी रुपये 9,76,069/- खर्चाची तरतूद असल्याने प्रतिमीटर रुपये 4396.70 एवढा खर्च अपेक्षित आहे. तथापि, मुळ नमुना नंबर 26 मध्ये 200 मीटर लांबीची नोंद आहे असे असताना मोजमाप पुस्तिकेत 250 लांबीचे काम केल्याची मापे नोंदल्याने 50 मीटर लांबीचे रुपये 4,396.70 प्रमाणे रक्कम रुपये 2,19,835/- अतिप्रदान झाले आहे. सदर रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

### 4.142 मौजे फलटण येथे सामाजिक सभागृह बांधणे.

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत तीन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 14,53,362/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे लेखाशिर्ष 2515 इतर ग्रामीण विकास कार्यक्रम असे असल्याने ग्रामपंचायत स्तरावर खर्च होणे अनिवार्य आहे. असे असताना नगरपरिषद हद्दीत काम केल्याचे आढळते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 132 अन्वये हद्दीमध्येच काम करणे अनिवार्य आहे. अपवादात्मक स्थितीत हद्दीबाहेरील काम करणेपूर्वी आयुक्त यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) सदर कामाची प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता उपलब्ध नाही. सदर काम मौजे फलटण येथे केलेचे नमूद आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 अन्वये तसेच लेखा संहिता नियम 100 अन्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली नसल्याने सदर काम नियमबाहय झाले आहे.

3) सदर काम ग्रामपंचायत हद्दीत, ग्रामीण भागासाठी असल्याने याच ठिकाणी केल्याबाबत कोणताही तपशिल नोंद नाही.

4) नस्तीसोबत जागेचा उतारा नाही. कामाचा स्थळदर्शक वर्णनपर मजकूर नाही, काम पुर्णत्वानंतर हस्तांतरण दाखला नाही.

5) मोजमाप पुस्तक देयक यावरदेखील कामाचे ठिकाण नमूद नाही.

6) सदर काम नियमातील तरतूदींच्या अधिन राहून केले नसलेने विधीग्राहय होत नाही.

**4.143 महिगांव येथे गणपतीमाळ ते कातकरी वस्ती रस्ता देखभाल व दुरुस्ती करणे.**

**पंचायत समिती जावळी-मेढा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 31/03/2016 रुपये 1,05,448/- (हस्तांतरण निधी) अन्वये खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी कार्यालय गौण खनिज वाहतुक परवान्यावर निर्गमित करणाऱ्या प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. त्यामुळे उपरोक्त गौण खनिजाची रक्कम रुपये 2,348/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-1099/प्र.क्र.54/ 8, दिनांक 20/05/1999 अनुसार कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावायचा आहे व त्यावर शासन निर्णयात नमूद केलेली माहिती लिहावयाची असून त्याबाबत प्रमाणपत्र गटविकास अधिकारी व उपअभियंता यांचे स्वाक्षरीने सादर करावायाचे आहे. तथापि तसे प्रमाणपत्र पहावयास मिळाले नाही. सबब झालेला खर्च रक्कम रुपये 5,984/- अंतिम अमान्य करणेत येत आहे.

3) मोजमाप पुस्तक क्रमांक 2424, पान क्रमांक 13, बाब क्रमांक 1 ते 14 ची एकूण रक्कम रुपये 1,05,448/- दर्शविली आहे. तथापि प्रत्यक्षात 1 ते 14 बाबींची परिगणना केली असता रक्कम रुपये 103368.33 प्रत्यक्ष रक्कम येते. तथापि ती नमूद करण्याऐवजी रक्कम रुपये 1,05,448/- रक्कम देयकामध्ये नमूद केली आहे. म्हणजेच रक्कम रुपये 2079.67 जादा प्रदान केलेले आहे. ते वसुलात आणून उपकर निधीमध्ये जमा करावी.

**4.144 सरताळे सर्जापूर रस्ता कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जावळी-मेढा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदर बाबत रक्कम रूपये 21,29,567/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप नोंदवहीतील गौण खनिज परिगणना पत्रकानुसार 1439.10 क्यु.मी. गौण खनिज वापरासाठी रुपये 1,01,702/- इतक्या गौण खनिज रकमेची वसूली देयकातून करणे आवश्यक असताना केवळ रुपये 70,502/- इतक्याच रॉयल्टीची दुसऱ्या देयकातून वसूली केलेने रुपये 31,198/- कमी वसूल रॉयल्टी वसूल करणे आवश्यक आहे.

2) सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 24,71,810/- इतकी असताना प्रत्यक्ष काम रुपये 21,29,567/- मध्येच पूर्ण करण्यात आलेने प्रत्यक्ष वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. वास्तव अंदाजपत्रक तयार केले गेले असते तर शिल्लक निधीतून दुसरे काम घेता आले असते. तथापि तशी कार्यवाही न केलेने नाहक निधी अखर्चीत राहून तो शासनास परत करावा लागला.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक दिनांक 22/12/2000 नुसार कामाची मोजमापे लिहिल्यानंतर 7 दिवसात देयके प्रदानार्थ सादर करणे आवश्यक असताना काम दिनांक 02/05/2015 रोजी पूर्ण झालेले असताना देयक अदा करण्यात 11 महिन्यांचा विलंब झालेला असून याबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.145 शेकदार मळा तालुका आटपाडी येथील शाळा इमारतीची दुरुस्ती.**

**पंचायत समिती आटपाडी, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत 2 प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 4,23,894/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पहिल्या देयकातून सुरक्षा अनामत 17,000/- रुपये कपात केली आहे. प्रत्यक्षात 21,250/- कपात करणे आवश्यक होते. उर्वरीत रक्कम रुपये 4,250/- वसूल करून घेतल्याची पावती दाखवावी.

2) सदर कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल दिनांक 05/09/2015 रोजी म्हणजेच काम पूर्ण झाल्यानंतर प्राप्त झाला आहे.

3) सदर काम पूर्ण करणेचा कालावधी चार महिने देण्यात आला होता. मक्तेदाराने दिनांक 27/08/2014 काम सुरु करुन दिनांक 26/12/2014 पर्यंत काम पुर्ण करणे आवश्यक होते. तथापि मक्तेदाराने सदरचे काम दिनांक 30/07/2015 रोजी पुर्ण केले आहे. म्हणजेच दिनांक 27/12/2014 ते 30/07/2015 अखेर एकूण 216 दिवस विलंबाने काम पुर्ण केले आहे. 216 दिवसाची रक्कम रुपये 718/- इतका दंड आकारणी करून रक्कम वसुल केली आहे.

वास्तविक महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 148(2)(ब) प्रमाणे सदरची मुदतवाढी अधिक्षक अभियंता यांच्या शिफारशीनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांची मंजुरी आवश्यक आहे. तसेच सदर विलंबाबाबत जिल्हा परिषद यांनी वित्तीय मर्यादा व त्यावर आकारण्यात येणारा विलंब आकार प्रति दिवशी रुपये 60/- प्रमाणे 216 दिवसाचा रुपये 12,960/- इतका दंड वसुल करणेऐवजी रुपये 718/- वसुल केलेला आहे. सदर दंडाची उर्वरीत रक्कम रुपये 12,242 /- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.146 विधीबाहय विकास कामे केलेबाबत.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती हातकणंगले सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात 13 वा वित्त आयोग अंतर्गत नियमबाहय विकासकामे केलेबाबत 13 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 17,37,405/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती हातकणंगले कडील सन 2015-2016 च्या 13 वा वित्त आयोग निधीचे लेखापरिक्षणात खालीलप्रमाणे धार्मिक स्थळांना मंदिर परिसर, पेव्हींग ब्लॉक, परिसर सुशोभिकरण, मंदिर परिसर रस्ता कॅाक्रिटीकरण अशा प्रकारच्या विकास कामावर खर्च नमूद आहे. 13 वा वित्त आयोगातून कोणत्या स्तरावरुन कोणती कामे करावयाची याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ/2010/प्र.क्रं. 22/वित्त 4, दिनांक 30/08/2010 मधील क II अन्वये वितरीत निधीतून पंचायत समिती स्तरावरील करावयाच्या कामाची यादी दिली आहे. त्यामध्ये सदर विकास कामांचा समावेश नसल्याचे दिसून येते.

**4.147 मौजे हेर्ले गावाअंतर्गत सोई सुविधा पुरविणे.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती हातकणंगले सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात 2515 मुलभुत सुविधा अंतर्गत सोई सुविधा कामाबाबत प्रमाणक क्रमांक 62, दिनांक 13/07/2015 अन्वये रककम रुपये 5,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामात बाब क्रमांक 1 अन्वये माती मुरुमात खुदाई 16.34 घनमीटर केलेली आहे. स्टॅन्डर्ड स्पेसिफिकेशन नुसार उपलब्ध असलेल्या माती मुरुमातील 16 टक्के मुरुम जोते भरावासाठी वापरणे आवश्यक

असताना बाब क्रमांक 2 अन्वये 51.18 घनमीटर माती मुरुम पुरवठा केला आहे. वरील माती मुरुमातील 16 टक्के म्हणजेच 2.61 घनमीटर X रुपये 462.20 प्रमाणे रुपये 1,212/- संबंधितास जादा आदा झाले आहेत.

2) बाब क्रमांक 3 अन्वये 479.12 चौमी पेव्हींग ब्लॉक्स सदर कामात वापरणेत आले आहेत. त्याचा दर रुपये 919.85 प्रति चौमी आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5/62, दिनांक 09/09/1987 मधील अ अन्वये एखाद्या बाबीचा चाचणी अहवाल उपलब्ध नसताना रककम अदाई करतेवेळी 10 टक्के रक्कम कमी करुन मक्तेदारास रक्कम अदाई करणे आवश्यक असताना सदर मक्तेदारास रक्कम रुपये 4,40,718.53 आदा केली आहे. उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे रक्कम रुपये 44,072/- वसुल होणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 153(1) व बी-1 टेडर फॉर्म मधील कलम 38(1) तरतूदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5,000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना जादा काम करण्यात आले आहे.

कामाच्या आवश्यकतेबाबत अंदाजपत्रकात मोघम तरतूद केल्याचे दिसुन येते लेखासंहिता नियम 114, 118, 120 व 152 मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे रककम रुपये 15,472/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

4) बाब क्रमांक 5 मध्ये कामाच्या ठिकाणी कामाची संपुर्ण माहिती दर्शविणारा फलक लावणेकरिता रक्कम रुपये 4,226/- अदाई केली आहे. तथापि नस्तीसोबत माहिती फलक तसेच कामाचा फोटो उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस/1099/प्रक्रं.54, दिनांक 20/05/1999 नुसार माहिती फलक न लावलेने रक्कम रुपये 4,226/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

5) बाब क्रमांक 6 नुसार 51.18 घनमीटर करीता रुपये 70.67 प्रति घनमीटर प्रमाणे गौण खनीज रक्कम रुपये 3,617/- वसुली केली आहे. महाराष्ट्र शासन, राजपत्र महसुल व वनविभाग, अधिसूचना दिनांक 11/05/2015 अन्वये रुपये 141.34 प्रति घनमीटर प्रमाणे रुपये 7,234/- वसुली होणे आवश्यक होते. फरक रक्कम रुपये 3,617/- वसुली होणे आवश्यक आहे.

6) फॉर्म नंबर 58 वर मक्तेदाराची दिनांकीत स्वाक्षरी नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 180 नुसार बिल संमत करण्यात आले त्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक नमूद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिशिष्ठ 24 नियम 15 नुसार नोंदविलेली मोजमापे स्विकारणेचे दर्शक म्हणुन मक्तेदाराची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.148 कसबा नुल तालुका गडहिंग्लज येथील अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे.**

**पंचायत समिती गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदर बाबत 23 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,79,270/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती गडहिंग्लज सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात 2515 मुलभुत सुविधा कार्यक्रम अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण कामावर 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 9,93,133/- खर्च करण्यात आलेला आहे.

1) सदर कामास तांत्रिक मंजुरी सन 2014-2015 मधील आहे मात्र कामासाठी जिल्हा दरसुची सन 2013-2014 ची वापरणेत आली आहे.

2) सदर रस्ता कामासाठी सन 2013-2014 च्या जिल्हा दर सुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन रक्कम खर्च करणेत आली आहे. प्रत्यक्षात अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ पुणे यांनी जावक क्रमांक रेशा/दरसुची/2013-14/16594/सन 2013, दिनांक 17/08/2013 अन्वये सन 2013-2014 च्या जिल्हा दरसुचीमधील कांही बाबीचे दरसुधारित केले आहेत. त्याप्रमाणे दर पृथ्थकरण न केल्यामुळे जादा खर्च झाला आहे.

वरीलप्रमाणे प्रति घनमीटर रुपये 40.46 x 74.12 घनमीटर कामाकरिता एकूण रुपये 3,000/- जादा अदाई झाली आहे. ती वसुलात आणावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस/1099/प्रक54, दिनांक 20/05/1999 नुसार बांधकामाच्या ठिकाणी संपुर्ण माहिती नमूद असणारा 4 x 4 चा फलक लावणे अनिवार्य असताना नस्तीसोबत फलक लावलेची कागदपत्रे उपलब्ध नसलेने अंदाजपत्रक रक्कम व नमुना नंबर 48 रनिंग बील मध्ये नमूद केलेली रक्कम रुपये 4,277.35 वसुली होणे आवश्यक आहे.

4) नस्तीसोबत जोडलेल्या रॉयल्टी रिकव्हरी स्टेटमेंटचे अवलोकन केले असता 775.30 घनमीटर करिता रुपये 70.67 प्रति घनमीटरप्रमाणे रुपये 54,790/- मक्तेदाराच्या देयकातून कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक होते. तथापि नमुना नंबर 58 वरील मेमोरंडम ऑफ पेयमेंट तक्त्यामध्ये रॉयल्टी पेड बाय पार्टी बाय चलन असा शेरा नमूद आहे. तथापि मक्तेदाराकडील गौणखनीज भरणा चलन नस्तीसोबत उपलब्ध न झालेने रककम रुपये 54,790/- शासनास भरणा करुन पुर्तता दाखवावी.

5) बाब क्रमांक 15 नुसार लॅब टेस्टिंग चार्जेस करिता रुपये 10,850/- देयकातून अदा आहेत मात्र उपलब्ध नस्तीस चाचणी अहवाल उपलब्ध नसलेने रक्कम रुपये 10,850/- वसुल करावी.

6) मोजमाप नोंदवही क्रमांक 115, पान क्रमांक 10 ते 19 ची तपासणी केली असता सार्वजनिक बांधकाम नियमावली 1980 चे परिच्छेद क्रमांक 24 (13 व 15) नुसार रक्कम प्रदान करताना मोजमाप नोंदवहीत त्या कामाचे दुबार प्रदान टाळण्यासाठी लाल शाईने कर्णरेषा ओढणे आवश्यक असताना ओढण्यात आलेली नाही. त्यामुळे दूबार प्रदान होणेची शक्यता नाकारता येत नाही.

**4.149 मौजे वैराग ता.बार्शी येथे काँक्रीट रस्ता करणे.**

**पंचायत समिती बार्शी, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** कामाची नस्ती / कागदपत्रे, मोजमाप नोंदवही, अंदाजपत्रके इत्यादीची तपासणीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार, आयकर आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक PN/T/PRO/85-86, दिनांक 10/04/1985 मधील अट क्रमांक 3 प्रमाणे आयकर अधिनियम 1961 मधील क्रमांक 194 (2) अन्वये कोणत्याही कंत्राटासाठी कोणत्याही कंत्राटदाराकडून (ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराजय संस्था यांच्या समावेशासहीत) आयकर कपात करणे आवश्यक आहे असे नमूद केलेले आहे. तथापि सदर आयकर कपात करावयाचा नसेल तर कलम 194 (क) (4) अन्वये संबंधित ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आयकर सुटी बाबतचे प्रमाणपत्र त्या कार्यक्षेत्रातील आयकर कार्यालयाकडून प्राप्त करणे गरजेचे आहे. असे नमूद केलेले आहे. त्यामुळे उपरोक्त कामांत संबंधित ठेकेदाराकडून रुपये 10,00,000/- एवढया रक्कमेवर x 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 20,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील नियम 148 नुसार मक्तेदाराने कामाची मूळ मुदत संपणेपुर्वी मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि कामाची नस्ती पाहता, मुदतवाढीसाठी अर्ज केलेला नाही व तसा प्रस्ताव सादर केलेला नाही. तरी सदर कामास दिनांक 01/04/2015 ते 23/03/2016 अखेर म्हणजेच 352 दिवसाचे विलंब कालावधीसाठी 1 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 10,000/- दंड वसुल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील नियम 168 नुसार कामाची मोजमापे कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी 5 टक्के तपासणी करुन मोजमाप नोंदवहीमध्ये दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाची 5 टक्के तपासणी करताना कार्यकारी अभियंता यांच्या दिनांकीत स्वाक्ष-या नाहीत. सदरचे अनियमिततेबाबत पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

4) सदर कामाच्या नस्तीसोबत गटविकास अधिकारी यांनी संबंधित मक्तेदार ग्रामपंचायत असल्याने ग्रामपंचायत सोबत रक्कम रुपये 100/- चे मुद्रांक वर करारनामा करणे आवश्यक असताना, तशी कार्यवाही केलेली नाही.

5) सदर कामावर एकूण 1091 बॅग सिमेंट वापरले आहेत. तसेच सिमेंट खरेदीच्या मूळ टॅक्स इनव्हाईस पावत्या / बिले कामाच्या नस्ती सोबत सादर केलेली नाहीत.

6) सदर कामाचे बाबतीत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील नियम 68 व 197 नुसार बांधकाम पूर्ण झालेल्या कामांची नोंद नमुना नंबर 40 मध्ये व बांधकामाच्या तपशीलासह खर्चाची नोंद नमुना नंबर 69 मध्ये घेणे आवश्यक असतां तशी कार्यवाही केलेली नाही. पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

7) सदरचे काम पूर्ण झालेनंतर ताबा प्रमाणपत्र / ताबापट्टी घेऊन सदर कामाची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. सदर बाबत कागदोपत्री पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

8) कामाचे नस्तीसोबत व्हीजीट बुक जोडणेत आलेले नाही. त्यामुळे संबंधितांनी कामावर वेळोवेळी जाऊन कामाच्या दर्जाबाबत नियंत्रण ठेवले असल्याची खात्री करता आलेली नाही.

**4.150 मौजे सिंदखेड येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे.**

**पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदर बाबत रक्कम रूपये 4,22,717/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 19 नुसार काम सुरु करण्यापुर्वी, प्रत्यक्षात काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो देयकांसोबत सादर करणे आवश्यक आाहे व त्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही. असे असताना केवळ काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो या दोन स्थितीतील फोटोशिवाय देयक कसे काय पारीत केले याचा खुलासा करुन अनुपालन करावे.

2) अंदाजपत्रकासोबत सिमेंट आवश्यकता विवरणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे सदर कामावर वापरण्यात आलेली 418 गोणी सिमेंट बरोबर व योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही. तरी आता अंदाजपत्रकाप्रमाणे सिमेंट आवश्यकता विवरणपत्र सादर करून वापर करण्यात आलेली 418 गोणी सिमेंट बरोबर व योग्य असल्याचे खात्री पटवावी. आवश्यकतेपेक्षा कमी सिमेंट वापरले असल्यास कमी वापरण्यात आलेल्या सिमेंट गोण्यांची रक्कम वसुलपात्र करावी.

3) सदर कामाचे करारनामा कामाचे कागदपत्र संचिकेमध्ये आढळले नाही. करारनामा रुपये 750 ( 5.00 लाखाचे 5 टक्के सुरक्षा अनामतचे 3 टक्के ) च्या मुद्रांकांवर करणे आवश्यक आहे. कामाचे करारनामा सादर करावे अन्यथा रुपये 750/- शासनाकडे भरणे आवश्यक आहे.

4) महसुल व वन विभागाचे दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार गौण खनिजाची वसुली रुपये 141.34 च्या दराने वसुल करणे आवश्यक आहे. कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता सन 2015-2016 मध्ये दिली आहे व देयकसुध्दा सन 2015-2016 मध्ये पारीत केले असल्याने गौण खनिजाची वसुली उक्त अधिसुचनेनुसार रुपये 141.34 च्या दराने गौण खनिजाची वसुली करणे आवश्यक आहे. परंतु या कामांवरील गौण खनिजाची वसुली रुपये 70.68 ने केली आहे. कामांवरील 232.416 घनमीटर गौण खनिजाचे रुपये 141.34 प्रमाणे रुपये 32,818/- वसुली करणे आवश्यक असताना ते रुपये 16,427/- वसुल केले गेले आहे. त्यामुळे रुपये 16,391/-(32818-16427) कमी वसुल केले गेले आहे. कमी वसुली गौण खनिजाची रक्कम रुपये 16,391/- वसुल करावे.

5) देयकांतून 2 टक्के विक्रीकर रक्कम रुपये 8,454/- कपात केले आहे. ठेकेदाराचे (मोरया कंन्स्ट्रक्शन कंपनी दुधनी) विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र कागदपत्र संचिकेत नाही. त्यामुळे 5 टक्के विक्रीकर कपात करणे बंधनकारक आहे. ठेकेदाराचे विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा उर्वरित 3 टक्के विक्रीकर रुपये 12,681/- वसुल करावे.

6) सदर कामाचे अंदाजपत्रकाप्रमाणे 156 रनिंग मीटर 3.00 मीटर रुंदीने कॉंक्रीटीकरण करणेचे असतांना प्रत्यक्षात केवळ 58.1 रनिंग मीटर काम केले आहे. सदरचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे 3 मीटर रुंदीने करणे आवश्यक असतांना ते 6, 7.50 व 15 मीटर अशा विविध रुंदीने केल्याने एम 10 कॉंक्रीटची बाब 51.15 घनमीटर व एम 15 कॉंक्रीटची बाब 38.37 घनमीटर झाले आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे 58.1 रनिंग मीटर काम 3.00 रुंदीने केले असते तर

एम 10 काँक्रीटची बाब 17.43 घनमीटर (58.1X3X0.10) व एम 15 काँक्रीटची बाब 13.944 घनमीटर (58.1X3X0.08) झाले असते. रस्ता काँक्रीटकरणाचे काम अंदापजत्रकापेक्षा जादा रुंदीने केल्याने एम 10 व एम 15 ही बाब अनुक्रमे 33.72(51.15-17.43) घनमीटर व 24.426 घनमीटर (38.37-13944) जादा झाले आहे. सदर 33.72 एम 10 बाबीचे दर रुपये 3,956.40 प्रमाणे रुपये 1,30,561/- व 24.426 एम 15 बाबीचे दर रुपये 4,960.10 प्रमाणे रुपये 1,21,155/- अशा प्रकारे एकूण रक्कम रुपये 2,51,716/- नियमबाहय प्रदान झाले आहे.

**4.151 मौजे यावली येथे लिंगायत स्मशानभूमीस कंपाउंड वॉल बांधणे.**

**पंचायत समिती मोहोळ, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,99,190/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचे कामातील बाब क्रमांक 8 यूसीआर मॅसोनरीचे काम अंदाजपत्रकानुसार 38.77 घनमीटर करणेचे असतांना प्रत्यक्षात ते 49.36 घनमीटर करण्यांत आले आहे. सदरचे काम हे अंदाजित परिमाणापेक्षा 25 टक्के पेक्षा अधिक आहे. निविदेतील अट क्रमांक 38 नुसार एखादया बाबींवरील खर्च रुपये 5000 पेक्षा जास्त / परिमाण 25 टक्के पेक्षा अधिक होत असेल तर त्यांस सुधारीत अंदाज तयार करुन कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेणे आवश्यक होते. तथापी अशी कार्यवाही न केल्याने अंदाजित परिमाणापेक्षा 10.59 घनमीटर (49.36-38.77) कामाचे दर रुपये 3213.75 प्रमाणे एकूण रुपये 34,034/- चा खर्च लेखापरिक्षणात तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

2) सदर काम हे साखर कारखाना क्षेत्रात येते म्हणून दरांमध्ये 5 टक्के जादा आकारणी केलेली आहे. परंतु सदरचे काम हे साखर कारखाना क्षेत्रात येते म्हणून जादा दर आकारणेस अधिक्षक अभियंता यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापी अशाप्रकारे मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

3) अंदाजपत्रकांनुसार सदर कामासाठी 192 गोणी सिमेंटची आवश्यकता होती. तथापी सदर कामांवर 178 गोणी सिमेंट कमी वापरले आहे. अंदाजपत्रकापेक्षा 14 गोणी सिमेंट कमी वापरल्याने काम योग्य दर्जाचे झाले आहे असे म्हणता येणार नाही. वापरण्यात आलेल्या सिमेंट गोण्यांची रक्कम तात्पूरती अमान्य करण्यात येत आहे.

4) अंदाजपत्रकानुसार कंपाउंड वॉल हे 69.59 मी असून पाया खोदाई 0.75 मी रुंद व 0.75 मी खोल खोदावयाचे होते. प्रत्यक्षात कंपाउंड वॉल (70.25 मी) पाया खोदाई 0.75 मी खोली ऐवजी 0.90 खोल खोदले आहे. त्यामुळे पाया खोदाई 7.9 घनमीटर जादा (47.51-39.51) झाले आहे. 7.9 घनमीटर जादा कामाचे दर रुपये 135.75 प्रमाणे एकूण रुपये 1,072/- जादा प्रदान झाले आहे, त्याची वसुली करण्यात यावे.

5) वरीलप्रमाणे पाया खोदाई जादा झाल्याने पायांतील दगडी बांधकाम 0.60 मी खोल करणे आवश्यक असतांना ते 0.80 मी खोल झाले आहे, त्यामुळे 0.20 मी जादा काम झाले आहे. 70.25 मी लांबीचे दगडी बांधकामाचे 0.60 मी रुंद व 0.20 मी प्रमाणे एकूण 8.40 घनमीटर काम जादा झाले आहे. 8.40 घनमीटर जादा कामाचे दर रुपये 3213.75 प्रमाणे एकूण 26,995/- जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची वसुली करण्यात यावे.

6) त्याचप्रमाणे अंदाजपत्रकाप्रमाणे वीट बांधकाम 1.25 मी उंच करणे आवश्यक असतांना ते 1.40 मी उंच बांधण्यात आले आहे. वीट बांधकाम 0.15 मी अंदाजापेक्षा जास्त उंच झाले आहे. त्यामुळे 2.43 घनमीटर (70.47 लांबी x0.23मी रुंद X 0.15 मी उंची) वीट बांधकाम जादा झाले आहे. 2.43 घनमीटर जादा कामाचे दर रुपये 4799.20 प्रमाणे एकूण रूपये 11,662/- जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची वसुली करण्यात यावे.

**4.152 मौजे मोहोळ ग्रामपंचायत कार्यालयाची देखभाल व दुरुस्ती करणे.**

**पंचायत समिती मोहोळ, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदर कामावर रक्कम रुपये 2,25,393/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रकामध्ये करण्यात येणा-या कामाचे सर्वसाधारण वर्णन (general discription) नमुद आवश्यक असतांना कामाचे सर्वसाधारण वर्णन (general discription) नमुद केलेले नाही. त्यामुळे सदर कामाची निकड होती याबाबत खात्री देता येत नाही.

2) सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक 01/03/2014 असून कामाची मुदत 2 महिने होते. दिनांक 30/04/2014 पर्यत काम पुर्ण होणे आवश्यक असतांना ते दिनांक 18/09/2015 रोजी म्हणजेच 20 महिने व 18 दिवस उशीराने पूर्ण झाले आहे. मुदतवाढ देण्यासाठी ग्रामपंचायतीचा अर्ज मुळ मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस आधी मुदतवाढीसाठी अर्ज केलेला नाही. ग्रामपंचायतीने मुदत संपल्यानंतर दिनांक 08/09/2015 रोजी मुदतवाढीसाठी अर्ज केलेला आहे. त्याआधारे दिनांक 30/09/2015 विनादंड मुदतवाढ त्यामुळे देण्यात आलेली मुदतवाढ नियमबाहय ठरते त्यामुळे काम 20 महिने व 18 दिवस उशीरा पूर्ण झाल्याबददल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मुदतवाढीसाठी दंडात्मक कार्यवाहीबाबत नियमावली नुसार मुळ मुदतीच्या 75 टक्के ते 100 टक्के कालावधीच्या मुदतवाढीसाठी प्रती दिवस रुपये 40/- प्रमाणे (रुपये 2.00 लक्ष ते 5.00 लक्ष पर्यंतचे काम) एकूण 618 दिवस (20 महिने व 18 दिवस) कालावधीचे एकुण रुपये 24,720/- इतका दंड वसुल करणे आवश्यक आहे.

3) मोजमाप पुस्तिका क्रमांक 5999 लेखापरिक्षणास सादर केले नाही. त्यामुळे कामाची मोजमापे तपासता आले नाही.

**4.153 मौजे सिध्दापूर येथे अंगणवाडी क्रमांक 2 व 3 अंबिकानगर येथे इमारत बांधकाम करणे.**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 28) -** सदर बाबत रक्कम रुपये 17,82,506/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामावर एकूण 790 बॅग सिमेंट वापरले आहेत. तसेच सिमेंट खरेदीच्या मूळ टॅक्स इनव्हाइस पावत्या/बीले कामाच्या नस्ती सोबत सादर केलेली नाहीत.

2) सदर कामाकरीता 292.23 क्यु.मी. खडी वाळू इत्यादी साहित्याचे वापरापोटी प्रति क्यु.मी. रक्कम रुपये 141.34 प्रमाणे रुपये 41,304/- इतकी सदर कामाचे देयकातून रॉयल्टी वसूल करणे आवश्यक असता रक्कम रुपये 15,846/- इतकी वसूल करण्यात आलेली आहे. तरी कमी वसूल रॉयल्टी रक्कम रुपये 25,458/- संबधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 मधील नियम 168 नुसार कामाची मोजमापे कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी 5 टक्के तपासणी करुन मोजमाप नोंदवहीमध्ये दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाची 5 टक्के तपासणी करताना कार्यकारी अभियंता यांच्या दिनांकित स्वाक्षऱ्या नाहीत. सदरचे अनियमिततेबाबत पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

4) सदर कामाचे बाबतीत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 मधील नियम 68 व 197 नुसार बांधकाम पुर्ण झालेल्या कामांची नोंद नमुना नंबर 40 मध्ये व बांधकामाच्या तपशीलासह खर्चाची नोंद नमुना नंबर 69 मध्ये घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

5) सदरचे काम पुर्ण झालेनंतर ताबा प्रमाणपत्र / ताबापट्टी घेउन सदर कामाची नोंद रस्ता नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. सदरबाबत कागदोपत्री पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

**4.154 गिरझणी हेगडेवस्ती येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.**

**पंचायत समिती माळशिरस, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर बाबत रक्कम रुपये 4,99,476/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुरी आदेशातील नियम व अट क्रमांक ब मधील अनुक्रमांक 3 नुसार समाजकल्याण अधिकारी यांच्या कामाचा तपासणी अहवाल व 10 टक्के अंतीम तिसरा हप्ता देण्याबद्दलचा आदेश देयकासोबत नाही.

2) भारत सरकार, आयकर आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक PN/T/PRO/85-86, दिनांक 10/04/1985 मधील अट क्रमांक 3 प्रमाणे आयकर अधिनियम 1961 मधील क्रमांक 194(2) अन्वये कोणत्याही कंत्राटासाठी कोणत्याही कंत्राटदाराकडून (ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराजय संस्था यांच्या समावेशासहीत) आयकर कपात करणे आवश्यक आहे असे नमूद केलेले आहे. तथापि सदर आयकर कपात करावयाचा नसेल तर कलम 194(क)(4) अन्वये संबंधित ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आयकर सुटी बाबतचे प्रमाणपत्र त्या

कार्यक्षेत्रातील आयकर कार्यालयाकडून प्राप्त करणे गरजेचे आहे. असे नमूद केलेले आहे.त्यामुळे उपरोक्त कामांत संबंधित ठेकेदाराने रुपये 49,476 x 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 9,990/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) रस्ता नोंदवही ठेवलेली नसल्यामुळे प्रत्यक्षांत असलेली रस्त्याची लांबी, रुंदी व मोजमाप पुस्तकात नोंदवलेली रस्त्याची लांबी व रुंदी सारखीच असल्याची खात्री करता आली नाही. प्रत्यक्षात रस्त्याच्या क्षेत्रफळाइतकेच रस्ता कॉक्रीटीकरण झाल्याची खात्री करता आलेली नाही.

**4.155 पाणी टंचाई अंतर्गत विहीर अधिग्रहण खर्चातील अनियमीततेबाबत.**

**पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,05,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांनी सन 2015-2016 या कालावधीत पाणी टंचाई ग्रस्त गावाकरीता पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर अधिग्रहण करण्यासाठी पंचायत समितीला रक्कम रुपये 1,05,000/- एवढे अनुदान प्राप्त झाले असून रक्कम रुपये 1,02,800/- खर्च केला आहे. तसेच रक्कम रुपये 2,200/- जिल्हा परिषदेला परत केली आहे.

1) जिल्हाधिकारी हे महाराष्ट्र भुजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी नियोजन) अधिनियम 1993 चे कलम 4 अन्वये पाण्याची टंचाई जाहीर करतात. संबंधीत नस्तीची तपासणी केली असता नांदगाव तालुक्यातील शिरपुर, वाघोडा, शिरपुर बेडा, वाढोणा रामनाथ, वेणी गणेशपुर या गावात जिल्हाधिकारी अमरावती यांनी पाणी टंचाई घोषीत केल्याचे आदेश नस्तीस आढळुन आले नाही.

2) महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम 1983 चे कलम 3 नुसार पिण्याच्या पाणी टंचाई जाहिर झालेल्या गावातील पाण्याचे स्त्रोताचे अधिग्रहण करण्यासाठी जिल्हाधिकारी किंवा सक्षम प्राधिकरणाने संबंधीत विहीरीच्या मालकाला अधिग्रहाणाच्या कालावधीसह लेखी आदेश देणे आवश्यक आहे. तहसिलदार नांदगाव खंडेश्वर यांनी एकूण 5 विहिर मालकांना अधिग्रहण आदेश दिले आहेत.

तहसिलदार यांच्या विहीर अधिग्रहण आदेशाच्या दिनांकाच्या अगोदरील कालावधीत विहीर अधिग्रहीत करण्यात आली आहे. तहसिलदाराच्या विहीर अधिग्रहण आदेशाच्या दिनांका अगोदरील कालावधीसाठी केलेले विहीरचे अधिग्रहण नियमबाहय असुन लेखापरिक्षणाला मान्य करता येत नाही. सबब सदरच्या कालावधीसाठी केलेल्या अधिग्रहण मोबदला रक्कम रुपये 75,200/- लेखापरिक्षणाला मान्य करता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र. 53/पापु 14, दिनांक 30/04/2012 नुसार सक्षम प्राधिकरण यांनी विहीर मालकामध्ये विहीर अधिग्रहण मोबदल्याच्या रक्कमेबाबत कायदेशीर करार करणे आवश्यक असतांना करारनाम्यावर सक्षम प्राधिकरण व विहीर मालकांची स्वाक्षरी आढळुन आली नाही.

4) अधिग्रहण कालावधीत विदयुत पुरवठा सुरळीत असल्याचे विदयुत वितरण कंपनी यांचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणाला उपलब्ध झाले नाही.

5) विहीर अधिग्रहण करण्यापुर्वी विहीरीला पुरेसा पाणी साठा असल्याचे भुजल सर्व्हेशन यांचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

**4.156 दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बाळापूर, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदरबाबत रक्कम रुपये 52,68,959/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपलब्ध असलेल्या मोजमाप पुस्तके व मंजुर प्राकलनापैकी काहीवर बांधकामे ठिकाण, लोकेशन नमुद नाही. काम सुरु केल्याचा दिनांक नमुद नाही, काम पुर्णत्वाच प्रमाणपत्रावर बांधकाम पुर्ण केल्याबाबत दिनांक नमुद नाही, यावरुन असे निर्दशनास येते की, केवळ मोघम स्वरुपाचे बांधकामाच्या नोंदी घेण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) सदरच्या बांधकामाची किती रक्कम ग्रामपंचायतीना देणे बाकी होते व किती दिली याबाबत तपशिल बिलावर नमुद नाही. रक्कमा दिल्यानंतर ग्रामपंचायत कडुन वेळोवेळी कामाचा खर्चाचा अहवाल घेतला नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2012/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार दोष निवारण कालावधी 2 वर्ष केलेला आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे निविदेच्या कराराच्या कलमाअंतर्गत दोष दायित्वाचा अवधी नमुद केलेला नाही. त्यामुळे दोष दायित्व अवधीमध्येच कामाची दुरुस्ती पंचायत समितीने शासनाच्या निधीतुन केलेची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाच्या दृश्य मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच दृश्य नसणाऱ्या (Hidden measurements) मोजमापाची उप अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिकाऱ्याकडुन योग्यवेळी प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्यामध्ये कामाची 5टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, अशी तपासणी केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदर बाबींचा समावेश करुन कामाची माहितीत दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

6) विक्रिकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/05/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामामध्ये मुल्यवर्धीत कर कपात केलेला नाही. मुल्यवर्धीत कर कपातीची रक्कम रुपये 2,63,448/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

7) पंचायत समितीतील लेखा विभागाकडे प्राप्त झालेली देयके बिलाची नोंदवही नमुना नंबर 12 मध्ये न नोंदविता देयके पारीत केलेली आहेत.

8) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामाचे बाबतीत आयकर 1 टक्के रक्कम रुपये 52,690/- वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

9) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. तथापि जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळया कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 165 नुसार मोजमाप पुस्तिकाची नोंदवही नमुना नंबर 53 मध्ये ठेवण्यात येईल व त्या नोंदवहीत प्रत्येक पुस्तकाचा मुद्रित क्रमांक ज्या व्यक्तिला ते देण्यात आले असेल तिचे नाव ते दिल्याची तारीख आणि ते परत मिळाल्याची तारीख दर्शविण्यात येईल तथापि पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही. पंचायत समितीकडे वापरात असलेल्या मोजमाप पुस्तिका ज्या शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यावर मोजमाप पुस्तिका संबंधितास दिल्याबाबत पृष्ठांकन दिनांक नाही. पंचायत समितीकडील काही मोजमाप पुस्तिका हया विभागाने पुरविलेल्या नसंताना खाजगीरित्या खरेदी करुन वापरात असल्याचेही लेखा परिक्षणाचे वेळी निदर्शनास आलेले आहे.

11) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/2008/ प्र.क्र.524/विघयो 1, दिनांक 14/11/2008 अन्वये प्रत्येक गावात दलिताची लोकसंख्या किती आहे या बाबीचा विचार करुन दलित वस्ती म्हणुन घोषीत करावयाची आहे. तसेच तशाप्रकारची नोंदवही पंचायत समिती स्तरावर ठेवली नाही.

**4.157 13 वा वित्त आयोग निधीतून विविध पंचायत समिती सदस्य सर्कल करिता सिमेंट बेंच खरेदी खर्चातील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती यवतमाळ, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 12,73,461/- खर्च नोंदविला आहे.

पंचायत समिती यवतमाळ येथील सन 2015-2016 चे लेखापरीक्षणा करिता 13 वा वित्त आयोगाचे रोखपुस्तक तसेच खर्च प्रमाणकाची तपासणी केली असता खालील प्रमाणकानुसार पंचायत समिती विविध सर्कल करिता सिमेंट बेंच खरेदीवर खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (C) नुसार सदर देयकातुन 2 टक्के 12,73,461 X 2 टक्के = 25,469/- आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकर कपात करण्यात आली नाही. रक्कम रुपये 25,469/- वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावी.

2) नियमानुसार 5 टक्के VAT 12,73,461 X 5 टक्के = 63,673/- रुपये वसुल करणे आवश्यक असतांना रुपये 19,735/- एवढी व्हॅट रक्कम वसुल करण्यात आली आहे. कमी कपातीची रक्कम रुपये 43,938/- वसुल करुन योग्य लेखाशिर्षात जमा दर्शवावे.

3) नस्तीची तपासणी केली असता उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस 1088/ उदयोग 6, दिनांक 02/01/1992 व दिनांक 16/07/1993 नुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवुन अधिकृत पुरवठाधारकांकडुन दरपत्रक मागविणे आवश्यक असतांना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा 2014/प्रक्र.260/पंरा 7, दिनांक 27/05/2015 नुसार रुपये 1.00 लक्षावरील सर्व साहित्य खरेदी करिता ई-निविदा प्रक्रीया करणे आवश्यक असताना तश्याप्रकारची कार्यवाही करण्यात आली नसुन पंचायत समितीचे नोटीस बोर्डवर जाहीरनामा प्रसिध्द करुन स्थानिकरित्या दरपत्रके मागविण्यात आली असुन त्यानुसार खरेदी प्रक्रीया करण्यात आली.

4) दरपत्रकाची तपासणी केली असता काही दरपत्रकावर दिनांक नमुद नसल्याचे तपासणी आढळुन आले. निविदा पाकीटावर निविदा प्राप्त दिनांक तसेच आवक क्रमांक नमुद नाही. निविदा पाकीटावर निविदा उघडण्याचा दिनांक नमुद नाही. निविदा पाकीट कोणाचे समक्ष व कोणी उघडले याबाबत स्वाक्षरी नाही.

5) प्रत्येक नस्ती सोबत गटविकास अधिकारी यांचे स्वाक्षरी असलेल्या सिमेंट बेंच खरेदीबाबत दरपत्रक मागविणेचे जाहीरनामाची प्रत जोडली नाही.

6) काही नस्ती सोबत पुरवठा आदेशाची प्रत सोबत जोडली नाही. त्यामुळे संबंधीत पुरवठा आदेश कोणत्या दिनांकास देण्यात आला साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाले किंवा कसे याबाबत तपासणी करता आली नाही.

7) साहित्याची शासकीय प्रयोग शाळेकडुन तपासणी करुन तसा तपासणी चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. परंतु तसा अहवाल नस्तीत आढळुन आला नाही. त्यामुळे साहित्य योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

8) साहित्याची साठा रजिस्टरमध्ये नोंद घेवुन विनियोग दर्शविण्यात आला नाही. त्यामुळे साहित्य वाटपाबाबत तपासणी करता आली नाही. साहित्याचे विनियोग बाबत नोंद घेवून तसे अनुपालन सादर करावे.

**4.158 13 वा वित्त आयोगाचे निधीतुन अर्जुना येथील शाळेकरिता डिजीटल साहित्य खरेदी करणे.**

**पंचायत समिती यवतमाळ, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 51,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) MAX BUSINESS SYSTEM सिकंदराबाद यांचे अर्जूना शाळेला डिजीटल साहीत्य पूरविण्याबाबत मूळ देयक प्रमाणका सोबत जोडले नाही. त्यामूळे प्रत्यक्षात कोणकोणते साहीत्य खरेदी करण्यात आले. त्याची तपासणी करता आली नाही.

2) नस्तीची तपासणी केली असता गटविकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक निरंक दिनांक 03/02/2016 नुसार डिजीटल साहीत्य खरेदीचे दर पूरविणेबाबत जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. त्यामध्ये बंद लिफाफामध्ये दिनांक 06/02/2016 पर्यंत दरपत्रक मागविण्यात आले परंतु जाहीरनामा वर कोठेही पूरवठाधारकाची नावे नमुद नाहीत.

3) देयकातुन 2750 व्हॅट कपात करण्यात आला असुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (C) नुसार सदर देयकातुन 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना रुपये 1,020/- कपात करण्यात आली नाही. संबधीतांकडुन रक्कम रुपये 1,020/- वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावी.

4) नस्तीची तपासणी केली निविदा दिनांक 06/02/2016 पर्यंत मागविला असतांना 1) श्री निधी बीजीनेस मशीन हैद्राबाद व टेकनोसेल्य औरगांबाद यांनी मुख्याध्यापक शाळा अर्जूना यांना दिनांक 09/02/2016 असलेले दरपत्रक सादर केले असल्याचे दिसते.

5) जाहीर नाम्यानुसार दिनांक 06/02/2016 पर्यंत दरपत्रके पूरवायची असतांना दिनांक 09/02/2016 ची दरपत्रके कशी पुरविण्यात आली. व ती कोणत्या नियमान्वये ग्राहय धरण्यात आली.

6) नस्तीची तपासणी केली असता फक्त श्री निधी बीजीनेस मशीन हैद्राबाद व टेक्नोशेल औरंगाबाद यांची निविदा असल्याचे दिसते. तिसऱ्या पुरवठा धारकाची निविदा नस्तीत उपलब्ध नाही.

7) MAX BUSINESS SYSTEM सिकंदराबाद यांची निविदा प्राप्त नसतांना त्यांना पुरवठा आदेश क्रमांक निरंक दिनांक 11/02/2016 कसा काय देण्यात आला.

8) निविदा पाकीटावर निविदा प्राप्त दिनांक नाही. किंवा निविदा कोणत्या दिनांकास प्राप्त झाल्या ते नमुद नाही निविदा कोणाचे समक्ष उघडण्यात आल्या ते नमुद नाही.

9) साहीत्याची शासकीय प्रयोग शाळेकडुन तपासणी करुन तसा तपासणी चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. परंतू तसा अहवाल नस्तीत आढळुन आला नाही. त्यामुळे साहीत्य योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्या बाबत सत्यता पडताळता आली नाही.

**4.159 राजीव गांधी सशक्तीकरण अभियान योजनेअंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणेबाबत.**

**पंचायत समिती उमरखेड, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत 7 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 32,62,062/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रंमाक ग्रापई-2014/प्र.क्रं.14/पंरा-7, दिनांक 20/01/2014 मधील अटी व शर्तीनुसार अट क्रमांक 4 अन्वये "ज्या ग्रामपंचायती स्वत: इमारत बांधकाम करण्यांस इच्छूक नसतील अशा ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाबाबत दिनांक 19/10/2011 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद स्तरावर ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यांत यावी असा सुचना असतांना जिल्हा परिषद स्तरावर ई-निविदा न बोलाविता सदर काम ग्रामपंचायत यांना देण्यांत आले आहे. परंतु सदर काम ग्रामपंचायतीने ई-निविदा व्दारे दिले किंवा कसे पडताळणी करता आले नाही.

2) सदर कामाकरीता उपरोक्त प्रमाणकाव्दारे पंचायत समितीने रककमेचे प्रदान करण्यांत आले आहे. सदर रकमेतुन आयकर 2टक्के, विक्रिकर, विमा 1 टक्का व उपकर 1 टक्का तसेच सुरक्षाठेव 3टक्के रक्कमेची कपात केलेली नाही. सदर रक्कम वसुल पात्र ठरते.

3) सदर कामावर वापरण्यात आलेल्या गौणखनिजाची मोजमापे मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आलेली नाही. तसेच गौणखनिजाची वसुली करण्यांत आलेली नाही. तसेच रॉयल्टी पासेस सुध्दा लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट 2009/प्र.क.114/जल 7, दिनांक 20/04/2011 नुसार कोणत्या प्रतीचे सिमेंट बांधकामासाठी वापरावयाचे याचे निकष नमुद केलेले आहे. त्यानुसार बांधकामाकरीता पुढील दर्जा असणारे सिमेंट अत्यावश्यक आहे. (1) ओ.पी.पी सिमेंट IS 8112/1989 प्रमाणे प्रष्टीकरण केलेले 43 ग्रेड व 53 ग्रेड (2) आय एस 455/1989 व IS 8712/1989 व आयएस 8712/1989 प्रमाणे प्रष्टीकरण केलेला पोर्टलॅड टॅग सिमेंट वरील दर्जाचे सिमेंट ग्रामपंचायतीने वापरल्याचे अधिकृत दस्तऐवजा वरुन खरेदी केल्याचे आढळून आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाची, अधिसुचना शासन राजपत्र क्रमांक गौखनि/10/1009/ प्रं.क्रं.309/ख(3), खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम 1957 (1957 चा 67) याचे पोटकलम (1) आणि (3) व्दारा दिनांक 11/02/2010 नुसार सन 2014-2015 या कालावधीत रेती, खडी, मुरुम, गिटटी, इत्यादीवर खर्च करण्यापुर्वी रुपये 200/- प्रती ब्रास याप्रमाणे गौणखनिजाच्या सन 2015-2016 या कालावधीत करण्यात आलेल्या कामाची मोजमापे नोंदविते वेळी गौणखनिजाच्या रक्कमांची गणना करुन गौण खनिजाची रक्कम संबंधीत

ग्रामपंचायतीला प्रदान करण्यांत येत असलेल्या देयकातुन करुन गौणखनिजाची रक्कम शासन खाती भरणा केल्या नाहीत, त्यामुळे शासनाची महसुलाची हाणी झाल्याचे आढळून येते.

6) सदर कामाची मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मोजमापे मान्य असल्याबाबत संबंधीत कंत्राटदार / सचिव / सरपंच यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. तसेच देयकावर सुध्दा स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

7) ग्रामपंचायत ढाणकी, दिघळी येथील काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्रावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्या सहया आढळुन आल्या नाही. तसेच कामाचे मोजमापे तपासले म्हणुन एम.बी.वर सहया आढळून आल्या नाही.

**4.160 जनसुविधा योजनेतुन केलेल्या ग्रामपंचायत वरणा, सराटी व वरध येथील बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती राळेगांव, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 148 अन्वये कामास मुदत वाढवुन देणे आवश्यक असेल तर अशी वाढ कार्यकारी अभियंता यांचेकडुन मंजुर करुन घेतली पाहीजे. आणि ती सुरुवातीची कालमर्यादा किंवा वाढवुन दिलेली कालमर्यादा संपण्यापुर्वी मंजुर करुन घेणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही. कामाचे आदेशान्वये काम दिनांक 31/03/2015 पर्यत पुर्ण करणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही. कामास मुदतवाढ मंजुर करण्यात आली नाही.

2) उपरोक्त बांधकामा संदर्भात निविदेतील कलम 38 (2) नुसार 125 टक्के पेक्षा जास्त परीमाणांसाठी अथवा रुपये 5000 खर्चाचे मर्यादेपेक्षा जास्त होणा-या खर्चाच्या कामासाठी सक्षम अधीका-याची सुधारीत मंजुरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2010/275/प्रक्र172/ पंरा-7,दिनांक 19/10/2011 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा-2014/ प्र.क्र.260/पंरा-7, दिनांक 27/05/2015 चे परिच्छेद 1(ब) अन्वये 5 लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे ई-निविदा प्रक्रीया अन्वये करण्यात यावी असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. अन्वये बांधकामे ई-निवीदा प्रक्रीया अन्वये करने आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

4) उपरोक्त कामाच्या देयकातुन सुरक्षा ठेव रक्कम कपात करण्यात आली नाही. तसेच कामाचा चाचणी अहवाल लेखापरिक्षणास सादर केला नाही.

5) पंचायत समिती स्तरावर प्राप्तं झालेल्या निधीमधून करावयाच्या कामाची जाहीर निविदा पं. स. स्तरावर बोलाविणे आवश्यंक असतांना सदर निधीतून करावयाची कामाकरीता ग्राम पंचायती सोबत कोणतेही ब-1 निविदा तसेच निविदा फी वसूल न करता कामाचे वाटप करण्यांत आले आहे.

6) सदर कामाची निविदा पंचायंत समिती स्तरावर बोलाविली असती तर दरसूची पेक्षा कमी दराने कामे करता आली असती परंतू निविदा न बोलाविल्यामुळे ग्रामपंचायत अंदाजपत्रकीय दराने कामे वाटप केली असल्याने सदर निधीचा योग्यप्रकारे विनियोग केल्याचे आढळून येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/ वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 चे बाब क्रमांक 1 व 6 प्रमाणे पडताळणी न करता सदर ग्रामपंचायत पात्र नसतांनाही ग्रामपंचायतीला काम दिल्याचे दिसते.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5159, दिनांक 09/01/1987 अन्वये गिट्टी, रेती, सिमेंट इत्यादी चा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल करुन घेणे बंधनकारक आहे. तशा प्रकारची कार्यवाही न केल्याने साहित्य गिट्टी, रेती, सिमेंट इत्यादी योग्य गुणवत्तेचे वापरल्याची सत्यता पडताळता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र472/ वित्त 9, दिनांक 09/02/2009 ला अनूसरून रूपये 20,000/- पेक्षा जास्त किमंतीचे कामावर बोर्ड लावणे बंधनकारक असतांनी कामावर बोर्ड लावल्याचे छायाचित्रासह दस्तांऐवज लेखापरिक्षेणात उपलब्ध झाले नाहीत.

10) उपरोक्त बांधकामा संदर्भात करारनामा रुपये 100/- चे कोरे स्टॅम्पवर केलेला आहे. त्यावर अटी व शर्ती नमुद नाहीत तसेच गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करून ते प्रमाणित करने आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

**4.161 जिल्हा वार्षिक योजनेतुन केलेल्या दहन शेड बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती महागांव, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती महागाव येथील सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात पंचायत समितीने जिल्हा वार्षिक योजनेतुन दोन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 5,00,000/- बांधकामांवर खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 190 अन्वये नमुना 65 मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. परंतु उपरोक्त कामाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावर उप अभियंता बांधकाम, उपविभाग महागांव यांची स्वाक्षरी आढळली नाही. त्यामुळे काम कधी पुर्ण झाले याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) प्रशासकीय मंजुरीची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) उपरोक्त बांधकामा संदर्भात रुपये 5,000/- खर्चाचे मर्यादेपेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाच्या कामासाठी सक्षम अधिकाऱ्याची सुधारीत मंजुरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा रक्कम रुपये 32,954/- जादा खर्चास मान्यता घेतलेली नाही.

4) उपरोक्त कामाच्या देयकातुन सुरक्षा ठेव रक्कम कपात करण्यात आली नाही. तसेच कामाचा चाचणी अहवाल लेखापरिक्षणास सादर केला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-झेडपीए-2008/प्र.क्र.472/ वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 चे बाब क्रमांक 1 व 6 प्रमाणे पडताळणी न करता सदर ग्रामपंचायत पात्र नसतांनाही ग्रामपंचायतीला काम दिल्याचे दिसते.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक सिमेंट 1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 व अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग त्यांचे शासन परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5159, दिनांक 09/01/1987 अन्वये गिट्टी, रेती, सिमेंट इत्यादीचा वापर करण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेतील चाचणी अहवाल करुन घेणे बंधनकारक आहे. तश्याप्रकारची कार्यवाही न केल्याने साहित्य गिटटी, रेती, सिमेंट इत्यादी योग्य गुणवत्तेचे वापरल्याची सत्यता पडताळता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.472/ वित्त 9, दिनांक 09/02/2009 ला अनुसरुन रुपये 20,000/- पेक्षा जास्त किंमतीचे कामावर बोर्ड लावणे बंधनकारक असताना कामावर बोर्ड लावल्याचे छायाचित्रासह दस्तऐवज लेखापरिक्षेत उपलब्ध झाले नाहीत.

8) उपरोक्त बांधकाम करण्यात येत असलेली जागा ग्रामपंचायतीचे मालकीची असलेबाबत नमुना क्रमांक - 8 ची प्रत नस्तीला आढळली नाही.

9) उपरोक्त बांधकामा संदर्भात करारनामा रुपये 100/- चे कोरे स्टॅम्प पेपरवर केलेला आहे. त्यावर अटी व शर्ती नमुद नाहीत. तसेच गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

10) तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करुन ते प्रमाणित करने आवश्यक आहे.

**4.162 सिमेंट काँक्रीट बेंचेस बांधकामावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती उमरेड, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,01,091/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कंत्राटदारासोबत रूपये 100/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.514/वित्त-09, दिनांक 20/11/2009 नुसार रूपये 10 लाखापर्यंत मूल्य असलेल्या सर्व प्रकारच्या कार्यकरारासाठी रूपये 100/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. संबंधीत कंत्राटदाराकडून रूपये 100/- वसुल करून मुख्य लेखाशिर्ष "0030 मुद्रांक व नोदणी फी" यामध्ये चालानव्दारे शासन खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

2) कंत्राटदाराच्या देयकातून 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल केलेला नाही. फक्त 4 टक्के वसुल केलेला आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 नुसार 1 टक्का फरकाची रक्कम रूपये 2,011/- संबंधीत कंत्राटदाराकडून वसुल करून चालानव्दारे शासन खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

3) कामगार कल्याण उपकर 1 टक्का वसुल केलेला नाही. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7(अ), दिनांक 17/06/2010 नुसार बांधकाम मूल्यावर 1 टक्का कामगार कल्याण उपकर रूपये 2,011/- संबंधीत कंत्राटदाराकडून वसुल करून तो शासन खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

4) बांधकामाला गट विकास अधिकारी यांनी आदेश काढून प्रशासकीय मंजूरी दिलेली नाही. पंचायत समितीने दिनांक 04/03/2016 च्या सभेत ठराव क्रमांक 16 पारीत करून योजना राबविण्यास मंजूरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-09, दिनांक 31/01/2013 नुसार रूपये 5 लाखापर्यंतच्या बांधकामांना गट विकास अधिकारी यांनी आदेश काढून प्रशासकीय मंजूरी देणे आवश्यक आहे.

**4.163 ग्रामपंचायत खापरी मोरेश्वर येथे रस्ता खडिकरण खर्चाबाबत.**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,12,265/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 नूसार कामास प्रथम प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना सदर कामास प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही.

2) 344 मिटर लांब खडीकरणामध्ये प्राकलनानूसार 80 mm गिटटी, 40 mm गिटटी व त्यानंतर मुरूम टाकणे प्रस्तावित होते. मोजमाप मुल्यांकणानूसार प्रत्यक्षात काम 600 मिटर लांबीचे तयार केलेले असून फक्त 80mm गिटटी व मुरूम उपयोगात आणलेला आहे. प्राकलनानूसार 40 mm गिटटी टाकणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात बचत का करण्यात आली.

तसेच वरीलप्रमाणे 344 मिटर लांब खडिकरण प्रस्तावित असतांना प्रत्याक्षात 40 mm गिटटीचा वापर न करता व बचत करून प्रत्यक्षात 600 मिटर लांब खडिकरण केलेले आहे. तसेच महाराष्टृ जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120 नूसार एका बाबीवरील बचत रक्कम इतर बाबीवर खर्च करता येत नाही.

3) सदर कामाच्या देयकातून रॅायल्टीची रक्कम कपात केलेली नाही. देयकातून रूपये 1,02,125/- कपात करणे आवश्यक होते. परंतु कपात न केल्यामुळे शासन महसुलाचे नूकसान झालेले आहे. सबब रूपये 1,02,125/- वसुलपात्र आहे.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन परीपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 अन्वये कामाचे मुल्याचे 1 टक्का कामगार उपकर रूपये 5,000/- वसुली करणे आवश्यक असतांना केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र. 837/पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय, मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सुरू करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाहि केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट साहित्य-1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नूसार सिमेंट, खडी व रेती याचा वापर करणेपूर्वी शासकीय गुणनियंत्रण प्रयोग शाळेतून गुणवत्ता चाचणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/10/2000 अन्वये बांधकामाची मोजमापे नोंदविल्यावर तांत्रिक अधिका-यांनी दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.164 मौजा नवेगांव (आष्टी) सिमेंट रस्ता बांधकामावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मौदा, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाच्या मोजमाप पुस्तकाची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मोजमाप पुस्तकावर क्रमांक नसल्याचे आढळून आले. अर्धसमास पत्र क्रमांक 06, दिनांक 18/07/2016 नुसार मोजमाप पुस्तकांची नोंदवही नमुना 53 मागविण्यात आली परंतु नोंदवही प्राप्त झाली नाही. मोजमाप पुस्तकाच्या क्रमांकाविषयी तोंडी विचारणा केली असता, “कोरी मोजमाप पुस्तिका बिना क्रमांकाची बाजारातून विकत घेण्यात येत असून ती बांधकामाच्या मोजमापांसाठी वापरली जाते व अशीच कार्यवाही सुरू आहे” असे सांगण्यात आले. तसेच मोजमाप पुस्तक सक्षम प्राधिका-याने प्रमाणित न करता सचिव, ग्राम पंचायत, नवेगांव (आष्टी) यांनी प्रमाणित केलेले आहे. हया सर्व नियमबाहय बाबी आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट 24 नुसार मोजमाप पुस्तिका हा अतिशय महत्वाचा अभिलेख समजण्यात येतो. प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकांचा पुरवठा जिल्हा परिषद कडून होणे अपेक्षित आहे. मोजमाप पुस्तकांवर व त्यांच्या पृष्ठांवर यंत्राच्या सहाय्याने क्रमांक दिलेले असतात. मोजमाप पुस्तक मिळाल्याचा, मोजमाप पुस्तक देण्यात आल्याचा व विभागीय कार्यालयाला नंतर परत करण्यात आल्याचा दिनांक दर्शविणारी एक नोंदवही पंचायत समिती स्तरावर ठेवणे आवश्यक आहे. तसेच दरवर्षी माहे जुलै मध्ये सर्व मोजमाप पुस्तकांचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असून त्याबाबतची सुध्दा एक नोंदवही जिल्हा परिषद स्तरावर ठेवणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद नागपूर कडून अनुक्रमांक असलेल्या मोजमाप पुस्तिका न मागविता बाजारातून बिना क्रमांकाची मोजमाप पुस्तिका विकत घेवून बांधकाम मोजमापासाठी वापरल्याबाबत आणि तशा प्रकारची मोजमाप पुस्तिका नियंत्रण नोंदवही न ठेवल्याबाबत पंचायत समिती मौदा यांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

2) बांधकामास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली नाही.

3) बांधकामाच्या देयकातून 05 टक्के मुल्यवर्धीत कर कपात केलेला नाही. कंत्राटदाराकडून सुधारीत 05 टक्के मुल्यवर्धीत कर रूपये 25,000/- वसुल करून शासन खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

4) बांधकामाच्या देयकातून 02 टक्के टीडीएस कपात केलेला नाही. आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 (सी) नुसार 02 टक्के टीडीएस रुपये 10,000/- कंत्राटदाराकडून वसुल करून शासन खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

5) बांधकामासाठी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे व आदेश प्रत नस्तीत आहे. परंतु त्यावर पंचायत समिती मौदा कार्यालयाचा जावक क्रमांक व दिनांक नमुद नाही. याबाबत पंचायत समिती मौदा यांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

6) बांधकामाच्या ठिकाणी कामाची माहिती दर्शविणारा फलक लावण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी दर्शनी भागावर विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक आहे.

7) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार बांधकाम पूर्ण झाल्यावर काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे.

8) साहित्यांचा चाचणी अहवाल प्राप्त केलेला आहे. परंतु तो प्रमाणित केलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक झेडपीए-1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकामात वापरण्यात येणा-या साहित्यांचा चाचणी अहवाल प्राप्त केल्यानंतर त्यातील साहित्यांची गुणवत्ता बांधकामासाठी योग्य आहे किंवा कसे याबाबत सक्षम प्राधिका-याने प्राप्त चाचणी अहवाल प्रमाणित करणे आवश्यक आहे.

**4.165 जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत लोकप्रतिनिधींनी सुचविलेले ग्रामीण भागातील कामे बांधकामातील अनियमिततेबाबत / दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1 व 5) -** सदर योजनांवर रक्कम रुपये 2,00,43,478/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/1009/प्रक्र-309, दिनांक 11/02/2010 अन्वये गौण खनिज रक्कमेची कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार वरील प्रमाणे गौण खनिजाचे एकुन रक्कम रुपये 4,01,544/- व 1,78,976/- एकूण रक्कम रुपये 5,80,520/- वसुल करण्यात यावी.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.-108/कामगार-7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के कामगार उपकर रुपये 1,46,695/- व 53,740/- एकूण रक्कम रुपये 2,00,435/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेले नाही.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमांस-1098/प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/परा.8(35), दिनांक 15/09/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सुरु होणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी संबधिताकडुन रुपये 1,46,695/- व 53,740/- एकूण रक्कम रुपये 2,00,435/- वसुल करुन विमानिधीचे शिर्षात जमा करण्यात यावे.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा/प्र.5, दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 124 सी प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातुन 2 टक्के आयकर रुपये 2,93,390/- व 1,07,480/- एकूण रक्कम रुपये 4,00,870/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेले नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय बीडीजी/2005/प्र.क्र.324 इमा.2, दिनांक 03/03/2006 मधील मुदा क्रमांक 4 नुसार मुल्यवर्धीत कर अधिनियमानुसार नोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातुन अधिसुचना क्रमांक व्हीएटी-1505/सीआर13/कराधन-1, दिनांक 01/04/2005 नुसार 2 टक्के व अनोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातुन 4 टक्के मुल्यववर्धित कर वसुल करावयाचा आहे. तसेच अधिसुचना क्रमांक जेओ (एचक्य)/व्हीएटी/2005/97, दिनांक 04/04/2012 नुसार मुल्यवर्धित कर 5 टक्के वसुल करणे बंधनकारक आहे. त्यानुसार रक्कम रुपये 7,33,474/- व 2,68,700/- एकूण रक्कम रुपये 10,02,174/- वसुल करण्यात यावी.

6) जिल्हा वार्षिक योजनेनुसार केलेली कामे ग्राम पंचायतीला हस्तांतरीत केल्याबाबत ग्रामपंचायतीचे ताबा पत्र घेण्यात आलेले नाही. तथा ग्रामपंचायतीचे नमुना 25 व 26 वर कामाच्या नोंदीबाबत पुरावा नस्तीत जोडलेला नाही.

**4.166 13 वित्त आयोग निधी अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती वर्धा, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5 व 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 30,65,942/- व 98,50,000/- एकूण रक्कम रुपये 1,29,15,942/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.123/परां-7, दिनांक 30/10/2009 नुसार कामाच्या एकुण मुल्याचा 1 टक्का उपकर संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे असे नमुद असताना ग्रामपंचायतीच्या रुपये 30,65,942/- रकमेच्या कामाचे देयकातून 1 टक्का उपकर रुपये 30,659/- कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 5)

2) विमा संचालनालय मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविणी/2301/सहविमा/फ-2, दिनांक 04/03/2005 व शासन निर्णय क्रमांक जिप-2/2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 नुसार कंत्राटी मुल्य रुपये 30,65,942/- मधून 1 टक्का रक्कम रुपये 30,659/- ग्रामपंचायतीने कामाचा विमा न उतरविल्यामुळे कामाच्या देयकातून कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 5)

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 अन्वये महाराष्ट्र शासनाने मुल्यवर्धित कर प्रणाली लागू केल्याने नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के मुल्यवर्धीत कर विक्रिकर आयुक्त यांचे अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर वसुल करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत हे नोंदणीकृत कंत्राटदार नसल्यामुळे त्यांचा अंतिम देयकातून रक्कम रुपये 1,53,297/- वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 5)

4) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे नियम 194(सी) अन्वये कामाच्या मुल्यावर 2 टक्का आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीच्या अंतिम देयकातून आयकर रुपये 61,319/- वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. (परिच्छेद क्रमांक 5)

5) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ दिनांक 11/05/2015 नुसार गौण खनिजावर रॉयल्टीचे सुधारीत दर 70.68 ऐवजी 141.36 झाले आहे. त्यानुसार रॉयल्टीची एकुण कपात रुपये 5,75,260/- ऐवजी रुपये 2,88,317/- करण्यात आलेली आहे. त्यामुळे कमी कपात रुपये 2,86,943/- वसुल करुन शासन खाती जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. (परिच्छेद क्रमांक 5 व 6)

6) कामाचा चाचणी अहवाल आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीआर 34/सी-4/5999, दिनांक 08/01/2007 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शान परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2010 नुसार कामावर वापरण्यात येणारे सर्व साहित्य वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेतुन साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेला करारनामावर फक्त गटविकास अधिकारी व सरपंच / सचिव यांची सही असून स्टॅम्प पेपर कोरा आहे. त्यात अटी व शर्ती नमूद करण्यात आलेले नाही. यावरुन करारनामाबाबत पंचायत समिती वर्धा यांची उदासीनता दिसून येते.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील परिच्छेद क्रमांक 2 नुसार एका कामासाठी एक मोजमाप वही ठेवण्यात यावी असे निर्देश असतानाही याउलट एका मोजमाप वहीत एकापेक्षा जास्त कामाची नोंद घेऊन शासन निर्देशाचे उल्लंघन केलेले आहे.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन परिपत्रक क्रमांक विपीएम-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 व शासन निर्णय क्रमांक स्थाविका-2003/प्र.क्र.369/का-1445, दिनांक 28/11/2003 नुसार कामावर माहितीदर्शक फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु विवरणपत्र “अ” मधील अनुक्रमांक 27 मधील

कामाच्या अंदाजपत्रकात माहितीदर्शक फलकासाठी रुपये 4,650/- ची तरतूद असतानाही कामाच्या ठिकाणी सदर फलक लावले नाही याप्रमाणे शासन निर्णयाचे पालन पंचायत समिती वर्धाव्दारे केले नाही. (परिच्छेद क्रमांक 6)

10) 13 वा वित्त आयोग योजना अंतर्गत ग्रामपंचायतीला अग्रीम देण्याची तरतुद नसतानाही विवरणपत्र “ब” मधील अनुक्रमांक 5 नुसार ग्रामपंचायतीला रुपये 3,75,000/- अग्रीम देण्यात आले आहे. मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 142(सी) नुसार दोन ते तीन महिन्यात अग्रीमाचे समायोजन होणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे समायोजनाची कार्यवाही झालेली नसल्यामुळे सदर अग्रीम निधी पंचायत समिती स्तरावर वसुल करुन कामाच्या मोजमापानुसार संबंधीत ग्रामपंचायतीला निधी दयावे. (परिच्छेद क्रमांक 5)

11) केलेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवही/प्रगती नोंदवही नमुना-23, काम पुर्णत्वाची नोंदवही नमुना-69 व रस्ता नोंदवही लेखापरीक्षणास सादर केले नाही त्यामुळे सदर कामे प्रत्यक्षात केले किंवा कसे याची शहानिशा करता आली नाही.

12) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/प्र.क्र.68/कोषा.प्र.-5, दिनांक 18/04/2011 नुसार सर्व प्रकारची प्रदाने ई-पेमेंट पध्दतीचा वापर करुन करण्याचे निर्देशित केलेले असतानाही पंचायत समिती वर्धाव्दारे पुरवठादारास धनादेशाने प्रदाने करुन शासन निर्णयाचे पालन केले नाही.

13) विवरणपत्र “ब” मधील कामांबाबत मोजमाप पुस्तिका,प्रशासकीय मंजूरी आदेश, तांत्रिक मंजूरी आदेश, मुळ अंदाजपत्रके व इतर आवश्यक दस्ताऐवजे लेखापरीक्षणास सादर केले नाही. लेखापरीक्षणाव्दारे कार्यालयात लेखा शाखेत उपलब्ध् देयके व त्याला जोडण्यात आलेले काही दस्ताऐवजावरुन या योजनेचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे.

14) नियमानुसार कार्यादेशात दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करणे हे संबंधीत कंत्राटदाराला / एजन्सीला बंधनकारक आहे. काम वेळेत पूर्ण होत नसेल तर कंत्राटदार 15 दिवस अगोदर मुदतवाढ मागू शकतो. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 148 नुसार एकदाच मुदतवाढ देता येते. परंतु विवरणपत्र “अ” मधील अनुक्रमांक 14 व 15 मधील कामे दिलेल्या मुदतीपेक्षा अनुक्रमे 74 दिवस व 87 दिवस उशीरा पूर्ण केले. यासाठी कंत्राटदाराकडून मुदतवाढ मागण्यात आलेली नाही वा प्राधिका-याने मुदत वाढ दिलेलली नाही. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर कंत्राटदाराकडून दंडाची कार्यवाही करणे अपेक्षित असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. पंचायत समितीस्तरावर सदर 02 कामाबाबत दंडाची कार्यवाही करण्यात यावी. (परिच्छेद क्रमांक 6)

### 4.167 बांधकामाच्या मुल्यांकनापेक्षा जास्त रक्कम ग्रामपंचायतीला वर्ग करणेबाबत.

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामासाठी अग्रीम रुपये 2,52,000/- ग्रामपंचायतीला प्रदान केल्यानंतर काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रात नमुद कामाचे मुल्यांकन रुपये 2,68,751/- नुसार उर्वरित रक्कम रुपये 16,751/- ग्रामपंचायतीला प्रदान करणे आवश्यक असताना प्रमाणक क्रमांक 340, दिनांक 05/10/2015 नुसार रुपये 63,000/- प्रदान केलेले आहे.

2) आवश्यक नसताना रुपये 46,249/- अतिरिक्त प्रदान करण्यात आले असून अदयाप वसुल झाले नाही.

3) अतिरिक्त निधी ग्रामपंचायतीकडून वसुलीबाबत पंचायत समिती स्तरावर कोणतीही कार्यवाही नाही.

4) निधी वितरणात पंचायत समिती स्तरावर शासकिय निधी वितरणात नियोजन व नियंत्रण नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 06/08/2016 नुसार खुलासा विचारण्यात आले असता ग्रामपंचायतीकडून रुपये 46,249/- वसुल करण्यात येईल असे अभिप्राय सादर करण्यात आले. यावरुन घेतलेले आक्षेप पंचायत समिती हिंगणघाट यांना मान्य् आहे. यावरुन पंचायत समिती हिंगणघाट यांनी संबंधीत ग्रामपंचायतीला अतिरीक्त प्रदान केलेली रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावा, तसेच याप्रमाणे ज्या ग्रामपंचायतींना पंचायत समिती हिंगणघाटव्दारे कामाच्या मुल्यांकनापेक्षा जास्त निधी वितरीत केलेला आहे त्यांच्याकडून सुध्दा रक्कम वसुलीची कार्यवाही पंचायत समिती स्तरावरुन करण्यात यावी.

**4.168 13 वा वित्त आयोग योजनेतील कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** 13 वा वित्त आयोग योजने अंतर्गत रक्कम रुपये 2,28,328/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

पंचायत समितीने सन 2015-2016 मध्ये 13 वित्त आयोग पंचायत समिती स्वनिधीतील सोबत जोडण्यात आलेल्या यादीप्रमाणे 63 कामाचा ग्रामपंचायतींना कंत्राट देऊन काम पूर्ण करण्यात आले आहे. ग्रामपंचायती सोबत बी-1 करारनामा करुन घेण्यात आला आहे. तरी पंचायत समितीने ग्रामपंचायतीच्या अंतिम देयकातून एकूण कामावर खालील कपाती करणे आवश्यक आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.123/परां-7, दिनांक 30/10/2009 नुसार कामाच्या एकुण मुल्याचा 1 टक्का उपकर संबंधीत कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावे असे नमुद असताना ग्रामपंचायतीच्या कामाचे अंतिम देयकातून 1 टक्का उपकर रुपये 1,14,164/- कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

2) विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविणी/2301/सहविमा/फ-2, दिनांक 04/03/2005 व शासन निर्णय क्रमांक जिप-2/2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 नुसार कंत्राटी मुल्याच्या 1 टक्के रक्कम रुपये 1,14,164/- चे ग्रामपंचायतीने संबंधीत कामाचा विमा उतरविलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 अन्वये महाराष्ट्र शासनाने मुल्यवर्धित कर प्रणाली लागू केल्याने नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के व विक्रीकर आयुक्त यांचे अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक आहे. भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे नियम 194(सी) अन्वये कामाच्या मुल्यावर 2 टक्के आयकर कपात केलेला नाही.

4) पंचायत समिती स्तरावरुन कामे पुर्ण केल्यानंतर सदर काम संबंधीत ग्रामपंचायत किंवा विभागास हस्तांतरण केल्याबाबत ताबा पावती सोबत जोडलेली नाही.

**4.169 सिंगारवाडी ते स्मशानभूमी पर्यंत सिमेंट रस्ता बांधकामातील अनियमितता.**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13)** - सदरबाबत रक्कम रुपये 1,99,778/- खर्च नोंदविला आहे. पंचायत समिती, देवळीचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असताना उपरोक्त प्रमाणकान्वये 13 वा वित्त आयोग निधी अंतर्गत केलेल्या सिमेंट रोड बांधकामाचा रोख पुस्तकात खर्च नोंदविण्यासाठी सदर कामाची प्रक्रिया उपरोक्त प्रमाणे करण्यात आली. त्यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) शेडयुल 'बी' मध्ये नमुद क्लॉज 38 प्रमाणे एखादी बाब 25 टक्के पेक्षा जास्त वाढ किंवा रुपये 5,000/- पेक्षा जास्त वाढ होता कामा नये. त्याप्रमाणे सदर कामात प्राकलनात बाब क्रमांक 01 व बाब क्रमांक 09 मध्ये प्रत्यक्षात मोजमाप पुस्तिकेत अनुक्रमे 8.2 व 9.85 घनमीटर जादा नोंदविण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/ प्र.क्र.85/ रस्ते-1, दिनांक 11/06/2004 अन्वये कामाचे अंदाजपत्रक बनविताना सर्व बाबीचा विचार करुनच अचुक/सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 व 118 नुसार सुधारीत अंदाजपत्रक व सुधारीत मंजुरी घेणे आवश्यक असतांना तसे न करता नियमबाहय प्रदान करण्यात आले आहे.

2) बाब क्रमांक- 07 - Providing and Fixing Informatory Board अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात आलेली आहे परंतु मोजमाप पुस्तिकेमध्ये बाब क्रमांक 08 ची नोंद घेण्यात आलेली नाही.

3) चाचणी अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

4) भारत सरकार, आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) अन्वये पुरवठादाराकडून रुपये 30,000/- व त्यावरील प्रदानातून आयकर व सरचार्ज एकूण रुपये 4,595/- कपात करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 नुसार असाधारण क्रमांक 22, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिसूचना क्रमांक विसआ (मुख्य)1/मूवक/2005/97, दिनांक 04/04/2012 अन्वये सुधारण करण्यात येऊन नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदाराकडून दिनांक 01/04/2012 पासून 4 टक्के ऐवजी 5 टक्के कपात करण्यात यावा व इतर नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के कपात करणे आवश्यक आहे. त्यामुळे व्हॅटची रक्कम 5 टक्के प्रमाणे एकूण रुपये 9,989/- कपात करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/ कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर /2000/प्र.क्र. 837/35, दिनांक 08/05/2002 अन्वये 1 टक्के विमा रक्कम कपात करुन शासन खात्याला जमा केल्याचे चलान लेखापरीक्षणास सादर नाही. त्यामुळे विमा व उपकराचे एकूण 2 टक्के प्रमाणे एकूण रुपये 3,996/- कपात करणे आवश्यक आहे.

7) प्रशासकीय मंजुरी आदेश तसेच कार्यारंभ आदेशावर जावक क्रमांक नमुद नाही.

**4.170 काकडदरा येथील रस्ता खडीकरण बांधकामातील अनियमितता.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,27,936/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार, आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) अन्वये पुरवठादाराकडून रुपये 30,000/- व त्यावरील प्रदानातून आयकर व सरचार्ज एकूण रुपये 7,543/- कपात करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, 2002 नुसार असाधारण क्रमांक 22, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिसूचना क्रमांक विसआ (मुख्य)1/मूवक/2005/97, दिनांक 04/04/2012 अन्वये सुधारण करण्यात येऊन नोंदणीकृत नसलेल्या कंत्राटदाराकडून दिनांक 01/04/2012 पासून 4 टक्के ऐवजी 5 टक्के कपात करण्यात यावा व इतर नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के कपात करणे आवश्यक आहे. त्यामुळे व्हॅटची रक्कम 5 टक्के प्रमाणे एकूण रुपये 16,397/- कपात करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/ कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/ 2000/प्र.क्र. 837/35, दिनांक 08/05/2002 अन्वये 1 टक्के विमा रक्कम कपात करुन शासन खात्यात जमा केल्याचे चलान लेखापरीक्षणास सादर नाही. त्यामुळे विमा व उपकराचे एकूण 2 टक्के प्रमाणे एकूण रुपये 6,559/- कपात करणे आवश्यक आहे.

4) चाचणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतरचा आहे. त्यामुळे काम चांगल्या दर्जाचे झाले आहे किंवा नाही याबाबत सांशकता निर्माण होते.

5) पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर काम केव्हा पूर्ण झाले आहे तसा दिनांक नमूद नाही.

**4.171 तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत ग्रामपंचायतींना दिलेल्या बांधकामाकरीता अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती पवनी, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15)** - पंचायत समिती पवनी सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, तांडा वस्ती सुधार योजना अंतर्गत रनाळा, भुयार, जुनोना, पौनी ग्रामपंचायतींना बांधकामांना प्रशासकीय मंजुरी देवुन 90 टक्के रक्कम रुपये 14,40,000/- चे ग्रामपंचायतीना अनुदानाचे शोधन करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत ही एजन्सीची भुमिका बजावत असल्यामुळे नियमानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम 1958चे कलम (6)5 अन्वये करारनामा रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक आहे.

2) महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक 11/02/2010 अन्वये रॉयल्टी प्रती बॉस रुपये 200/- प्रमाणे सदर कामाबाबत ग्रामपंचायतींने रॉयल्टी भरल्याचे आढळत नाही. ग्रामपंचायतने रॉयल्टी न भरल्यामुळे रॉयल्टी प्रती बॉस रुपये 200/- प्रमाणे परिगणना करुन कपातीची रक्कम महसुल शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

3) प्रस्तावित कामाकरीता कोणत्या कालावधीत किती अनुदान वर्ग केले. त्यापैकी किती अनुदान खर्च झाले याबाबत अचुक माहिती उपलब्ध करणे आवश्यक आहे.

4) तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत मंजुर कामांना प्रथम 40 टक्के हप्ता अदा करुन सदर हप्त्याचे कामाचे मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दुसरा हप्ता अदा करावयाचा असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) वरील कामे पुर्ण करून पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व विनियोग प्रमाणपत्र सादर करावे.

**4.172 देवरी येथे स्मशानभूमीत जाणा-या रस्त्याचे बांधकाम.**

**पंचायत समिती गोंदिया, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,42,352/- खर्च नोंदविला आहे. सदर कामाच्या अंतिम प्रमाणकाचे लेखापरीक्षण केले असता, अंतिम मोजमापाद्वारे अंतिम मुल्यांकनातुन योग्य कपाती व अग्रीम वजा करता संबंधीत कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रॉयल्टीची रक्कम देयकातून कपात न केल्यामुळे शासन महसुलाचे झालेले नुकसान - सदर कामाचा अंतिम मोजमापाप्रमाणे बांधकामासाठी 355.83 ब्रास गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 02/05(291)/इमारती-2,मंत्रालय मुंबई, दिनांक 11/09/2003 प्रमाणे गौण खनिजावरील रॉयल्टीचा भरणा करण्याची जाबाबदारी कंत्राटदाराची आहे. सदर कामासाठी वापर करण्यात आलेल्या 355.83 ब्रास खनिजावरील महाराट्र शासन, महसुल व वन विभाग, दिनांक 11/05/2015 च्या अधिसूचनेप्रमाणे खडी मुरुम कंकर गौण खनिजावर रुपये 400/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी रक्कम जमा करणे बंधनकारक आहे. देयकासोबत वाहतुक परवाना जोडून रॉयल्टी कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे रुपये 1,42,352/- महसुलाचे नुकसान झालेले आहे. तरी रॉयल्टीची रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात यावी.

**4.173 श्री.व्हि.डब्ल्यु.धनविजय स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना प्रवास भत्ता रक्कम अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती गोंदिया, जिल्हा, गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 38,625/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

श्री.धनविजय यांना त्यांच्या प्रवास भत्ता देयकात मोटार सायकल वापराबाबत वाहतुक दर आकारुन रक्कमेची उचल केलेली आहे. मोटार सायकल वापराबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांची मान्यता नसतांना नियमबाहय प्रमाणे वाहतुक दर आकारुन रकमेची उचल करणे म्हणजे शासनाची फसवणूक केलेली आहे. तरी संबंधिताकडून संपूर्ण रकमेची वसुली करुन रक्कम शासन शिर्षात जमा करण्यात यावी.

**4.174 सभा मंडप बांधकाम मुरपार व चांदारी बु. स्मशानभूमीत खडीकरण रस्ता बांधकाम.**

**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22 व 24) -** सदरबाबत रक्कम रुपये 8,45,053/- व रुपये 8,66,000/- खर्च नोंदविला आहे. कामाच्या अंतिम प्रमाणकाचे लेखापरीक्षण केले असता, अंतिम मोजमापाव्दारे अंतिम मुल्यांकनातुन कपाती वजा करता संबंधीत कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) रॉयल्टीची रक्कम देयकातून कपात न केल्यामुळे शासन महसुलाचे झालेले नुकसान - सदर कामाच्या अंतिम मोजमापाप्रमाणे बांधकामासाठी गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण 02/05/(291)/इमारती-2, दिनांक 11/09/2003 प्रमाणे गौण खनिजावरील रॉयल्टीचा भरणा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. सदर कामासाठी वापर करण्यात आलेल्या

खनिजावरील महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, दिनांक 11/02/2010 च्या अधिसूचनेप्रमाणे खडी, मुरुम, कंकर गौण खनिजावर रुपये 70.69 प्रती कयु.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम जमा करणे बंधनकारक आहे. देयकासोबत वाहतुक परवाना जोडून रॉयल्टी कपात केलेली नाही. विभागाने शासन निर्देशाप्रमाणे प्रती क्यु.मी. रुपये 70.69 प्रमाणे रॉयल्टी कंत्राटदाराच्या देयकातून कपात न केल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. संबंधीत कंत्राटदाराकडून रक्कम रुपये 26,288 + 82,246 = 1,08,534/- वसूल करुन संबंधीत शासन शिर्षात जमा करुन दाखवावे.

**4.175 बांधकामाच्या देयकातुन रॉयल्टीची रक्कम वसुल न केल्यामुळे शासन महसुलाचे रुपये 4,93,652/- चे झालेले नुकसान.**

**पंचायत समिती गोरेगांव, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 37,12,384/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर कामाचा अंतिम मोजमापाप्रमाणे वरील बांधकामासाठी 1234.13 ब्रास गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 02/05(291)/इमारती-2, दिनांक 11/09/2003 प्रमाणे गौण खनिजावरील रॉयल्टीचा भरणा करण्याची जाबाबदारी कंत्राटदाराची आहे. सदर कामासाठी वापर करण्यात आलेल्या 1234.13 ब्रास खनिजावरील महाराट्र शासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक 11/05/2015 च्या अधिसूचनेप्रमाणे खडी मुरुम कंकर गौण खनिजावर रुपये 400/- प्रती ब्रास प्रमाणे रॉयल्टी रक्कम जमा करणे बंधनकारक आहे. देयकासोबत वाहतुक परवाना जोडून रॉयल्टी कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे रुपये 4,93,652/- महसुलाचे नुकसान झालेले आहे. तरी रॉयल्टीची रक्कम संबंधिताकडुन वसुल करण्यात यावी.

**4.176 13 वित्त आयोग रॉयल्टी कमी रक्कम कपात करणेबाबत.**

**पंचायत समिती आमगांव, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समितीने 5 बांधकामांवर रक्कम रूपये 11,72,238/- खर्च केला आहे. सदर रक्कमेतून रॉयल्टी रक्कम कमी कपात केल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासन राजपत्र दिनांक 11/05/2015 चे अनुषंगाने बांधकामासाठी वापरण्यात येणा-या गौणखनिज साहित्याच्या वापराच्या दरात वाढ झाल्याने देयकातुन त्याप्रमाणे गौण खनिज वापराबाबत रक्कम वसुल करणे क्रमप्राप्त होते. तथापि, उपरोक्त कामाचे देयकातुन जुन्याच दराने रॉयल्टीची रक्कम कपात आल्याने कमी कपात करण्यात आलेली रक्कम रुपये 36,438/- वसुल पात्् ठरते.

**4.177 बांधकाम देयकामधून रॉयल्टीची रक्कम कमी कपात करणे.**

**पंचायत समिती अर्जूनी मोरगांव, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत एकूण 21 कामांवर रक्कम रुपये 88,75,145/- खर्च नोंदविला आहे. सन 2015-2016 या वित्तीय वर्षामधील पंचायत समिती अर्जुणी-मोरगाव येथील बांधकाम विभाग अंतर्गत 13 वा वित्त आयोग, व मुलभुत जनसुविधा योजने, दलीत वस्ती सुधार योजनामधून झालेली बांधकामाची तथा दुरुस्तीची एकूण 21 कामे तपासतांना असे निदर्शनास आले की, देयकामधून रॉयल्टी पोटी कपात करावयाची रक्कम ही कमी कपात करण्यात आल्याने शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकामाकरीता वापरण्यात येणा-या खनिज संपत्ती करीता सुधारीत दर प्रती ब्रास 400/- रूपये प्रमाणे अमलात आल्याने व त्याकालावधी मध्ये कंत्राटदारास बांधकामासंबंधी दिलेले वर्क आदेश असतांना व सदर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देयक आस्थापनेवर पारीत करते वेळी सुधारीत दराने रॉयल्टीची कपात न करता जुन्याच दराने कपात करण्यात आल्याने एकूण 21 बांधकामांमध्ये शासन

महसुलाचे रुपये 2,04,615/- ने नुकसान झाल्याचे दिसून येते. तेव्हा सदर रक्कम वसुल करून शासन शीर्षामध्ये जमा करून तसे अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

**4.178 गोराजा येथील सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकामामधील अनियमितता.**

**पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 28) -** सदरबाबत रक्कम रुपये 47,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.1864/13, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत आर्थिकदुष्टया सक्षम असल्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना सदर प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

2) सदर बांधकामाची जागा ग्रामपंचायतीची असल्याबाबत जागेचा 7/12 उपलब्ध करून दिला नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहीत्य/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये सिमेंट, रेती, गिटटी इत्यादी साहीत्य कामावर वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेतुन चाचणी करणे आवश्यक असतांना चाचणी प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळुन आलेले नसल्यामुळे काम उत्कुष्ट झाले किवा नाही याबाबत खात्री करता आली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक ZPA37/प्र.क्र.18/2000, दिनांक 02/05/2000 मधील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ग्रामपंचायतीकडे पुरेसी साधन सामुग्री असल्याशिवाय काम देण्यात येवु नये असे असतांनाही सदर बाबीची पुर्तता करण्यात आली नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार कत्रांटदाराकडुन मुळस्थानी 2 टक्के आयकर टिडीएस म्हणुन कपात करुन ते शासन सदरी भरावयाचे आहे. आयकर वसुल करावा.

6) कामाचे आदेशावर स्वाक्षरी करण्यात आलेली नाही.

7) नियमानुसार काम सुरू करण्यापुर्वी, काम प्रगतीमध्ये असतांना व काम झाल्यानंतरचे फोटो जोडणे आवश्यक आहे. परंतु नस्तीमध्ये फोटो आढळुन आले नाही.

8) काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रामध्ये पुर्णत्वाचा दिनांक 21/11/2015 नमुद केलेला आहे. प्रत्याक्षात काम आदेश दिनांक 26/11/2015 चे असतांना दिनांक 21/11/2015 ला काम कसे काय पुर्ण झाले याबाबत खुलासा करावा.

9) कत्रांटदाराने कामाचा व कामगारांच्या सुरक्षिततेबाबतचा कंत्राटी मुल्याच्या 1 टक्का रकमेचा विमा काम सुरु करण्यापुर्वी शासकिय विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कडे उतरविणे आवश्यक आहे. परंतू, सदर कामाचा विमा उतरविला नसल्याने 1 टक्का विमा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे दिनांक 20/05/1999 च्या शासन निर्णयानुसार कामाचे ठिकाणी माहीती फलक लावणे आवश्यक आहे. त्याशिवाय अंतिम देयाक अदा करु नये असे आदेश असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

**4.179 आंगणवाडी किचन शेड बांधकामामधील अनियमितता.**

**पंचायत समिती पोभुर्णा, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 30) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,20,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.1864/13, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत आर्थिकदुष्टया सक्षम असल्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना सदर प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

2) सदर बांधकामाची जागा ग्रामपंचायतीची असल्याबाबत जागेचा 7/12 उतारा उपलब्ध करून दिला नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहीत्य/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये सिमेंट, रेती, गिट्टी इत्यादी साहीत्य कामावर वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेतुन चाचणी करणे

आवश्यक असतांना चाचणी प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळुन आलेले नसल्यामुळे काम उत्कुष्ट झाले किवा नाही याबाबत खात्री करता आली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक ZPA37/प्र.क्र.18/2000, दिनांक 02/05/2000 मधील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ग्रामपंचायतीकडे पुरेसी साधन सामुग्री असल्याशिवाय काम देण्यात येवु नये असे असतांनाही सदर बाबीची पुर्तता करण्यात आली नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार कत्रांटदाराकडुन मुळस्थानी 2 टक्के आयकर कपात करणेत आलेला नाही. 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम वसूल करावी.

6) सदर कामाबाबतची नस्ती लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नसल्यामुळे काम आदेश, करारनामा व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र पहावयास मिळाले नाही. त्यामुळे काम विहीत मुदतीत पुर्ण झाले किवा नाही याबाबत खात्री करता आली नाही.

7) नियमानुसार काम सुरू करण्यापुर्वी, काम प्रगतिमध्ये असतांना व काम झाल्यानंतरचे फोटो जोडणे आवश्यक आहे. परंतु नस्तीमध्ये फोटो आढळुन आले नाही.

8) सदर बांधकामा सबंधात अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विभास/1098/प्रक्र.29/98, शासन हमी दिनांक 19/09/1998 व शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्रकं 837/35, दिनांक 08/05/2005 नुसार कत्रांटदाराने कामाचा व कामगारांच्या सुरक्षिततेबाबतचा कंत्राटी मुल्याच्या 1 टक्का विमा काम सुरु करण्यापुर्वी शासकिय विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कडे उतरविणे आवश्यक आहे. त्या ग्राम पंचायत कडुन विम्याची 1 टक्का राशी कपात करणे जरुरी आहे. वसुल केलेली राशी विमा संचालनालयाकडे पाठवुन मिळाल्याबाबत पोच दर्शविण्यात यावी.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग यांचे दिनांक 20/05/1999 च्या शासन निर्णयानुसार कामाचे ठिकाणी माहीती फलक लावणे आवश्यक आहे. त्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये असे आदेश असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

**4.180 ग्रामपंचायत नोकेवाडा अंर्तगत सेवादास नगर येथिल सिमेंट कॉक्रिट रस्ता बांधकाम मधील अनियमितता.**

**पंचायत समिती जिवती, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,97,635/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.1864/13, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत आर्थिकदुष्टया सक्षम असल्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना सदर प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

2) सदर बांधकामाची जागा ग्रामपंचायतीची असल्याबाबत जागेचा 7/12 उपलब्ध करून दिला नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहीत्य/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये सिमेंट,रेती,गिटटी इत्यादी साहीत्य कामावर वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेतुन चाचणी करणे आवश्यक असतांना चाचणी प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळुन आलेले नसल्यामुळे काम उत्कुष्ट झाले किवा नाही याबाबत खात्री करता आली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ZPA37/प्र.क्र.18/2000, दिनांक 02/05/2000 मधील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ग्रामपंचायतीकडे पुरेसी साधन सामुग्री असल्याशिवाय काम देण्यात येवु नये असे असतांनाही सदर बाबीची पुर्तता करण्यात आली नाही.

5) आयकर अधिनियम 1969 चे कलम 194 (सी) नुसार कत्रांटदाराकडुन मुळस्थानी 2 टक्के आयकर टिडीएस म्हणुन कपात करुन ते शासन दरबारी भरावयाचे आहे. आयकर वसुल करावे.

6) कामाचे आदेश दिनांक 02/07/2015 चे असुन काम पुर्ण प्रमाणपत्रावरुन दिनांक 09//07/2015 रोजी काम पुर्ण झाल्याचे दिसुन येते. कामाची मुदत 4 महिने असतांना केवळ 7 दिवसामध्ये कसे काय काम पुर्ण झाले याची खात्री पटवावी.

7) नियमानुसार काम सुरू करण्यापुर्वी, काम प्रगतीमध्ये असतांना व काम झाल्यानंतरचे फोटो जोडणे आवश्यक आहे परंतु नस्तीमध्ये फोटो आढळुन आले नाही.

8) सदर बांधकामासाठी लागणारे सिमेंट बाहेरुन खरेदी करावा लागतो. ज्या ठिकाणावरुन खरेदी करावयाचे आहे. त्या ठिकाणापर्यत वाहनावळ सबंधित यत्रंणेला लागेल असे गृहित धरुन बेसीक दरात वाहानावळ वाढ करून दर पुथकरणामध्ये तेवढी राशी गृहित धरुन दर निश्चित केले जाते आणी त्या दराने कत्रांटदाराने शोधन केल्या जाते कामात सिमेंट गडचांदुर येथुन खरेदी करण्यात येईल असे गृहित धरुन वाहाणावळ सह दर देण्यात आले. प्रत्यक्ष नस्तीचे अवलोकन केले असता सिमेंट मात्र जिवती वरुन खरेदी केल्याचे दिसते तेव्हा वाहानावळाबाबत शोधन करण्यात आलेल्या रक्कमेची गणना करुन वसुलपात्र रक्कम सबंधीतांकडुन वसुल करुन अनुपालन सादर करावे.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विभास/1098/प्रक्र.29/98 शासन हमी, दिनांक 19/09/1998 व शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्रकं 837/35, दिनांक 08/05/2005 नुसार कत्रांटदाराने कामाचा व कामगारांच्या सुरक्षिततेबाबतचा कंत्राटी मुल्याच्या 1 टक्का विमा काम सुरु करण्यापुर्वी शासकिय विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कडे उतरविणे आवश्यक आहे. विम्याची वसुल केलेली राशी विमा संचालनालयाकडे पाठवुन रक्कम मिळाल्याबाबत पोच दर्शविण्यात यावी.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे दिनांक 20/05/1999 च्या शासन निर्णयानुसार कामाचे ठिकाणी माहीती फलक लावणे आवश्यक आहे. त्याशिवाय अंतिम देयाक अदा करु नये असे आदेश असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

**4.181 मौजा पावरवेल येथील नाली बांधकाम करणेबाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती धानोरा, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** प्रमाणक क्रमांक 26, दिनांक 09/11/2015 रुपये 1,31,401/- प्रथम व अंतिम देयक सदरबाबत रक्कम रुपये 1,31,401/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.1864/13, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत आर्थिकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना सदर प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहित्य/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये सिमेंट, रेती, गिटटी इत्यादी साहित्य कामावर वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेतुन चाचणी करणे आवश्यक असताना सदर प्रयोगशाळेकडुन तपासणी अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन निर्णय क्रमांक ZPA37/प्र.क्र.18/2000, दिनांक 02/05/2000 मधील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ग्रामपंचायतीकडे पुरेशी साधनसामुग्री असल्याशिवाय काम देण्यात येवु नये असे असतानाही सदर बाबीची पुर्तता केली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन परिपत्रक क्रमांक ZPA/प्र.क्र.44/2000/33, दिनांक 22/12/2000 नुसार एम.बी. वर मोजमापे घेणाऱ्या अभियंत्याच्या दिनांकीत स्वाक्षऱ्या असणे आवश्यक असताना स्वाक्षऱ्या दिनांकीत नाही. एम.बी.वर कंत्राटदाराच्या सहया असणे आवश्यक असतांना सहया घेण्यात आल्या नाही.

5) कामाचे फोटो, माहिती फलक असणे आवश्यक असताना घेण्यात आल्या नाही. नस्ती उपलब्ध नाही. करारनामावर गटविकास अधिकारी / सचिव यांची सही नाही.

6) लेखासंहिता नियम 97 अन्वये सदर रस्त्याची नोंद नमुना 40 ला घेणे आवश्यक असताना सदरबाबतचे दस्ताऐवज सादर नाही. देयक अदा केल्यानंतर एम.बी. वर कर्णरेषा मारणे आवश्यक असताना मारण्यात आली नाही.

**4.182 कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता यांना नियमबाहय रोख भता अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती देसाईगंज वडसा, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 13,200/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शाखा अभियंता यांना दरमहा रुपये 100/- प्रमाणे दिलेले रोख भत्ता नियमबाहय असुन जो वसुल पात्र आहे. रोख भत्ता रोख हाताळणाऱ्या कर्मचाऱ्याला अनुज्ञेय आहे परंतु सध्या शाखा अभियंता हे कोणत्याही प्रकारची रोख हाताळत नाही. जर रोख हाताळत असल्यास तसे कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करुन दिलेली रोख भत्ता रोख हाताळण्याच्या टर्न ओव्हेर आधारावर निश्चित करावयाचा आहे जर रोख हाताळल्या जात नसेल तर कोणताही भत्ता देता येणार नाही प्रचलित पध्दतीमध्ये रोजगार हमी योजना किंवा इतर कोणत्याही योजनेतुन रोखीचे व्यवहार बाद करण्यात आलेले आहे. त्यामुळे देण्यात येणारा रोख भत्ता कोणत्या आधारावर देण्यात येत आहे याचा खुलासा करावा. सहावे वेतन आयोगामध्ये वेतनाशी निगडीत विशेष वेतन अनुज्ञेय नाही त्यामुळे संबंधीताना अदा करण्यात येणारा भत्ता अनुज्ञेय ठरत नाही.

**4.183 पंचायत समिती उपकर योजने अंतर्गत बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कन्नड, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत पंचायत समिती कन्नड सन 2015-16 चे लेखापरिक्षणात उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे तपशिलात दर्शविलेप्रमाणे रक्कम रुपये 24,37,592/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, विक्रीकर विभाग, शासन अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराचे देयकातून 5 टक्के मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या कामांचे बाबतीत मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी 5 टक्के प्रमाणे मुल्यवर्धीत कराची रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) अन्वये 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात आयकर रकमेची कपात करण्यात आलेली नाही. तरी आता 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 296 (ब) नुसार माहे फेब्रुवारी / मार्च महिन्यात कामाचे आदेश निर्गमित करण्यास प्रतिबंध असतांना सदर कामाचे आदेश सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार माहे फेब्रुवारी / मार्च महिन्यात देण्यात आलेले आहेत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुंसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहित्य-1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक असताना तसे चाचणी अहवाल जोडलेले नसताना देयके पारीत करण्यात आलेली आहेत.

5) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी रक्कम प्रदानाच्या वेळेस लालशाईने क्रॉस करणे आवश्यक असताना तशा पध्दतीने कर्णरेषा काढलेली नाही. त्यामुळे एकाच देयकाची दुबार अदाई झालेबाबतची शक्यता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमुना क्रमांक 23 मध्ये कामाच्या/योजनेच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1050/प्र.क्र.1113/33, दिनांक 25/10/1990 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास आर्थिकदृष्टया व तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता ग्रामपंचायतीस कामे देण्यात आलेली आहेत. याबाबत खुलासा करावा. तसेच संबंधीत ग्रामपंचायत आर्थिक / तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत गटविकास अधिकारी / उपअभियंता यांचे प्रमाणपत्र दर्शवून खात्री पटवावी.

10) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/109/प्र.क्र.2/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कंत्राटादाराने शासकीय कामाचा विमा उतरवून त्याबाबतचा पुरावा बांधकाम विभागास सादर करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार देयकातून 1 टक्के विमा रक्कम कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम रुपये संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

**4.184 सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती उपकरातून केलेल्या रस्ता दुरुस्ती खर्चाबाबत.**

**पंचायत समिती वैजापूर, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 29,91,872/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप-01 नुसार गटविकास अधिकारी यांचे स्तरावर दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पंचायत समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामांना गटविकास अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली असल्यामुळे या सर्व प्रशाकीय मान्यता पंचायत समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक होते, तथापि सदर प्रकरणी अशी कारवाई केलेली दिसून येत नाही ही अतिशय गंभीर बाब आहे.

2) शासन अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार देयकातून 5 टक्के कार्यकंत्राट कर वसुल करणे आवश्यक होते. तथापि उपरोक्त एकही रस्ता दुरुस्तीच्या देयकातून कार्यकंत्राट कर वसुल केलेला नाही. तरी सदर कर रुपये 1,49,594/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/ परा 8(35), दिनांक 15/09/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त कामांचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 29,919/- वसुल करुन विमा संचालनालय यांचेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार उपरोक्त रस्ता दुरुस्ती देयकातून 2 टक्के प्रमाणे आयकर रुपये 59,837/- वसुल करणे आवश्यक होते, परंतु सदर देयकातून आयकराच्या रकमा वसुल केलेल्या नाहीत. त्या संबंधीताकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.-109/रा.म.2, दिनांक 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना अनुक्रमांक 6, 7 व 14 वरील कामांचा कठीण मुरूम व्यतिरिक्त इतर कामांचा साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

6) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक ठळकपणे दिसतील असे लावणे आवश्यक असतांना अशी कारवाई केलेली दिसुन येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह करणे आवश्यक

आहे. तथापि सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर न केल्याने या बाबतची खात्री करता आली नाही.

8) उपरोक्त कामासंबंधी ग्रामपंचायतीकडून बी-1 निविदा फॉर्म भरुन घेण्यात आलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी 09/05/प्र.क्र.381/इमारती-02, दिनांक 12/11/2007 नुसार प्रति निविदा फॉर्म फी रुपये 500/- प्रमाणे रुपये 7,500/- चे पंचायत समितीचे नुकसान झाले आहे ते संबंधीताकडून वसुल करुन पंचायत समिती उपकरात भरणा करणे आवश्यक आहे.

9) सदर रस्ता दुरुस्तीचे ग्रामपंचायतींना कामाचे आदेश देतांना विहित नमुन्यात करारनामे करुन घेण्यात आलेले नाहीत. संचिकेत करारनाम्याचे रुपये 100/- किंमतीचे कोरे मुद्रांक निदर्शनास आले.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना नंबर 69 (मालमत्ता नोंदवही) मध्ये पुर्ण झालेल्या कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापि सदर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे इतर निधीमधुनही सदर काम प्रस्तावित / पुर्ण केले किंवा कसे याची खात्री करता आली नाही. तरी सदर नोंदवहीत अद्यावत नोंदी घेऊन अनुपालन दर्शवावे.

**4.185 बांधकामावर होणा-या खर्चातून लेबर सेसची रक्कम वसूल न केलेबाबत.**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 69,521/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती पैठणचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाचे अभिलेखे तपासले असता असे निदर्शनास आले की बांधकामावर होणा-या खर्चातून लेबर सेसची रक्कम वसूल केलेली नाही. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक व्हीसीए-2007/प्र.क्र.788/ कामगार 7-अ, दिनांक 26/10/2009 नुसार बांधकामासाठी होणा-या खर्चातून कपात केलेली 1 टक्के लेबर सेसची रक्कम महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम, कामगार कल्याण यांचेकडे जमा करणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत. मात्र सदर कपातीबाबत विभागाने (बांधकाम) कार्यवाही केलेली नाही. जी करणे आवश्यक होते. सबब बांधकामासाठी केलेली अदायगीवर 1 टक्के रक्कम शासन खाती भरणा करून पूर्तता करावी. तसेच इतर कामांमधील लेबर सेस रक्कमेची परिगणना करून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही अवलंबण्याची दक्षता घ्यावी.

**4.186 बांधकामावर होणा-या खर्चातून कामाचा विमा रक्कम कपात न केलेबाबत.**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,55,81,281/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिप-2000/प्र.क्र.837/35 दिनांक 08/05/2002 अन्वये शासकीय विमा निधी विविध योजनातील कंत्राटी कामाचे विषयक व्यवहार शासकीय विमा निधीकडे करणे बाबत सुचना दिलेल्या आहेत. सदर परिपत्रकान्वये कंत्राटदार सोपविलेल्या कंत्राटा कामाचा विमा कंत्राटदारांनी विमा संचालनालय या कार्यालयाशी कंत्राटाच्या संपूर्ण रक्कमेस व कंत्राटाच्या पूर्ण कालावधीसाठी विमा संचालनायलाने निश्चित केलेल्या विमापत्राखाली उतरविणे सक्तीचे आहे. मात्र पंचायत समिती पैठणचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभाग यांचेकडून करण्यात आलेल्या कामांमधून उपरोक्तप्रमाणे विमा रक्कम कपात न केलेल्या देयकांचा / प्रमाणकांचा उदाहरणादाखल तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद केला आहे. सदरच्या विवरणपत्रामधील कामांमधून विमा रक्कम 1 टक्के कपात करून संबंधीत लेखाशिर्षाखाली शासनखाती भरणा करून तसे अनुपालन सादर करावे. तसेच विवरणपत्रातील नमूद कामांव्यतिरिक्त इतर बांधकाम कामांमधून नियमाप्रमाणे विमा रक्कम परिगणित करून येणारी रक्कम संबंधीत लेखाशिर्षाखाली शासनखाती भरणा करून तसे अनुपालन सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**4.187 तेरावा वित्त आयोग निधीतून केलेल्या नियमबाह्य कामांबाबत.**

**पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 नुसार पंचायत राज संस्थाना त्यांच्या बळकटीकरणासाठी अनुदान देण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक "क" (II) नुसार पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचे (ग्रामीण रस्ते Village Roads) बांधकाम, देखभाल व दुरुस्तीची कामे करणे आवश्यक असतांना ग्रामपंचायतीचे अंतर्गत रस्ते / रस्ते दुरुस्ती इत्यादी कामे केल्याचे उपरोक्त तपशिलावरून दिसून येते. सदर बाब गंभीर असून शासन निर्देशाची उल्लंघन करणारी आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा "इ" (3) नुसार शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार वितरीत निधीतून पंचायत राज संस्थांनी त्यांचे स्तरावर करावयाच्या बाबींच्या नियोजनाचे अधिकार व जबाबदारी पंचायत समितीच्या सभेची असल्याचे व शासनाने विहित केलेल्या बाबींव्यातिरिक्त इतर बाबींवर निधी खर्च केल्यास ती रक्कम संबधित जबाबदार अधिकाऱ्याकडून / कर्मचाऱ्यांकडून वसुल करण्याचे निर्देश असल्यामुळे त्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 08/02/1990 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 154 (5) नुसार कामाचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध केलेला असतांना काम तुकडे पाडून केलेले असल्याचे दिसून येते.

3) शासन अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार देयकातून 5 टक्के कार्यकंत्राट कर वसूल करणे आवश्यक होते. तथापि उपरोक्त देयकातून रुपये 12,500/- कार्यकंत्राट कर वसुल केलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र.837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि या कामांचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 2,500/- वसुल केलेली रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार उपरोक्त कामाचे देयकातून 2 टक्के आयकर रुपये 5,000/- वसुल करणे आवश्यक होते.

6) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.109/रा.म.2, दिनांक 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना वापरलेल्या साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/परा-8 व उपरोक्त दिनांक 30/08/2010 च्या शासन निर्णयानुसार 13 व्या वित्त आयोगाच्या निधीतून ज्या बाबी / योजना हाती घेण्यात आल्या असतील त्यांचे दर्शक फलक संबधीत बाबीं / योजनांच्या ठिकाणी ठळकपणे दिसतील असे लावणे आवश्यक असतांना अशी कारवाई केलेली दिसून येत नाही.

8) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर न केल्याने या बाबतची खात्री करता आली नाही.

9) उपरोक्त कामासंबंधी ग्रामपंचायतीकडून बी-1 निविदा फॉर्म भरून घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी 09/05/प्र.क्र.381/इमारती-02, दिनांक 12/11/2007 नुसार प्रति निविदा फॉर्म फी रुपये 500/- चे पंचायत समितीचे नुकसान झाले आहे ते वसुल करणे आवश्यक आहे.

**4.188 मौजे खोडेपुरी गट क्रमांक 12 नाला खोलीकरण व सरळीकरण.**

**पंचायत समिती जालना, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,98,992/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे 5 (ब) व महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एस.टी.पी/1066/240/74एस, दिनांक 17/02/1972 नुसार करार नाम्यावर दोन साक्षीदाराची नावे व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही न केल्यामुळे करारनाम्याच्या विधी ग्राह्यतेची खात्री पटविणे आवश्यक आहे. तसेच करारनामा हा दिनांकीत केलेला नाही. सदरील करारनामा कोणी व कोणास कोणासाठी लिहुन दिलेला आहे, याची खात्री पटत नाही.

2) देयकासोबत तुलनात्मक तक्ता कमी / अधिक खर्चाची आकडेवारी नमुद केलेली नाही, तसेच FINAL BILL मध्ये ती करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट क्रमांक 45 (प्रकरण 2 नुसार) उपअभियंता हे कामाचे व्यवस्थापन व कामे कार्यान्वीत करणेबाबत पुर्णता जबाबदार आहे, तसेच ग्रामविकास विभागाकडील अर्धशासकीय पत्र क्रमांक 1091/प्रक्र/69/15, दिनांक 29/10/1999 नुसार कामाची वारंवार पाहणी करुन उच्चस्तरीय अधिका-यांना निरिक्षण अहवाल सादर करणेची जबाबदारी, कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांची आहे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) नियोजित कामाच्या ठिकाणी सुरुवातीस व शेवटी कामाविषयी शासन निर्णय क्रमांक जिपर/2009/ प्र.क्र.180/पंरास-8, दिनांक 31/12/2009 अन्वये फलक लावणे बंधनकारक आहे, अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम 157 चे परिशिष्ट 8 मधील नियम 20 प्रमाणे कंत्राटदाराकडुन केलेला करारनामा नोंदवही नमुना नंबर 49 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तथापि लेखापरिक्षणामध्ये अशी नोंदवही दर्शविण्यात आलेली नाही. सक्षम प्राधिकारी यांनी याबाबत खात्री करावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 (3) व नियम 153 नुसार अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा अधिक परिमाणे करता येत नाही असे असतांना प्रत्यक्ष कामावरील परिमाणामध्ये कमी / अधिक प्रमाण करुन काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

7) सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांचे परिपत्रक क्रमांक जी.आर34/का-4/516, दिनांक 09/01/1987 नुसार सिमेंट खडी, वाळु, वीट इत्यादीचा चाचणी अहवाल शासकीय प्रयोग शाळेकडुन होणे आवश्यक असतांना अशी चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

8) करारनामा तयार करतांना करारनाम्यावर कामाचे आदेश व दिनांक नमुद केलेला नाही, तसेच दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरी घेतल्याचे दिसुन आले नाही.

**4.189 सन 2015-2016 पंचायत समिती उपकरातून व 13 वा वित्त आयोगामधून ग्रामपंचायत स्तरावर एलईडी पथदिवे बसविणे बाबतच्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती अंबड, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती अंबड अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरुन पंचायत समिती उपकरातुन व 13 वा वित्त आयोगातुन एकुण 55 गावांना 1100 संच बसविण्यात आले त्यावर रक्कम रुपये 85,73,400/- खर्च करण्यात आलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2013/प्र.क्र.49/पंरा-7, दिनांक 07/02/2013 नुसार शासनाने पंचायत राज संस्था अंतर्गत रक्कम रुपये 1,00,000/- व त्यापेक्षा अधिक किंमतींच्या साहित्य खरेदीसाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखसं2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नुसार शासकीय विभागानी करावयाच्या खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियम पुस्तिका प्रसिध्द केली असुन सदर नियमपुस्तिकेतील तरतुदीनुसार साहित्य खरेदीची तपासणी करण्यात आली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2013/275/प्र.क्र.172/पं.रा-7, दिनांक 19/10/2011 नुसार साहित्य खरेदी व सेवा पुरवठा शासनाव्दारे दरकरार केलेल्या वस्तु या दरकरारानुसार त्या यंत्रणेकडुनच खरेदी करण्यात याव्यात.

4) सदरील कामासाठी न्यु सदर्शन इलेक्ट्रोनिक्स जालना यांना अदांजपत्रकाप्रमाणे निविदा दर मान्य केल्यानंतर रेकॉन पॉवर, कॉपोरेशन, पंकज इलेक्ट्रोनिक्स यांना कोणत्या प्राधिकारान्वये कामे देण्यात आली प्राप्त 3 निविदाधारकांशी वाटाघाटी का करण्यात आली नाही. त्यामुळे तुलनात्मक दराचा फायदा होऊ शकला नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार दिनांक 01/07/2010 पासुन ठेकेदार व उपठेकेदारास एकाचवेळी प्रदान रुपये 30,000/- व वार्षिक प्रदान रुपये 75,000/- असेल तेव्हा अनुक्रमे 2 टक्के (संस्थात्मक व 1 टक्के वैयक्तिक नावे) दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे.

6) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी/2005/प्र.क्र.324/इमा-2, दिनांक 03/03/2006 मधील मुद्दा क्रमांक 4 नुसार मुल्यवर्धीत कर अधिनियमानुसार नोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातुन अधिसुचना क्रमांक व्हिएटी 1505/सीआर 13/कराधना 9, दिनांक 01/04/2015 नुसार 01/04/2015 पासुन 2 टक्के व अनोंदणीकृत क्रमांक जेओ(एयक्यु) व्हीटी/2005/97, दिनांक 04/04/2012 नुसार 01/04/2012 पासुन मुल्यवर्धीत कर 5 टक्के वसुल करणे बंधनकारक आहे.

**4.190 अंबेगांव येथे जंजाळवस्ती येथे सामाजिक सभागृह बांधकाम.**

**पंचायत समिती जाफ्राबाद, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 209, माहे मार्च, 2016 अन्वये रक्कम रुपये 3,88,006/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे 5 (ब) व शासन महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एस.टी.पी/1066/240/74एस, दिनांक 17/02/1972 नुसार करार नाम्यावर दोन साक्षीदाराची नावे व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही न केल्यामुळे करारनाम्याच्या विधी ग्राहयतेची खात्री पटविणे आवश्यक आहे. तसेच करारनामा हा दिनांकीत केलेला नाही. सदरील करारनामा कोणी व कोणास कोणासाठी लिहुन दिलेला आहे, याची खात्री पटत नाही.

2) गुणवत्ता प्रमाणपत्रावर व काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रावर अधिकृतरीत्या जावक क्रमांक, दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे साहित्य गुणवत्ते संबंधी खात्री करता येत नाही. खुलासा करावा.

3) देयकासोबत तुलनात्मक तक्ता कमी / अधिक खर्चाची आकडेवारी नमुद केलेली नाही, तसेच FINAL BILL मध्ये करण्यात आलेली नाही याबाबत खुलासा करुन पुर्तता करावी.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट क्रमांक 45 (प्रकरण 2 नुसार) उपअभियंता हे कामाचे व्यवस्थापन व कामे कार्यान्वीत करणेबाबत पुर्णता जबाबदार आहे, तसेच ग्रामविकास विभागाकडील अर्धशासकीय पत्र क्रमांक 1091/प्रक्र/69/15, दिनांक 29/10/1999 नुसार कामाची वारंवार पाहणी करुन उच्चस्तरीय अधिका-यांना निरिक्षण अहवाल सादर करणेची जबाबदारी, कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांची आहे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

5) नियोजित कामाच्या ठिकाणी सुरुवातीस व शेवटी कामाविषयी शासन परिपत्रक निर्णय क्रमांक जि.प/ 2009/प्र.क्र.80/पंरास-8, दिनांक 31/12/2009 अन्वये फलक लावणे बंधनकारक आहे, अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही, खुलासा करावा.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1040/प्र.क्र.1173/ 35, दिनांक 25/10/1990 अन्वये ग्रामपंचायतीचे गटविकास अधिकारी यांचे सक्षमतेचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

सदर कामे ग्रामपंचायतीच्या हद्दीत झाली आहे याचा नमुना-8 अ चा उतारा संचिकेत दिसुन आला नाही, खुलासा करावा.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 (3) व नियम 153 नुसार अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा अधिक परिमाणे करता येत नाही. असे असतांना प्रत्यक्ष कामावरील परिमाणामध्ये कमी / अधिक प्रमाण करुन काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांचे परिपत्रक क्रमांक- जी.आर34/का-4/516, दिनांक 09/01/1987 नुसार सिमेंट खडी, वाळु, वीट इत्यादीचा चाचणी अहवाल शासकीय प्रयोग शाळेकडुन होणे आवश्यक असतांना अशी चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

9) करारनामा तयार करतांना करारनाम्यावर कामाचे आदेश व दिनांक नमुद केलेला नाही, तसेच दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरी घेतल्याचे दिसुन आले नाही.

**4.191 2515- इतर ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत एकूण 30 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 65,21,480/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 153 (1) नुसार मान्यताप्राप्त अंदाजपत्रकातील विनिर्देशाप्रमाणे काम काटेकोरपणे पार पाडण्याची व करानाम्यातील अटी अंमलात येत आहेत, याची खात्री करण्याची जाबदारी संबंधीत अभियंता यांची आहे. तथापि, कामे करतांना सिमेंट क्राँकीटची मंजुर जाडी 0.10 सें.मी ऐवजी 0.12, 0.13, 0.14 अशी केल्याने अनुक्रमांक 6, 7, 26, 27, 28, व 29 वरील कामावर अनुक्रमे रुपये 58,334/-, 54,738/-, 33,683/-, 54,838/- आणि अ.क्रं.29 वर रुपये 30,070/- असा रुपये 2,31,663/- अवाजवी खर्च केल्याने रस्त्याच्या मंजूर लांबीपेक्षा कमी कामे करण्यांत आलेली आहेत. सबब सदरचा अवाजवी झालेला खर्च रुपये 2,31,663/- अमान्य करण्यात येतो.

2) अ.क्रं.5,9,10,11 व 22 मधील कामाच्या अंदाजपत्रकात नालीबांधकामासाठी तरतुद केलेली असतांना सदरील कामे न करता बचत रक्कम इतर बाबीवर खर्च केलेली आहे. ज्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 (3) नुसार मंजुरी प्राधिका-यांचे आदेश न घेताच सदरील देयकाचे प्रदाने केलेली आहेत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 प्रमाणे करारनाम्यात काम पूर्ण करण्याचा कालावधी विहीत केलेला असतो. तथापि, असा कालावधी करारनाम्यात नमूद केलेला नाही. ज्यामुळे कामे विहित वेळेत पूर्ण न झाल्यास कांहीही उपाययोजना करता येत नाही. तसेच दोष दायित्व अवधी हा बांधकाम प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचा असा ठराविक कालावधी असतो ज्यात कंत्राटदाराला कार्यस्थानावर (परत येवून) दोषांचे निवारण करणे बंधनकारक असते, तथापि, शासन परिपत्रक क्रमांक सार्वजनिक बांधकाम विभाग संकीर्ण-2012/प्र.क्र.-467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार दोष निवारण कालावधी 2 वर्षे केलेला आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदेच्या कराराच्या कलमाअंतर्गत दोष दायित्वाचा अवधी नमूद केलेला नाही. त्यामूळे दोष दायित्व अवधी मध्येच कामाची दुरुस्ती पंचायत समितीने प्रस्तुत निधीतून केलेची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वरील रस्ते बांधकाम पूर्वी कधी पूर्ण झालेले होते. याबाबत ग्रामपंचायत कडुन नमुना नं.26 ची प्रत घेणे अभिप्रेत असतांना याबाबत पंचायत समितीस्तरावर अशी कार्यवाही झालेली नाही.

4) कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, अशी तपासणी केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदर बाबीचा समावेश करुन कामाची माहितील दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

6) वरील कामावर किती सिमेंट कंत्राटदाराने आणले व किती सिमेंट कामावर वापरले याबाबत नोंदवही नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत सिमेंट वापर तक्ता (Cement consumption) नोंदविलेले नसल्याने अंदाजपत्रकातील विर्निदेशाप्रमाणे सिमेंट वापरुन काम योग्य त्या गुणवत्तेचे झाले बाबतची अभिलेख्यावरुन पडताळणी करता आलेली नाही. तथापि, अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाची प्रदाने केली आहेत.

7) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतू सदर कामामध्ये रुपये 3,26,074/- मुल्यवर्धीत कर कपात केलेला नाही. मुल्यवर्धीत कर कमी कपातीची रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करावी. तसेच सन 2015-2016 केलेल्या प्रदानाचे पुर्नविलोकन करुन अशी कपात केली नसल्यास ती करण्याची दक्षता घ्यावी.

8) विमानिधीची रक्कम रुपये 32,607/- जादा कपात केलेली आहे. तसेच विमा संचालनयाकडुन विमापत्रे प्राप्त करुन घेतली नाहीत. याबाबत सर्व प्रकरणाचे पुर्नविलोकन करुन जादा रक्कम संबंधिताकडुन वसूल होणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.-44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

10) पंचायत समितीकडील काही मोजमाप पुस्तिका हया विभागाने पुरविलेल्या नसंताना अशा मोजमाप पुस्तिका वापरात असल्याचेही लेखापरिक्षणाचे वेळी निदर्शणास आलेले आहे.

**4.192 13 वा वित्त आयोगांतर्गत सौरपथदिवे खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समितीने 2015-2016 मध्ये ग्रामपंचायतीना सौर पथदिवे पुरविलेली असुन त्यावर 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 71,35,988/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ-2010/प्र.क्र.22/वित्त 4, दिनांक 30/08/2010 अन्वये 13 व्या वित्त आयोगाचे निधीमधून पंचायत समिती स्तरावर करावयाच्या बाबी बाबतचे नियोजन व पालन करणेसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील बाब क्रमांक 10 नुसार पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेसंबंधी ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक 18/08/2010 च्या शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या विविध बाबीसाठी पुरक निधी म्हणून या निधीचा वापर करणे बाबत सूचना आहेत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएस-2610/प्र.क्रं.1/पंरा-4, दिनांक 180/08/2010 चे परिच्छेद 7 व 9 मधील निकषांची पूर्तता करुन परिच्छेद 11 प्रमाणे संबंधीत गटविकास अधिकारी यांचेकडे सदर योजनेत सहभागी होणेसाठी प्रस्ताव पाठवतील. तथापि, वरील गांवे हे सदर संतुलित समृध्द ग्रामयोजनेत सहभागी आहेत किंवा नाहीत. याबाबतचे अभिलेखे अर्धसमास पत्र क्रमांक 74, दिनांक 10/01/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 79, दिनांक 22/03/2017 अन्वये मागणीकरुनही उपलब्ध झाली नसल्याने याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रंमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पंरा-7, दिनांक 07/02/2013 अन्वये दिनांक 01/02/2013 पासुन रुपये 1.00 लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीची साहित्य खरेदी / सेवापुरवठा यासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीना बंधनकारक करण्यात आलेले असतांना वरील रुपये 71,35,988/- खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया न राबविता वेगवेगळया दराने खरेदी केलेली आहे.

3) सौरपथदिवे बसविणेबाबत ग्रामपंचायतीकडुन कुठलीही लेखी स्वरुपात मागणी नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 नुसार, पुरवठाच्या बाबतीत बिलाचे प्रदान करणेपुर्वी, साहित्य घेणा-या अधिका-याने ते चांगल्या स्थितीत मिळाल्याचे आणि त्यांची योग्य त्या संग्रह नोंदवहीत किंवा संख्यात्मक लेख्यात नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदवहीतील किंवा पृष्ठांकाच्या लेख्यातील संदर्भ, बिलावर दर्शवुन

नोंदवून ठेवणे आवश्यक असतांना अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. किंवा सौरपथदिवे संबंधीत गावी बसविलेबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंदी केलेल्या नाहीत. अनुक्रमांक 1 व 2 येथील केंद्रीय भांडार मुंबई आणि क्रियेटिव्ह इले. अहमदनगर यांचेकडून खरेदी केलेल्या सौरपथदिवे देयकात खरेदीचे सविस्तर वर्णन (जसे किती वॅट सोलर पॅनेल, अम्पा. बॅटरी, वॅट लिड लाईट, पोल लांबी, वायर इ.) नसल्याने सौरपथदिवे योग्य विर्निदेशा (specification) प्रमाणे प्राप्त झालेची खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ-2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 अन्वये 13 वा वित्त आयोगामधील कामाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील अ.क्रं.17 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्त पक्ष नियंत्रण कक्ष (Third Party control / vigilance cell) गठीत करावा व पंचायत राज संस्थामार्फत होणारी कामे / दिल्या जाणा-या सेवा / योजना / कार्यक्रम यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी अशा सूचना आहेत. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

5) सौरपथदिवे खरेदीसाठी घेतलेली तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता इत्यादी अनुषंगिक अभिलिखे अर्धसमास पत्र क्रमांक 74, दिनांक 10/01/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 79, दिनांक 22/03/2017 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नसल्याने याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 77 (2) नुसार प्रदानाच्या पावत्या घेतलेल्या नाहीत.

**4.193 अंगणवाडी बांधकाम केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती गेवराई, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत 8 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 12,08,518/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजुर करण्यात आलेल्या प्रत्येक कराराची नोंद नमुना नं.48 मधील नोंदवहीत नोंदविण्यात येईल आणि प्रत्येक नोंदीवर परिषदेचा विभागीय लेखापाल किंवा यथास्थित गट उपलेखापाल आदयाक्षरी करील. कंत्राटदाराला वेळोवेळी दिलेल्या रकमेची नोंदही त्या नोंदवहीत करण्यात येईल यानोंदीवर लेखापाल स्वाक्षरी करील परंतु पंचायत समिती पाटोदा यांनी अशी नोंदवही ठेवुन कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चेनियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाच्या दृश्य मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच दृश्य नसणा-या (hidden measurements) मोजमापाची उपअभियंत्या पेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडुन योग्य वेळी प्रमाणी करण करणेआवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्या मध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापी, अशी तपासणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदरबाबीचा समावेश करुन कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

4) अंगणवाडी बांधकामाच्या प्राक्कलनामध्ये विद्युतीकरणाचा समावेश असुन त्याकरीता रुपये 25,000/- ते 30,000/- खर्च अंदाजित केला आहे, परंतु प्रत्यक्षात विद्युतीकरण न करताच कामे केल्याचे मोजमाप पुस्तीकेवरुन दिसते.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची / योजनेची प्रगती नोंदवही नमुना नं.23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नं.39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना नं.40

रस्ते नोंदवही आणि नियम 197 नुसा रपुर्ण केलेल्या कामाची नोंदवही नमुना नं. 69 ठेवलेल्या नाहीत. ज्यामुळे पुर्ण / अपुर्ण कामाची आढावा घेता आला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 51(3) नुसार देयके प्राप्त झाल्यानंतर ती नमुना नं.12 बील नोंदवही मध्ये ज्या क्रमाने ती मिळाले असतील त्या क्रमाने नोंदविणे तसेच सदर देयकावर तरतुद नमुद करणे व नंतर देयके पारीत करणे आवश्यक आहे.

7) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडुन 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. तथापि, सदर कामाचे बाबतीत आयकर कपात करण्यात आलेला नाही. तरी संबंधीताकडुन आयकराची रक्कम 24,170/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 अन्वये कंत्राटदाराने रक्कम प्राप्त बाबत महसुल मुद्रांकीत पोच घेणे आवश्यक असतांना अशी पोचघेण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपिए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तीका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समीतीने एकाच मोजमाप पुस्तीकेत वेगवेगळया कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 165 नुसार मोजमाप पुस्तिकाची नोंदवही नमुना नं.53 मध्ये ठेवण्यात येईल व त्या नोंदवहीत प्रत्येक पुस्तकाचा मुद्रीत क्रमांक, ज्या व्यक्तिला ते देण्यात आले असेल तिचे नांव ते दिल्याची तारीख आणि ते परत मिळाल्याची तारीख दर्शविण्यात येईल. तथापि पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही. पंचायत समितीकडे वापरात असलेल्या मोजमाप पुस्तिका ज्या शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यावर मोजमाप पुस्तिका संबंधीतास दिल्याबाबत पृष्ठाकंन, दिनांक नाही.

**4.194 विविध बांधकामातील मुल्यवर्धीत कराची कपात कमी करणे बाबत.**

**पंचायत समिती माजलगांव, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 79 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 74,40,831/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समितीने कमी कपात केला असुन त्यामुळे वॅट चे शासनाचे रुपये 3,01,629/- चे नुकसान झाले आहे. संबंधीतांकडुन सदर रक्कम वसुलीस पात्र ठरते.

2) उपरोक्त प्रमाणे सन 2015-2016 या आर्थिक वर्षातील निवड महिन्या खेरीज पारित केलेल्या बांधकामाच्या देयकाचा आपल्या स्तरावर आढावा घेणे आवश्यक आहे.

3) मुल्यवर्धीत कर शासन खाती भरणा केल्याबाबतच्या चलन / पावती बांधकामाच्या नस्तीमध्ये आढळून आल्या नाहीत.

**4.195 दलित वस्ती सुधार योजनाअंतर्गत केलेल्या विविध कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती अंबाजोगाई, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत 37 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 48,37,227/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची / योजनेची प्रगती नोंदवही नमुना नं.23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नं.39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना नं.40 रस्ते नोंदवही आणि नियम 197 नुसार पुर्ण केलेल्या कामाची नोंदवही नमुना नं. 69 ठेवलेल्या नाहीत. ज्यामुळे पुर्ण / अपुर्ण कामाची आढावा घेता आला नाही.

2) मुल्यवर्धीत कर कपात न करणे बाबत - विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु तपासणी केलेल्या

देयकातुन पंचायत रक्कम रुपये 26,713/- कमी कपात केली आहे, सदर रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) आयकर कपाती बाबत - आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडुन 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु तपासणी केलेल्या देयकातुन पंचायत रक्कम रुपये 39,889/- कमी कपात केली आहे, सदर रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 51(3) नुसार देयके प्राप्त झाल्या नंतर ती नमुना नं.12 बील नोंदवही मध्ये ज्या क्रमाने ती मिळाले असतील त्या क्रमाने नोंदविणे तसेच सदर देयकावर तरतुद नमुद करणे व नंतर देयके पारीत करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाची प्रदाने केली आहेत. उपरोक्त विवरणातील अनुक्रमांक 08, 11, 17, 22, 23, 30, 34, व 35 या कामांचे साहित्य चाचणी अहवाल नस्तीमध्ये आढळून आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. उपरोक्त विवरणातील अनुक्रमांक 04, 07, 08, 10, 21, 23, 35 व 36 चे कमाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देयकासोबत / नस्तीमध्ये आढळून आले नाही.

7) अनुक्रमांक 01, 02, 03, 06, 09, 13, 16, 18, 20, 24, 31, 33 व 37 या कामाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र अगोदरचे असुन साहित्य चाचणी अहवाल नंतरच्या तारखेचे आहेत. त्यामुळे साहित्य चाचणी अहवाल प्राप्त न करताच कामे पुर्ण केले आहेत, चाचणी अहवाल घेणे किंवा न घेणे ही बाब केवळ formalities पुर्ण करणेसाठी केलेली दिसते.

8) 1 टक्के दराने कामाचा विमा **-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098-प्र.क्र./शासन हमी/2889, दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु तपासणी केलेल्या देयकातुन पंचायत रक्कम रुपये 4,430/- कमी कपात केली आहे, सदर रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चेनियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाच्या दृश्य मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच दृश्य नसणा-या (hidden measurements) मोजमापाची उपअभियंत्या पेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडुन योग्य वेळी प्रमाणी करण करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापी, अशी तपासणी केलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदर बाबीचा समावेश करुन कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

11) 1 टक्के उपकर वसुली बाबत - उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-12007/प्र.क्र.788/कामगार 7, दिनांक 21/04/2008 नुसार वसुल करणे आवश्यक आहे. परंतु तपासणी केलेल्या देयकातुन पंचायत रक्कम रुपये 4,430/- कमी कपात केली आहे, सदर रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपिए-2000/प्रक्र.-44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तीका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समीतीने एकाच मोजमाप पुस्तीकेत वेगवेगळया कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

**4.196 13 व्या वित्त आयोगाअंतर्गत शासन निकषा बाहेरील कामे करुन नियमबाह्य खर्च केलेबाबत.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत 46 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 22,44,280/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील सर्व कामेही रस्त्यावर विद्युत पोल उभारणी करणे, केबल / वायर फिटींग इत्यादी करुन विद्युत दिवे बसविणेची होती. यासाठी ग्रामपंचायतीकडे पुरेशे तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री असल्याबाबतची गटविकास अधिकारी यांनी खात्री करुनची कामे सक्षम यंत्रणेस देणे अभिप्रेत होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. कामाच्या गुणवत्तेबाबतचे अहवाल दर्शविलेले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ-2010/प्र.क्र.22/वित्त 4, दिनांक 30/08/2010 अन्वये 13 व्या वित्त आयोगाचे निधीमधून पंचायत समिती स्तरावर करावयाच्या बाबी बाबतचे नियोजन व पालन करणेसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील बाब क्रमांक 10 नुसार पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेसंबंधी ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक 18/08/2010 च्या शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या विविध बाबीसाठी पुरक निधी म्हणून या निधीचा वापर करणे बाबत सूचना आहेत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएस-2610/ प्र.क्र.1/पंरा-4, दिनांक 18/08/2010 चे परिच्छेद 7 व 9 मधील निकषांची पूर्तता करुन परिच्छेद 11 प्रमाणे संबंधीत गटविकास अधिकारी यांचेकडे सदर योजनेत सहभागी होणेसाठी प्रस्ताव पाठवतील. तथापि वरील गावे हे सदर संतुलित समृध्द ग्रामयोजनेत सहभागी आहेत किंवा नाहीत. याबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाली नसल्याने याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रंमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पंरा-7, दिनांक 07/02/2013 अन्वये दिनांक 01/02/2013 पासुन रुपये 1.00 लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीची साहित्य खरेदी / सेवापुरवठा यासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीना बंधनकारक करण्यात आलेले असतांना वरील रुपये 22,44,280/- खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया न राबविता वेगवेगळया दराने खरेदी केलेली आहे.

3) सौरपथ दिवे बसविणेबाबत ग्रामपंचायतीकडुन कुठलीही लेखी स्वरुपात मागणी नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 नुसार, पुरवठाच्या बाबतीत बिलाचे प्रदान करणेपुर्वी, साहित्य घेणा-या अधिका-याने ते चांगल्या स्थितीत मिळाल्याचे आणि त्यांची योग्य त्या संग्रह नोंदवहीत किंवा संख्यात्मक लेख्यात नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदवहीतील किंवा पृष्ठांकाच्या लेख्यातील संदर्भ, बिलावर दर्शवुन नोंदवून ठेवणे आवश्यक असतांना अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. किंवा सौरपथदिवे संबंधीत गावी बसविलेबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंदी केलेल्या नाहीत. खरेदी केलेल्या सौरपथदिवे देयकात खरेदीचे सविस्तर वर्णन (जसे किती वॅट सोलर पॅनेल, अम्पा. बॅटरी, वॅट लिड लाईट, पोल लांबी, वायर इ.) नसल्याने सौरपथ दिवे योग्य विर्निदेश (specification) प्रमाणे प्राप्त झालेची खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ-2010/प्र.क्र. 22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 अन्वये 13 वा वित्त आयोगामधील कामाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील अ.क्रं.17 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्त पक्ष नियंत्रण कक्ष (Third Party control / vigilance cell) गठीत करावा व पंचायत राज संस्थामार्फत होणारी कामे / दिल्या जाणा-या सेवा / योजना / कार्यक्रम यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना आहेत. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

5) सौरपथ दिवे खरेदीसाठी घेतलेली तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता इ. अनुषंगिक अभिलिखे अर्धसमास पत्र क्रमांक 75, दिनांक 26/10/2016 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नसल्याने याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 77 (2) नुसार प्रदानाच्या पावत्या घेतलेल्या नाहीत.

**4.197 विविध योजनेंतर्गत मुल्यवर्धित कर कमी कपात केलेबाबत**.

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 135 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,02,12,938/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती आष्टीचे सन 2015-2016 चे लेखा परिक्षणात बांधकाम देयकातून व्हॅट 5 टक्के प्रमाणे कपात करणे आवश्यक असतांना 2 टक्के प्रमाणे व्हॅट कपात केल्याचे दिसून आले.

तरी 135 प्रमाणकावरील रक्कम रूपये 6,04,906/- वसूल करणे आवश्यक आहे.

**4.198 दलित वस्ती सुधार योजना कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती पाटोदा, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 45 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 92,28,296/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजुर करण्यात आलेल्या प्रत्येक कराराची नोंद नमुना नं.48 मधील नोंदवहीत नोंदविण्यात येईल आणि प्रत्येक नोंदीवर गट उपलेखापाल आदयाक्षरी करील. कंत्राटदाराला वेळोवेळी दिलेल्या रकमेची नोंदवही त्या नोंदवहीत करण्यात येईल या नोंदीवर लेखापाल स्वाक्षरी करील परंतु पंचायत समितीने यांनी अशी नोंदवही ठेवुन कार्यवाही केलेली नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2012/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 23/11/2011 नुसार दोषनिवारण कालावधी 2 वर्षे केलेला आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे कराराच्या कलमांतर्गत दोष दायित्वाचा अवधी नमूद केलेला नाही. त्यामुळे दोष दायित्व अवधी मध्ये रस्त्याची कामे पंचायत समितीकडुन केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाच्या दृश्य मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच दृश्य नसणा-या (hidden measurements) मोजमापाची उपअभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडुन योग्यवेळी प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापी, अशी तपासणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदर बाबीचा समावेश करुन कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजुर करण्यात आलेल्या प्रत्येक कराराची नोंद नमुना नं.48 मधील नोंदवहीत नोंदविण्यात येईल आणि प्रत्येक नोंदीवर परिषदेचा विभागीय लेखापाल किंवा यथास्थित गट उपलेखापाल आदयाक्षरी करील. कंत्राटदाराला वेळोवेळी दिलेल्या रकमेची नोंदही त्या नोंदवहीत करण्यात येईल या नोंदीवर लेखापाल स्वाक्षरी करील परंतु पंचायत समिती केज यांनी अशी नोंदवही ठेवुन कार्यवाही केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची / योजनेची प्रगती नोंदवही नमुना नं.23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नं.39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना नं. 40 रस्ते नोंदवही ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे, तथापि, अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाची प्रदाने केली आहेत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 148 प्रमाणे करारनाम्यात काम पूर्ण करण्याचा कालावधी विहीत केलेला असतो. तथापि, खालील कामाच्या संदर्भात कामाची मुदत संपुनही सदरची कामे पूर्ण झालेली नाहीत व कंत्राटदाराने मुदतवाढीचे अर्जही केलेले नाहीत. अशा कंत्राटदारावर ठेका रद्द करण्याबाबत कार्यवाही केलेली नाही व दंडही आकारला नाही. प्रशासकिय मंजुरीच्या आदेशातील अट क्र.8 नुसार जर काम एक वर्षाच्या आत पुर्ण झाले नाही, तर सर्व रक्कम गामपंचायतीकडुन वसुल करण्यात येईल. परंतु अशी कार्यवाही झाली नाही.

7) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) नुसार कंत्राटदाराकडुन 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. सदर कामाचे बाबतीत आयकर कपात करण्यात आलेला नाही. तरी संबंधीताकडुन आयकराची रक्कम रुपये 1,71,474/- वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिआर 2020/प्र.क्र.44/ 99/विग/9/33, दिनांक 30/06/2004 नुसार रुपये 10.00 लक्ष पर्यंतची कामे ग्रामपंचायतींना देण्यात येतात. परंतु संबधीत ग्रामपंचायत सक्षम असलेबाबत गटविकास अधिका-यांची प्रमाणपत्र दिले नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 51(3) नुसार देयके प्राप्त झाल्यानंतर ती नमुना नं.12 बील नोंदवहीमध्ये ज्या क्रमाने ति मिळाले असतील त्या क्रमाने नोंदविणे तसेच सदर देयकावर तरतुद नमुद करणे व नंतर देयके पारीत करणे आवश्यक असतांना पंचायत समितीतील लेखा विभागाकडे प्राप्त झालेली देयके बीलाची नोंदवही न.नं 12 मध्ये न नोंदविता देयके पारीत केलेली आहेत.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपिए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तीका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने एकाच मोजमाप पुस्तीकेत वेगवेगळया कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 165 नुसार मोजमाप पुस्तिकाची नोंदवही नमुना नं.53 मध्ये ठेवण्यात येईल व त्या नोंदवहीत प्रत्येक पुस्तकाचा मुद्रीत क्रमांक, ज्या व्यक्तिला ते देण्यात आले असेल तिचे नांव ते दिल्याची तारीख आणि ते परत मिळाल्याची तारीख दर्शविण्यात येईल तथापि, पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही. पंचायत समितीकडे वापरात असलेल्या मोजमाप पुस्तिका ज्या शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यावर मोजमाप पुस्तिका संबंधीतास दिल्याबाबत पृष्ठाकंन, दिनांक नाही. पंचायत समितीकडील काही मोजमाप पुस्तिका हया विभागाने पुरविलेल्या नसतांना वापरात असल्याचेही लेखापरिक्षणाचे वेळी निर्दशनास आलेले आहे.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 153 नुसार मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही बहुतांशी कामात झालेली नाही. तसेच महराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 नुसार कार्यवाही न करताच देयकांचे प्रदान करण्यांत आलेले आहे.

13) मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 35(ब) नुसार संवितरण अधिकारी प्रदानार्थ देयक पारीत करतांना त्यावर कामाचे पुर्ण नांव, खर्चाचे वर्गीकरण, देयकातील सर्व कपाती केल्या आहेत. हे पाहण्यासाठी जबाबदार असेल. तथापि पंचायत समिती येथील प्रदान झालेल्या बांधकाम देयकावर तपशीलवार लेखाशिर्ष, उपलब्ध तरतुद, झालेला खर्च, शिल्लक तरतुद इ. बाबत संवितरण अधिकारी यांनी दुर्लक्ष्य केलेल दिसुन येते.

14) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिआर 2020/प्र.क्र.44 /99/विग/9/33, दिनांक 30/06/2004 नुसार रुपये 10.00 लक्ष पर्यंतची कामे ग्रामपंचायतींना देण्यात येतात. परंतु संबधीत ग्रामपंचायत सक्षम असलेबाबत गटविकास अधिका-यांची प्रमाणपत्र दिले नाही.

15) एकाही कामासाठी ब-1 निविदा पुस्तक (B-1 Tender Booklet) चा वापर केला नाही.

16) अग्रीम दिलेल्या कामाना अग्रीम दिल्याची नोंद अग्रीम नॊदवहीत नाही.

17) मोजमाप पुस्तीकेवर टाकलेला प्रमाणक क्रमांक व प्रमाणकावर टाकलेला प्रमाणक क्रमांक यात फ़रक आहे.

**4.199 दलित वस्ती योजनेतून ग्रामपंचायतींना सौरदिवे बसविण्यावरील नियमबाह्य खर्चाबाबत.**

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** ग्रामपंचायतीने 40 नग प्रती नग 5982 प्रमाणे 2 ग्रामपंचायतीने पथदिवे बसविण्यावर 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,32,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणे पथदिवे बसविण्याबाबत सन सोलार सिस्टिम यांचे नावे धनादेश देण्यात आला आहे. परंतु उपप्रमाणकांची तपासणी केली असता सदर खरेदीची निविदा प्रक्रिया ग्रामपंचायत स्तरावर केली असल्याचे दिसून येते. सदर निविदा प्रक्रिया ग्रामपंचायतीने केली असल्यामुळे पंचायत समिती परळी यांनी सदर धनादेश संबंधीत ग्रामपंचायतींना देणे आवश्यक होते. महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं नस्ती 2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार रुपये 3 लक्षावरील खरेदी ही ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे करणे आवश्यक होते. परंतु वरील सर्व बाबीवरुन असे दिसून येते की ई-निविदा कार्यप्रणाली टाळण्यासाठी पंचायत समितीने कुठलीही शहानिशा न करता पुरवठादाराला देयके प्रदान केले आहेत.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/2014/प्रक्र.82/भाग III /उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील मुद्दा क्रमांक 08 व 09 नुसार एकाच आर्थिक वर्षातील एकाच प्रकारच्या वस्तुचे खरेदीचे मुल्य रुपये 3,00,000/- पेक्षा अधिक असल्याने ई-निविदा प्रकीया राबवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) वरील सर्व कामेही तांत्रिक स्वरुपाची आहेत. यासाठी ग्रामपंचायतीकडे पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री असल्याबाबतची गटविकास अधिकारी यांनी खात्री करुनच कामे सक्षम यंत्रनेस देणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केली नाही. तसेच कामाच्या गुणवत्तेबाबतचे अहवाल दर्शविलेले नाही.

**4.200 2515 योजनातून केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती परळीने सन 2015-2016 वर्षात 28 प्रमाणकान्वये कामे करण्यांत आलेली असून त्यावर रुपये 85,94,686/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 प्रमाणे करारनाम्यात काम पूर्ण करण्याचा कालावधी विहीत केलेला असतो. तथापि, असा कालावधी करारनाम्यात नमूद केलेला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाच्या दृश्य मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच दृश्य नसना-या (Hidden measurements) मोजमापाची उपअभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडून योग्यवेळी प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, अशी तपासणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप र-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदर बाबीचा समावेश करुन कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची / योजनेची प्रगती नोंदवही नमुना नं.23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नं.39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना नं.40 रस्ते नोंदवही आणि नियम 197 नुसार पूर्ण केलेल्या कामाची नोंदवही नमुना नं.69 ठेवलेल्या नाहीत. ज्यामुळे पूर्ण / अपुर्ण कामाची आढावा घेता आला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे तथापि, अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाची प्रदाने केली आहेत.

6) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामामध्ये मुल्यवर्धीत कर कपात केलेला नाही. मुल्यवर्धीत कराची रुपये 3,93,325/- वसुल करणे आवश्यक आहे.

सदरबाब उदाहरणा दाखल असुन इतर वर्षात व इतर महिन्यात अशी अनियमितता घडलेली असल्यास त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारची अनियमितता हस्तांतरीत (जिल्हा निधि, अभिकरण) योजनेमध्ये इतर महिन्यात झाली असल्याची शक्यता नाकारता येते नाही. त्यामुळे इतर महिन्यातील कमी कपात वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

7) अ.क्र.22 ते 29 ची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर केले नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

9) पंचायत समितीकडील काही मोजमाप पुस्तिका हया विभागाने पुरविलेल्या नसंताना खाजगीरित्या खरेदी करुन वापरात असल्याचेही लेखा परिक्षणाचे वेळी निदर्शणास आलेले आहे.

10) अनुक्रमांक 15 चे कामत बाब क्र.15 मध्ये शववाहीनी न बसवता रुपये 75,000/- बचत करुन सिमेंट रस्ता केल्याचे दिसुन येते. तेव्हा सदर वाढ किंवा घट कामाची पुर्व मंजुरी सादर करणे आवश्यक आहे. परंतु अनुक्रमांक 4 व 15 च्या कामावर रुपये 1,92,466/- वाढ होउनही कार्योत्तर मंजुरी घेतल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणास सादर केले नाहीत.

11) अनुक्रमांक 1,3,4,6,7,9,11,15 ते 29 चे कामाचे करारनामे व कार्यारंभ आदेश लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

**4.201 बांधकामातील विहीत शासकीय कपाती न करणे बाबत.**

**पंचायत समिती वडवणी, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 43 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,01,11,471/- खर्च करण्यात आला आहे. प्रमाणकाचे लेखा तपासणी केली असता बांधकाम देयकातुन विक्रीकरराची रक्क्म कमी कपात केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्य असतांना वरिल देयकातुन कमी कपात केला आहे. रक्क्म रुपये 2,40,428/- इतका कमी कपात केल्यामुळे यास जबाबदार संबंधीताकडुन सदरचा खर्च वसुलपात्र ठरतो. तसेच इतर महिन्यात सुध्दा अशाच प्रकारच्या कमी कपाती केल्याचे नाकारता येत नाही.

**4.202 2515 लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामांतील अनियमितता.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती शिरुर (का) च्या सन 2015-2016 वर्षात 2515 लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे योजने अंतर्गत बांधकाम सोबत वरील विवरणपत्राप्रमाणे कामे करण्यांत आलेली असुन त्यावर 7 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 28,14,770/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 व 152 अन्वये खाली दर्शवले प्रमाणे तीन कामात प्राकलन व मुल्यांकन नोंदवहीची तपासणी केली असता अंदाज पत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक असतांना कामाचे परिमाण कमी अधिक करुन कामे पुर्ण केले आहे.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 व 152 अन्वये अ.क्र.1 अंतर्गत रस्ता सिमेंट रस्ता सदरील कामात बाब क्र.6 मध्ये प्राकलनाप्रमाणे परिमाण 146.8 प्रत्यक्षात 162.28 जादा परिमाण 15.48 दर रुपये 5632.13 जादा अदाई रुपये 87,185/- वसूली करावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 व 152 अन्वये अ.क्र.3 मध्ये सी सी रोड तिंतरवणी (डी सी सी बँक ते भारजकर पटांगण) बाब क्र. 7 मध्ये प्राकलनानुसार दर रुपये 39.60 प्रत्यक्षात अदाई रुपये 42.05 जादा दर अदाई रुपये 2.45 अन्वये परिमाण 5576.81 करिता रक्कम रुपये 13,663/- ची जादा वसूली करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाच्या दृश्य मोजमापाची संपुर्ण तपासणी तसेच दृश्य नसणा-या (hidden measurements) मोजमापाची उपअभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा प्राधिका-याकडुन योग्यवेळी प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, अशी तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शवणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अंदाजपत्रकात सदर बाबीचा समावेश करुन कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची / योजनेची प्रगती नोंदवही नमुना नं.23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नं.39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना नं.40 रस्ते नोंदवही आणि नियम 197 नुसार पुर्ण केलेल्या कामाची नोंदवही नमुना नं.69 ठेवलेल्या नाहीत. ज्यामुळे पुर्ण / अपुर्ण कामाची आढावा घेता आला नाही.

5) पंचायत समितीकडील काही मोजमाप पुस्तिका हया विभागाने पुरविलेल्या नसतांना खाजगीरित्या खरेदी करुन वापरात असल्याचेही लेखापरिक्षणाचे वेळी निर्दशनास आलेले आहे.

**4.203 राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परभणी, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापंई 2014/प्र.क्र.14/पंरा-7, दिनांक 20/01/2014 अन्वये जिल्हा परिषद परभणीला 32 ग्रामपंचायतींसाठी प्रति ग्रामपंचायत 12 लक्ष प्रमाणे एकूण 384 लक्ष रुपये अनुदान मंजूर करण्यात आले होते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक ग्रापंई 2013/प्र.क्र.101/पंरा 7, दिनांक 20/03/2013 (5) प्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयाच्या बांधकामासाठी मुख्य वास्तुशास्त्र, सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांच्याकडील मान्यताप्राप्त नमुना आराखडा वापरणे व त्यानुसार बांधकाम करणे बंधनकारक राहील असे आहे. परंतु लेखापरीक्षणात प्राप्त अभिलेख्यात सदरील आराखडा दिसून आला नाही म्हणून या बाबतीत पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 व प्रशासकीय मंजूरी आदेशातील अटी अन्वये लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशिलाचे प्रमाणपत्र उपअभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतू उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्याचे प्राप्त अभिलेख्या वरुन दिसून आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 02/12/2000 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभियंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

4) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापंई 2014/प्र.क्र.14/पंरा-7, दिनांक 20/01/2014 मधील अट क्र.5 नुसार सदर योजनेंतर्गत ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाचे कार्यारंभ आदेश दिनांक 20/02/2014 पर्यंत

निर्गमित करून सदर बांधकामे डिसेंबर 2014 पूर्वी पूर्ण करणे अट क्र.8 अन्वये बंधनकारक केले होते. असे असताना परिशिष्ट 1 मधील सर्वच कामांच्या बाबतीत वरील अटींची पूर्तता केली नसल्याचे आढळून आले आहे.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 तथा सुधारीत महाराष्ट्र शासन, राजपत्र  दिनांक 04/04/2012 नुसार मुल्यवर्धीत कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराच्या देयकातून करार किमतीच्या 2 टक्के व नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करावयाचा आहे. सदर कामे ग्रामपंचायतीने केलेली आहेत. त्यांची विक्रीकर विभागाकडे नोंदणी झालेली नाही. त्यामुळे मुल्यवर्धीत कर 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु परिशिष्ट 1 मधील काम क्र.3, 4 व 5 च्या बाबतीत, 4 टक्केच मुल्यवर्धीत कर कपात केला आहे. सदरील 3 कामाची खर्चाची एकूण रक्कम रुपये 35,93,641/- असून सदरील रकमेच्या 1 टक्के कमी कपात करण्यात आलेली रक्कम रुपये 35,936/- संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसूल करुन शासन खाती जमा करावी.

6) परिशिष्ट 1 मधील काम क्र.3, 5 व 6 च्या देयकातून FSD कपात करण्यात आली नाही. त्यामुळे defect liability period पूर्ण होण्यापूर्वीच कामाचा दर्जा घसरल्यास संबंधीत कंत्राटदार अथवा काम करणारी यंत्रणा यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी कोणतेही साधन पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध नाही.

7) इमारत व इतर बांधकाम कामगार रोजगार व सेवाशर्ती नियमन अधिनियमन 1996 तसेच इमारत बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंतर्गत बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार एक टक्का उपकर वसूल करुन ती रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे धनाकर्षाने जमा करावयास पाहिजे. परंतु परिशिष्ट 1 मधील काम क्र.6 ची संचीका व मोजमाप पुस्तिकेच्या आधारे सदर कामाची तपासणी केली असता, सदर कामाच्या देयकातून कामगार कल्याण उपकरापोटी कपात करावयाची देयकाच्या 1 टक्के इतकी म्हणजे रुपये 11,959/- कपात केल्याचे आढळून आले नाही. सदर रकमेची वसूली करावी.

### 4.204 DPDC जनसुविधा योजनेअंतर्गत विविध बांधकामातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती जिंतूर, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समीती जिंतूर सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात जनसूविधा योजने अंतर्गत विविध कामांवर ग्रामपंचायत अंतर्गत निवड महिन्यात रुपये 62,99,609/- ची कामे करण्यात आली. सदरील कामाचे संचिका,मापनपुस्तीका व अंदाजपत्रकाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता केलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुट आकाराचा लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशीलाचे प्रमाणपत्र उपअभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतू उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. तथापि काही कामांची अभिलेखे दर्शविली नाही, त्यामुळे अशी कार्यवाही करण्यात आली किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

3) सदरील कामाच्या संचिका तपासली असता सदरील कामासाठी दर पृथ्थकरण करण्यासाठी जिल्हयाचा खदान दर्शक तक्त्या अभावी खात्री करता आलेली नाही. साहित्य जवळच्या अंतरावर व किफायतशीर असल्या बाबत दिलेली लीड बरोबर असल्याचे प्रमाणीत केलेले नाही. त्यामुळे दर पृथ्थकरण बरोबर असल्याची खात्री होऊ शकली नाही.

4) काही काम रुपये 5.00 लक्ष पेक्षा जादा रक्कमेचे असल्यामुळे ई-टेंडर काढुन कामे करण्यात यावे, परंतु सदरील कामे ग्राम पंचायतीने स्वत: केली असुन संचिकेतील बी-1 टेंडर पुर्णत: कोरे असुन काहीच माहीती भरलेली नाही, तसेच अभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्यासुध्दा नाहीत.

5) परिशिष्ठानुसार काही कामांच्या संचिका, अभिलेखे, मोजमापन पुस्तीक लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

6) परिशिष्ठातील अ.क्र.5 प्रमाणक क्रमांक 87/03.2016 रुपये 4,95,079/- स्मशान भुमी संरक्षण भिंत व WBM रस्ता, बोरीचे कामाचे असुन अंदाजपत्रकात रस्त्याचे कामासाठी रुपये 2,51,499/- व संरक्षण भिंतीचे कामासाठी रुपये 2,41,117/- एकूण रुपये 4,92,616/- असुन मोजमाप पुस्तिका क्र.181/19 नुसार रस्त्याचे कामावर रुपये 79,862/- व संरक्षण भिंतीचे कामावर रुपये 4,20,613/- एकूण रुपये 5,00,475/- असा खर्च केला आहे. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार सदरचे काम करण्यात आलेले नाही. जर कामात वाढ वा बदल होत असल्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना अशी मान्यता न घेताच कामे केले असुन खर्च मंजुर केला आहे.

7) परिशिष्ठातील अ.क्र.16 प्र.क्र.511/03.2016, रुपये 2,99,800/- स्मशान भुमी शेड व रस्ता, वाघी धा.चे काम हे माहे 04/2016 मध्ये सुरु करण्यात आले असुन माहे 05/2016 मध्ये पुर्ण केले आहे. काम सुरु करणेपुर्वीच मोजमापन पुस्तिका नोंदवुन माहे मार्च 2016 ला रुपये 2,99,800/- प्रदान केले. याचा खुलासा होऊ शकला नाही.

8) परिशिष्ठातील (1) अ.क्र.17 WBM रोड टाकलखोपाचे कामासाठीची मोजमापन नोंदवही क्र.46/12 वर रॉयल्टीची रक्कम रुपये 48,663/- कपात करण्याची नोंद आहे. परंतु देयकांतून रुपये 18,663/- कपात केली. रुपये 30,000/- रॉयल्टी कमी कपात केली. (2) अ.क्र.19 स्मशान भुमी शेड व रस्ता, साखरतळाचे कामासाठीची मोजमापन नोंदवही क्र.62 पा.क्र.74 वर रॉयल्टीची रक्कम रुपये 44,043/- कपात करण्याची नोंद असुन देयकातून रुपये 9,748/- कपात केली. त्यामुळे रुपये 37,800/- रॉयल्टी कमी कपात केली. (3) अ.क्र.22 स्मशान भुमी शेड व रस्ता, निवळी बु.चे कामासाठीची मोजमाप पुस्तिका क्र.63 वर रॉयल्टी रुपये 42,454/- कपात करण्याची नोंद केली आहे. परंतु या कामाचे रुपये 23,717/- रॉयल्टीपोटी कपात करण्यात आली असुन रुपये 18,737/- रॉयल्टी कमी कपात केली आहे.

**4.205 अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे (दलित वस्ती सुधार योजना) अंतर्गत कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती गंगाखेड अंतर्गत सन 2015-2016 मध्ये पूर्ण झालेली एकूण 12 कामे लेखापरीक्षणाकरीता दर्शविण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) मधील तरतुदीनुसार, संबंधीत कंत्राटदाराकडून देयकाच्या देय रक्कमेच्या 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असताना प्रस्तुत देयकातुन आयकर कपात न केल्यामुळे एकूण रक्कम रुपये 76,841/- संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करावी.

2) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना 10 नुसार योजनेअंतर्गत प्राधान्यक्रम देणेसाठी गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गांवांची प्राधान्य क्रंमाने यादी तयार करून जिल्हा कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तथापि सादर संचीकेत अशी यादी दिसुन आली नाही.

3) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना 11 नुसार जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी कामाची पाहणी करून 100 टक्के काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर 10 टक्के रक्कम ग्रामपंचायतीस प्रदान करावे असे नमुद आहे तथापि अशी पाहणी केल्याबाबतचे अभिलेखे संचीकेत आढळुन आले नाहीत.

4) लेखापरीक्षणात सादर केलेल्या कामांच्या संचिकांची तपासणी केली असता. त्यातील बहुतांश करारनाम्यावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत. त्यामुळे करारनाम्याच्या विधीग्राहयतेबाबत अभिप्राय व्यक्त करता येत नाहीत.तसेच करारनाम्यावर करारनामा केल्याचा दिनांकही नमुद केलेला नाही.

5) प्रशासकीय मंजुरी अट क्र.2 नुसार प्रस्तावित रस्ता / नाली कामाचे अंदाजपत्रक तयार करत असताना दलीत वस्ती मध्ये काम कोणाच्या घरापासुन सुरूवात करावयाची आहे व कोणाच्या घराच्या जवळ संपणार आहे

याचा जायमोक्यावर संबधीत ग्रामसेवक,सरपंच, शाखा अभियंता आणि विस्तार अधिकारी पंचायत यांनी पंचनामा करून तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असताना असे अहवाल संचिकेत नाही.

6) सदर योजनेअंतर्गत मंजुर काम पुर्ण झाल्यावर सदर काम सामाजीक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत करण्यात आले आहे असे वाक्य कोनशिलेवर कोरून ती बसवण्यात यावी व त्यावर कंत्राटदारांचे नाव व का पुर्ण केल्याचा दिनांक नमुद करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

7) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2013/प्र.क्र.85/अजाक-1, दिनांक 01/08/2013 प्रमाणे दलित वस्ती घोषीत केले बाबत व घोषीत केले दलित वस्त्यांना स्वतंत्र संकेतांक देऊन यादी तयार करणे बाबतचे अभिलेखे संचीकेत दिसून आले नाहीत. तसेच उक्त शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे 5 वर्षासाठी बृहत आराखडा तयार केल्याचे दिसून आले नाही.

8) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 03/03/2015 मधील अट क्र. 2 नुसार गटविकास अधिका-यांनी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी 2001 प्रमाणे अनुसुचीत जातीची लोकसंख्या व प्रस्तावित काम यापुर्वी कोणत्याही योजनेतुन घेण्यात आले नाही. याची खात्री करून 25 टक्के निधी वितरीत करणे आवश्यक असताना अशी खात्री केल्याचे अहवाल संचिकेत नाही.

9) सात कामांमध्ये रॉयल्टीची रक्कम रुपये 30,802/- कमी कपात केली आहे.

**4.206 लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या बांधकामातील अनियमिततेबबात.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती गंगाखेड सन 2015-2016 च्या लेखा परीक्षणात विविध ग्रामपंचायती अंतर्गत निवड महिन्यातील व मोठ्या रकमेची अशी एकूण रुपये 54,96,410/- ची एकूण 10 कामे लोकप्रतिंनिधींनी सुचविल्यानुसार करण्यात आली. सदरील कामाचे संचिकेची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता केलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नविन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामाच्या ठिकाणी 5 X 4 फुट आकाराचा लोखंडी फलक लावून त्यावर ऑईलपेंटने कामाचा तपशिल लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर तपशीलाचे प्रमाणपत्र उपअभियंता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देयकासोबत जोडावयाचे आहे. परंतू उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभियंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

3) प्रशासकीय मान्यतेतील अटींनुसार, काम सुरू होण्यापूर्वी, काम सुरू असताना व काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या ठिकाणचे फोटो काढणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) मधील तरतुदीनुसार, संबंधीत कंत्राटदाराकडून देयकाच्या देय रक्कमेच्या 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असताना प्रस्तुत देयकातुन आयकर कपात न केल्यामुळे एकूण रक्कम रुपये 95,822/- संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करावी.

5) सदर योजने अंतर्गत ग्रामीण भागातील रास्ते,गटारे व इतर मूलभूत सुविधा यांच्यासाठीच निधी प्राप्त झालेला असताना ग्रामपंचायत, इसाद यांनी सदर योजनेतून वडार समाजासाठी सामाजिक सभागृहाचे बांधकाम करून अनियमितता केली आहे.

6) ग्रामपंचायत उंडेगाव येथील सीसी रस्ता व नाली बांधकामाचे अंदाजपत्रकीय मूल्य रुपये 6,92,919/- इतके होते. चिंतामणी कन्स्ट्रक्शन यांनी सदर कामाची अंदाजपत्रकीय मूल्यापेक्षा 10 टक्के कमी दराची (रुपये 6,23,558/-) ई-निविदा सादर केली होती. ती न्यूनतम असल्याने त्यांची निविदा प्रस्तुत समितीने मान्य करून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र पंचायत समितीने कुठलीही निरीक्षण टिपणी अथवा

सुधारित अंदाजपत्रक तयार न करता त्यांना सदर कामापोटी रुपये 6,45,883/- अदा केले आहेत. सदर अतिप्रदानाची रक्कम रुपये 22,325/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

7) प्रस्तुत संचिकेत जिल्ह्याचा खदान दर्शक नकाशा आढळून न आल्यामुळे बांधकाम साहित्य quarry chart मध्ये दाखवलेल्या अंतरावरून आणण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर सदर साहित्य उपलब्ध होते, याबाबत अभिप्राय देता येत नाही.

अंदाजपत्रकातील rate analysis मध्ये कॉंक्रिटचा दर निश्चित करताना सिमेंट, मेटल व वाळूच्या मूळ दरात lead charges मिळवून अंतिम दर निश्चित केले आहेत. तथापि लेखापरीक्षणास जिल्ह्याचा खदान दर्शक तक्ता पाहावयास न मिळाल्यामुळे दिलेले दर बरोबरच असल्याचे अभिप्राय देता येत नाहीत.

**4.207 अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे (दलित वस्ती सुधार योजना) अंतर्गत कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सेलु, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती सेलू, जिल्हा परभणी अंतर्गत सन 2015-2016 मध्ये एकूण 16 कामे रुपये 14,49,990/- एवढया रकमेची अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे (दलित वस्ती सुधार योजना) ची कामे लेखापरीक्षणाकरिता दर्शविण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2013/प्र.क्र.85/अजाक-1, दिनांक 01/08/2013 प्रमाणे दलित वस्ती घोषीत केले बाबत व घोषीत केले दलित वस्त्यांना स्वतंत्र संकेतांक देऊन यादी तयार करणे बाबतचे अभीलेखे संचीकेत दिसून आले नाहीत.तसेच उक्त शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे 5 वर्षासाठी बृहत आराखडा तयार केल्याचे दिसून आले नाही.

2) गटविकास अधिका-यांनी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी 2001 प्रमाणे अनुसुचीत जातीची लोकसंख्या व प्रस्तावित काम यापुर्वी कोणत्याही योजनेतुन घेण्यात आले नाही. याची खात्री करून 25 टक्के निधी वितरीत करणे आवश्यक असताना अशी खात्री केल्याचे अहवाल संचिकेत नाही.

3) प्रशासकीय मंजुरी नुसार प्रस्तावित रस्ता/नाली कामाचे अंदाजपत्रक तयार करत असताना दलीत वस्ती मध्ये काम कोणाच्या घरापासुन सुरूवात करावयाची आहे व कोणाच्या घराच्या जवळ संपणार आहे याचा संबधीत ग्रामसेवक, सरपंच, शाखा अभियंता आणि विस्तार अधिकारी पंचायत यांनी पंचनामा करून तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असताना असे अहवाल संचिकेत नाही.

4) प्रशासकीय मंजूरी आदेशातील अट क्र. 7 प्रमाणे सदर योजनेअंतर्गत मंजुर काम पुर्ण झाल्यावर सदर काम सामाजीक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत करण्यात आले आहे. असे वाक्य कोणशिलेवर कोरून ती बसवण्यात यावी व त्यावर कंत्राटदारांचे नाव व काम पुर्ण केल्याचा दिनांक नमुद करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

5) प्रशासकीय मान्यता अट क्रं.17 (अ) नुसार तिसरा हप्ता 10 टक्के देण्यापुर्वी समाज कल्याण अधिकारी यांच्या कामाचा तपासणी अहवाल व कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमता नोंदवहीमध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र संचिकेत नाही असे अहवाल नसताना अंतीम प्रदान केलेले आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयाची प्रत्येक नोंद मोजमापपुस्तीकेत घेतांना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आदेश क्रमाक, करारनामा क्रमांक व दिनांक, बांधकाम प्रत्यक्ष पुर्ण करण्याचा दिनांक, मोजणीचा दिनांक इत्यादी तपशील सुरुवातीला नोंदविणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तीकावरील कामाची प्रथम मोजमापे नोंदविताना सदरील माहिती नोंदविली नाही.

7) इमारत व इतर बांधकाम कामगार रोजगार व सेवाशर्ती नियमन अधीनियमन 1996 तसेच इमारत बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंतर्गत बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार एक टक्का उपकर वसूल करुन ती रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे धनाकर्षाने जमा केल्याच्या पावत्या व इतर

कपाती रॉयल्ती कपात, कामगार विमा, व्हॅट कपात इत्यादी नियमानुसार केल्याबाबत व ते योग्य लेखाशिर्षात केल्याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शविल्या नाहीत.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 169 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 02/12/2000 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभीयंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

**4.208 जनसुविधा अंतर्गत बांधकामाचे प्रदानातील अनियमिता व जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती पुर्णाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात 25151443 इतर ग्रामविकास कार्यक्रम 198 ग्रामपंचायतीना नागरी सुविधा पुरवणे49-(1) जनसुविधा लेखाशिर्षांतर्गत सादर केलेल्या माहितीप्रमाणे 6 कामांसाठी 6 प्रमाणकान्वये एकुण रक्कम रुपये 26,69,589/- प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीडी-2005/प्र.क्र.324/इमारती दिनांक 03/03/2006 व सुधारीत महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 प्रमाणे दिनांक 01/04/2005 नंतर कार्यारंभ आदेश निर्गमीत केलेल्या कामाच्या बाबतीत अनोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातुन 5 टक्के दराने मुल्यवर्धीत कर कपात करणे आवश्यक असताना उपरोक्त कामांच्या देयकातुन एकुण रक्कम रुपये 20,846/- कपात न केल्यामुळे संबंधीतांस जादा प्रदान झाले आहे ते संबंधिताकडुन वसुल करुन योग्य शिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

2) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) मधील तरतुदीनुसार देयकाच्या देय रक्कमेच्या 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असताना उपरोक्त कामांच्या देयकातुन आयकर कपात न केल्यामुळे संबंधीतास रुपये 43,435/- चे जादा प्रदान झाले आहे. ते संबंधीताकडुन वसुल करुन आयकरखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक 2009/प्र.क्र.123/पंरा-7, दिनांक 30/10/2009 अन्वये कामाच्या एकूण मूल्याच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करुन सदरील रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे धनाकर्षाने पाठविणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त कामांबाबत अशी कार्यवाही झाली नसल्यामुळे संबंधीतास रुपये 30,781/-चे जादा प्रदान झाले आहे ते वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

4) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि-1801/सिआर/जिप/संकिर्ण, दिनांक 30/07/2008 अन्वये विमा रक्कम रुपये 3,686/- कमी कपात केल्यामुळे संबंधीतास जादा प्रदान झाले आहे ते संबंधीताकडुन वसुल करुन विमा संचालनायाकडे पाठविणे आवश्यक आहे.

5) लेखापरीक्षणात सादर केलेल्या कामांच्या संचिकांची तपासणी केली असता त्यातील बहुतांश करारनाम्यावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत. त्यामुळे करारनाम्याच्या विधीग्राहयतेबाबत खात्री पटत नाही. तसेच करारनाम्यावर करारनामा केल्याचा दिनांकही नमुद केलेला नाही केवळ कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक म्हणुन बॉंड खरेदी करुन केवळ उपचारापोटी करारनामा केल्याचे दर्शवले आहे.

6) लेखापरीक्षणात उपरोक्त कामांची मोजमापपुस्तीका तपासली असता त्यात रॉयल्टीची चुकीची परीगणना केल्यामुळे सबंधीतास एकुण रुपये 35,418/- चे जादा प्रदान झाले आहे. ते संबंधीताकडुन वसुल करुन रॉयल्टी खाती भरणा करणे आवश्यक आहे.

7) अ.क्र.01 व 04 च्या कामांच्या सादर अंदाजपत्रक व मोजमापपुस्तीकेची तपासणी केली असता अंदाजपत्रकाप्रमाणे अनुक्रमे 285 व 304 मीटर रस्ता करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात मोजमापपुस्तीकेप्रमाणे अनुक्रमे 250 व 130 मीटर रस्ता केला आहे. तथापि सदर बदलाबात सक्षम प्राधीकारी यांची मंजुरी घेतलेली नाही.

8) अ.क्र.06 चे कामाची मोजमापपुस्तीका तपासली असता बाब क्र.14 मउ मुरुम पुरवठाची सविस्तर मोजमापे न घेता सरळ पृष्ठ क्र.12 वर सरळ गोषवा-यात 34.48 घनमी मोजमापे नोंदवली तसेच बाब क्र.16 प्रमाणे पसरवणेचीही सविस्तर मोजमापे न नोंदवता सरळ गोषवा-यात नोंदवली तथापि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 172 ज्या बाबी मोजल्या नसतील त्या बाबीचे पैसे देण्यात येणार नाहीत असे नमुद आहे सबब सदरील बाबींसाठी प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये 16,177/- संबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

9) अ.क्र.06 चे कामाची मोजमापपुस्तीका तपासली असता पृष्ठ क्र.11 वर बाब क्र.12 साठी अंदाजपत्रकात रुपये 843=56 पै. प्रती घनमी दर प्रस्तावित असताना मोजमापपुस्तीकेच्या गोषवा-यात रुपये 873=86पै. प्रती घनमी दराने प्रदान केल्यामुळे 114 घनमी साठी रुपये 3,454/- चे जादा प्रदान झाले आहे ते संबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

10) अ.क्र.06 चे कामाची मोजमापपुस्तीका तपासली असता पृष्ठ क्र.12 वर बाब क्र.15 ची खडी पसरवणेची मोजमापे 114 + 82.80 = 196.80 येत असताना 207 नोंदवली त्यामुळे जादा परिमाण 10.2 साठी रुपये 30=30पै. दराने एकुण रुपये 309/- चे जादा प्रदान झाले आहे ते संबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.209 50 टक्के वाढीव स्थानिक उपकरातून करण्यात आलेल्या बांधकामांतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती मानवत सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात 50 टक्के वाढीव उपकरातून ग्रामपंचायत अंतर्गत रुपये 2,96,028/- चे एकूण 01 काम लेखापरीक्षणास दर्शविण्यात आले. सदरील कामाचे संचिकेची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितेबाबत अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 नुसार पंचायत समिती स्तरावर देण्यांत आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसून आला नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये रस्त्याची कामे देताना त्या कामासाठीची अवजारे किंवा यंत्रे असतील तरच अशी कामे ग्राम पंचायतींना देण्यात यावीत. तथापि पंचायत समितीने अशी खात्री न करताच ग्रामपंचायतींना कामे दिल्याचे दिसून आले आहे.

3) सदरील कामाच्या संचिका तपासली असता संचिकेत जिल्हयाचा खदान दर्शक नकाशा आढळून आला नाही. त्यामुळे साहित्य सर्वात जवळच्या खाणीतूनच आणले किंवा कसे याबाबत खात्री करता येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 02/12/2000 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभियंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 तथा सुधारीत महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 प्रमाणे नुसार मुल्यवर्धीत कर अधीनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराच्या देयकातून करार किमतीच्या 2 टक्के व नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करावयाचा आहे. सदर कामे ग्रामपंचायतीने केलेली आहेत. त्यांची विक्रीकर विभागाकडे नोंदणी झालेली नाही. त्यामुळे मुल्यवर्धीत कर 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. परंतु परिशिष्ट 2 मधील कामाच्या बाबतीत 4 टक्केच मुल्यवर्धीत कर कपात केला आहे. सदरील एका कामाची खर्चाची

एकूण रक्कम रुपये 2,96,028/- असून सदरील रकमेच्या 1 टक्के कमी कपात करण्यात आलेली रक्कम रुपये 2,960/- संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसूल करुन शासन खाती जमा करावी.

6) सदर कामाच्या बाबतीत रॉयल्टी रुपये 5,673/- ने कमी कपात केलेली आहे. संबंधीत ग्रामपंचायतीकडून ती वसूल करून शासनखाती योग्य लेखाशीर्षाखाली भरणा करावी.

**4.210 50 टक्के वाढीव स्थानिक उपकरातून करण्यात आलेल्या बांधकामांतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती मानवत सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात 50 टक्के वाढीव उपकरातून ग्रामपंचायत अंतर्गत रुपये 8,39,695/- ची एकूण 03 कामे लेखापरीक्षणास दर्शविण्यात आली. सदरील कामाचे संचिकेची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता केलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 नुसार पंचायत समिती स्तरावर देण्यांत आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मंजूरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसून आला नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये रस्त्याची कामे देताना त्या कामासाठीची अवजारे किंवा यंत्रे असतील तरच अशी कामे ग्राम पंचायतींना देण्यात यावीत. तथापि पंचायत समितीने अशी खात्री न करताच ग्रामपंचायतींना कामे दिल्याचे दिसून आले आहे.

3) सदरील कामाच्या संचिका तपासली असता संचिकेत जिल्हयाचा खदान दर्शक नकाशा आढळून आला नाही. त्यामुळे साहित्य सर्वात जवळच्या खाणीतूनच आणले किंवा कसे याबाबत अभिप्राय व्यक्त करता येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 169 तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 02/12/2000 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तीकेतील नोंदी घेताना तारखा नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अभीयंत्याच्या कामाची नोंदणी केल्या बाबत दिनांकित स्वाक्षरी नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 तथा सुधारीत महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 प्रमाणे नुसार मुल्यवर्धीत कर अधीनियमा खाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराच्या देयकातून करार किमतीच्या 2 टक्के व नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करावयाचा आहे. सदर कामे ग्रामपंचायतीने केलेली आहेत. त्यांची विक्रीकर विभागाकडे नोंदणी झालेली नाही. त्यामुळे मुल्यवर्धीत कर 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे.परंतु परिशिष्ट 1 मधील सर्वच कामांच्या बाबतीत 4 टक्केच मुल्यवर्धीत कर कपात केला आहे. सदरील 03 कामाची खर्चाची एकूण रक्कम रुपये 8,39,695/- असून सदरील रकमेच्या 1 टक्के कमी कपात करण्यात आलेली रक्कम रुपये 8,397/- संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसूल करुन शासन खाती जमा करावी.

6) परिशिष्ट क्रमांक 1 मधील काम क्रमांक 1 च्या बाबतीत कामगार विम्याची रक्कम एकूण मूल्याच्या 0.5 टक्के प्रमाणे कपात करणे आवश्यक असताना ती कपात केली नाही. सबब रुपये 1,213/- संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसूल करू शासनखाती योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करावेत.

**4.211 जिल्हा परिषद उपकर अंतर्गत विविध कामाचे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कळमनुरी, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,04,201/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 नूसार ग्रामपंचायतीचे बळकटीकरण, ग्रामपंचायतीनां आर्थिकदृष्टया सक्षम करण्याच्या उद्देशाने जिल्हा

परिषद व पंचायत समितीची कामे विना निवीदा सरळ ग्रामपंचायतीनां देण्यात येतात. तसेच शासन निर्णयातील तरतूदी अ.क्र.03 नूसार गावाशी निगडीत असलेली कामे उदा.शाळा खोली दूरूस्ती इ. प्रकारची कामे ग्रामपंचायतीने करावी असे नमूद आहे. परंतु उक्त कामे सरळ ग्रामपंचायतीनां न देता शालेय व्यवस्थापन समितीस दिली आहेत. त्यामूळे शासन आदेशाचे पालन झालेले नाही. दिलेली प्रशासकीय मान्यता नियमबाहय ठरते.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रासयो 2007/प्र.क्र.01/यो.09, दिनांक 08/05/2007 नूसार सहकारी मजूर संस्था, सूशिक्षीत बेरोजगार अभियंता, कंत्राटदार यांना काम वाटप करणे बाबत समिती व त्याचे प्रमाण ठरलेले आहे. शालेय व्यवस्थापन समिती ही सहकारी मजूर संस्था, सूशिक्षीत बेरोजगार अभियंता नाही. शालेय व्यवस्थापन समिती ही कंत्राटदार असून कंत्राटदारास लागू असलेली कार्यकंत्राट प्रणालीमार्फत कंत्राट देय ठरते. कंत्राटदारास लागू स्पर्धात्मक दरानूसार कार्यकंत्राट शालेय व्यवस्थापन समितीला दिलेले नाही. त्यामूळे दिलेले कंत्राट नियमबाहय ठरते आणि जिल्हा परिषदेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नूसार कंत्राटदाराकडून कामाचे 4 ते 5 टक्के सूरक्षा अनामत रक्कम राखून ठेवणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समितीने सूरक्षा अनामत रक्कम राखून ठेवली नाही.

4) केंद्र शासन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) प्रमाणे कामाचे देयकातून परिशिष्ट क्रमांक 04 मध्ये दर्शविले प्रमाणे आयकर रककम रूपये 22,137/- कपात न करता प्रदान केले आहे.

5) ग्रामपंचायतीला रक्कमा प्रदान करतांना देयकातून महाराष्ट्र शासन, विक्रीकर कायदा 1999 चे कलम 14 व महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22, दिनांक एप्रील 2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासुन मूल्यवर्धीत कर कपातीचा दर 4 टक्के ऐवजी 5 टक्के करण्यात आला आहे. नुसार स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडुन अनोंदणीकृत असल्याने बांधकामाचे कंत्राट रक्कमेच्या 5 टक्के प्रमाणे मूल्यवर्धीत कर कपात करावयास पाहिजे. परंतु मूल्यवर्धीत कर कपात केलेला एकत्रीत केला आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे बांधकामाचे मोजमापे कार्यकारी अभियंता यांची देयाकाची 5 टक्के तपासणी नंतर प्रदान करणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता यांचे 5 टक्केचे तपासणी शिवाय कामाचे देयकाचे प्रदान होत आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 190 प्रमाणे कामपूर्णत्वाचे प्रमाणपत्र नमूना नं. 65 मधिल विहीत नमून्यात नोंद करून सदर काम संबंधीत ग्रामपंचायतीना हस्तांतर केलेचे नमूद नाही. पूर्तता दर्शवावी. काम सूरू होणे पूर्वी व काम पूर्ण झालेनंतर कामाचे फोटो घेणे आवश्यक आहे. परंतु काही संचिकेत फोटो घेतलेले नाही. पूर्तता दर्शवावी.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-1087/सीआ-94/इमारत-02, दिनांक 14/06/1989 व विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक विसा/नियो 1/प्र.क्र.1525/कावी 460, दिनांक 27/07/2010 Defect Liability Peeriod (दोष निवारण कालावधी ) एक वर्षाचा आहे. दोष निवारण कालावधी मध्ये काम खराब झाल्यास दुरुस्ती करन्याची जबाबदारी संबधीत यंत्रनेची राहील. ही बाब फलकावर स्पष्ट नमुद करावी. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पं.रा.8, दिनांक 15/11/2011 मधील परिच्छेद 5 नुसार कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ व्हावीत यासाठी सध्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कार्यन्वीत असलेल्या राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांच्या अधिपत्या खालील पॅनेलवरील राज्य गुणवत्ता नियंत्रक (SQM) यांच्याकडुन संबधीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामाची तपासणी करुन घ्यावी. यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांच्याकडुन आवश्यकते नुसार यादी घ्यावी व त्या प्रमाणे कामाचे वाटप करावे. सदर यंत्रणेकडुन कामाच्या विविध टप्प्यावर कामाची तपासणी करण्यात येईल. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यानी अचाणकपणे या पैकी कोणत्याही कामाची तपासणी करावी. वरील प्रमाणे ठरलेल्या टप्प्यानुसार या यंत्रणेकडुन

गुणवत्ता तपासणी होऊन कामाच्या दर्जाबाबत प्रमाणीत केल्याशिवाय बिले अदा करता येणार नाही. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

10) करारनाम्यावर दिनांक नाही. त्यामुळे केलेला करारनामा काम सुरु करणेपूर्वीच केल्याची खात्री पटत नाही. तसेच करारनाम्यावर साक्षीदारांच्या स्वाक्ष-या नाहीत.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 169 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमापाच्या तारखा मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्या नाहीत.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 02/12/2000 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंत्याने काम पुर्ण झाल्यावर मोजमाप पुस्तिकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

### 4.212 ओआरडीपी योजनेअंतर्गत विविधी कामाचे खर्चातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 14,63,361/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम करणा-या ठेकेदारा बरोबर करण्यात येणा-या करारनाम्याची बॉण्डपेपर कोरे असून त्यावर करारनामा करण्यात आलेला नाही. पुरवठा आदेश संचिकेत पडून आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 1 म ब नुसार उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के कामाची वारंवार तपासणी केलेली नसतांना रक्कम प्रदान केलेली आहे.

3) संचिकेती बी-1 निविदा कोरी असुन त्यावर संबंधिताच्या स्वाक्ष-या नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 21 प्रमाणे देयकावर सरपंच ग्रामपंचायत यांचे मुद्रांक तिकिटावर पोंच घेतलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 190 प्रमाणे काम पुर्णत्वाचे नमुना नं.65 मधील विहित नमुन्यात नोंद करून सदर कामासबंधी ग्रामपंचायतीला हस्तांतरण केल्याचे नमूद नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 नुसार कामासंबंधी फलक त्या स्थळावर लावल्यानंतरच अंतिम देयक मंजूर करावयाचे असतांना अशी कार्यवाही झाली नाही. फलकावर योजना, कामाचे नांव व किंमत सुरू दिनांक नमुद करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1099/प्र.क्र.59/35, दिनांक 30/01/2000 नुसार बांधकाम साहित्या वापरण्यापूर्वी गुणनियंत्रण विभागाकडून साहित्याची चाचणी वारंवार करून घेणे आवश्यक असतांना अहवाल काम पूर्ण झाल्यावर घेतल्याचे दिसून आले.

8) काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो काढणे व योजनेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या मालमत्तेची नोंद घेण्यात यावी. या अटीची पुर्तता केलेली नाही.

9) अ.क्र.3,4 वरील कामाबाबत ताबा पावती व उपयोगिता प्रमाणपत्र घेतलेली नाही.

### 4.213 ग्रामपंचायत कळका येथे सिमेंट कांक्रीट रस्ता बांधकामातील अनियमितता.

**पंचायत समिती कंधार, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 174(अ) प्रमाणे कामाच्या मोजमापाच्या नोंदी एकाच मोजमाप पुस्तिकात घेणे आवश्यक आहे. परंतु मोजमाप पुस्तिका क्रमांक 4372 व 6030 दर्शविली नाही. त्यामुळे मुल्यांकनाची खात्री होऊ शकली नाही.

2) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक 04/04/2012 अन्वये बांधकामाच्या देयकातून मूल्यवर्धित कराची 5 टक्के प्रमाणे सुधारीत दराने रक्कम रुपये 50,000/- वसुली न

करता रुपये 5,000/- वसूल केलेली आहे. कमी वसुली रक्कम रुपये 45,000/- वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षाखाली भरणा करून अनुपालन दर्शवावे.

3) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) प्रमाणे बांधकामाच्या देयकातून सुधारीत दराने (2 टक्के) ने आयकर रक्कम रुपये 20,000/- वसूल करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये 2,340/- कपात केली आहे. म्हणजे कमी वसुली रुपये 17,660/- वसूल करून शासन खाती योग्य लेखाशीर्षा खाली भरणा करून अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमा 1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी मूल्याच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही. सदर कामाच्या देयकातून कमी कपात विमा रक्कम रुपये 9,000/- कपात करून विमा संचालनालयाकडे पाठविण्याची कार्यवाही व्हावी.

5) कामगार कल्याण उपकर अधिनियम 1996 चे कलम 3 (1) व उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/का-735, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करून कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही. सदर कामाच्या देयकातून कमी कपात कामगार उपकर रक्कम रुपये 9,000/- वसूल करून शासन खाती भरणा करून पूर्तता दर्शवावी.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार केलेल्या कामाचे बिल तयार करण्यास येईल तेव्हा तपशिलवार मोजणी असलेल्या प्रत्येक पृष्ठ लाल शाईने कर्णरेषा काढुन खोदून टाकावे तथापि अशी कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना नंबर 69 मध्ये पूर्ण झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही दर्शविली नाही. दर्शवून पूर्तता करावी.

**4.214 दलित वस्ती सुधार योजना सन 2015-2016**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रमाई नगर सि सि रस्ता ग्रामपचंयात अंबाडी चे बांधकामासाठी रक्कम रुपये 2,47,126/- खर्च नोंदविला असून झालेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा.04/5999, दिनांक 08/01/2007 नुसार काम चालु असतानाच कामासाठी वापरण्यात येणा-या साहीत्याच्या दर्जाबाबत चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि सदर बांधकाम दिनांक 19/03/2016 रोजी पुर्ण झाले व गुण नियंत्रक अधिकारी कार्यालयाला कामाच्या साहीत्याचा दिनांक 15/03/2016 रोजी चाचणीसाठी पुरवठा करण्यात आला आहे. तद्नंतर क्वालीटी कंट्रोल ने दिनांक 19/03/2016 रोजी चाचणी अहवाल सादर केला आहे. म्हणजेच चाचणी अहवाल येण्या पुर्वीच काम पुर्ण झाले आहे. त्यामुळे कामामध्ये दर्जेदार साहीत्याचा वापर केला किंवा कसे या बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होतो.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.58/08, दिनांक 20/05/1999 अन्वये कामाच्या ठिकाणी तपशिल दर्शविणारे फलक लावणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 4 परिशिष्ट-2 भाग-1 मधील प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समिती / स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 148 प्रमाणे करारनाम्यात काम पुर्ण करण्याचा कालावधी विहीत केले असतो. तथापि करारनाम्यात कामाच्या बाबतीत कामाचा कालावधी नमुद केलेला नाही. व विहीत वेळेत काम पुर्ण केले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रूपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये 5 टक्के कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. तथपि, कार्यकारी अभियंता यांनी अशी तपासणी केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शसन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/02/2000 नुसार एका कामासाठी एक मोजमाप पुस्तीका ठेवण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामाच्या नोंदी घेण्यात येऊ नये. मोजमाप पुस्तीकामधील प्रत्येक नोंदी दिनांकीत आसाव्यात परंतु सर्वच कामाच्या बाबतीत अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) अंदाजपत्रकीय तरतुदी पेक्षा मुल्यांकनात वाढ झाल्याचे आढळुन येते. सदर बाबनिहाय वाढीबाबत शाखा अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांना तुलनात्मक तपशील (विशेष) बाबनिहाय वाढीबाबत सादर करून मजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यावाही झालेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/ वित्त-9 (33), दिनांक 09/02/2009 अन्वये ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या हदीतील कामे विनानिवीदा ग्रामपंचायतीना करण्यासाठी देणे, अन्यथा ती कामे त्यांनी स्वत: करावी, अन्यथा शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार जाहीर निवीदा प्रकीया अवलंबुन विहीत पध्दतीने साहीत्य खरेदी करणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

**4.215 अंगणवाडी बांधकाम गुजरी कामातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती बिलोली, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती बिलोलीने अंगणवाडी बांधकाम गुजरी कामापोटी सरपंच ग्रामपंचायत गुजरी तालुका बिलोली यांना 2 प्रमाणकान्वये एकुण रुपये 6,00,000/- प्रदानाचा खर्च नोंदला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील बांधकामाचे मंजुर एस्टीमेट प्रमाणे बाब क्रमांक 14 नुसार प्रोव्हायडींग सेकंड क्लास ब्रीक मशीनरी एकुण परीमाण 23.24 चौरस मिटर करावयाचे आहे. परंतु सदरील बाबीतील काम केले नाही. बाब 13 नुसार 13.11 क्युबीक मीटरवॉल बांधकाम करणे आवश्यक असतांना एकुण 16.88 क्युबीक मिटरचे काम केले आहे. एकुण 3.77 क्युबीक मिटरचे जादा काम केले आहे. मंजुर एस्टीमेटपेक्षा एकुण 3.77 क्युबीक मिटरचे जादा काम केल्यामुळे प्रती क्युबीक मिटर रुपये 4784.54 प्रमाणे एकुण रुपये 18,072/- चे प्रदान केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118,120 व 124 प्रमाणे मंजुर एस्टीमेंटपेक्षा कमी / जादा कामास सक्षम मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी मंजुरी घेतल्याचे दिसुन येत नाही. सक्षम मान्यता शिवाय केलेल्या बदलावरील खर्च लेखापरीक्षणास अमान्य करण्यात येतो. जादा खर्चाची रक्कम वसुल करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार नमुना नं.39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही ठेवुन आवश्यक त्या नोंदी घेतल्या नाहीत. त्याप्रमाणे नियम 197 प्रमाणे पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी घेतल्याबाबत नमुना 69 दर्शविली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहीत्य 1049/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार सिमेंट, मुरुम, खडी इत्यादीचा वापर करण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेकडुन चाचणी करुन व सदरचे प्रमाणपत्र प्राप्त करुन नंतरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी 1087/सीआर 94/ईमा 2, दिनांक 14/06/1989 नुसार कामाच्या जागी विहीत प्रपत्रात माहीती दर्शविणारे फलक बसविण्यात यावेत या माहिती

फलकामध्ये कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश, कामाचा खर्च काम पुर्ण करण्याचा दिनांक, दोष निवारण कालावधी या सर्वाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. कामाच्या संचिकेत तसे केल्याबदलचे फोटो नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परीषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 168 (क) प्रमाणे कार्यकारी अभियंता 5 टक्के व उपअभियंता यांनी कामाच्या 100 टक्के प्रमाणे तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाच्या प्रत्येक टप्याप्रमाणे तपासणी केली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 नुसार कोणत्याही परीस्थीतीत एकाच मोजमाप नोंदवहीत वेगवेगळया कामाच्या नोंदी घेण्यात येवु नयेत असे असतांना प्रस्तुत कामावर वापरण्यात आलेल्या मोजमाप नोंदवहीत वेगवेगळया कामाच्या नोंदी घेतल्या आहेत.

7) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार मोजमाप पुस्तीकेवर नोंदविलेली सर्व कामे लाल शाईने कर्णरेषा काढुन न चुकता रक्कम प्रदान केल्यानंतर अधोरेखीत करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयाची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेतांना पुर्ण नांव कामाची जागा करारनामाचा क्रमांक व दिनांक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश क्रमांक, कार्यपुर्तीचा दिनांक इत्यादी तपशील नमुद करणे आवश्यक असतांना अशी नोंदी / तपशील नमुद केला नाही.

### 4.216 समाजमंदीर बांधकाम तोरणा कामातील अनियमितता.

**पंचायत समिती बिलोली, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती बिलोलीने दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत समाज मंदीर बांधकामापोटी ग्रामपंचायत तोरणा यांना खालील प्रमाणकाव्दारे रुपये 4,50,000/- प्रदानाचा खर्च नोंदला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशात काम पुर्ण करावयाचा कालावधी नमुद केला नाही.

2) करारनामा गटविकास अधीकारी यांनी सांक्षाकीत केला नाही. करारनामा मुद्रांक पेपरवर गटविकास अधिकारी यांची सही नाही. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 प्रमाणे करारनामा करुन घेणे आवश्यक आहे.

3) सदरील कामास उपअभियंता बांधकाम बिलोली यांनी क्रमांक 137, दिनांक 15/01/2015 नुसार रुपये 5,00,000/- तांत्रिक मंजुर दिली आहे. मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे कॉस्ट ऑफ वर्क रुपये 4,96,698/- असतांना रुपये 5,60,504/- (देय रुपये 5,00,000/-) काम करण्यात आलेले आहे. सक्षम मान्यते शिवाय कामात बदल करुन जादा करण्याचे प्रयोजन खुलासा केला नाही. तसेच मंजुर अंदाजपत्रकीय परीमाणापेक्षा जादा कामे केली आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118, 120 व 124 प्रमाणे केलेल्या बदलास सक्षम प्राधीकारी यांची मान्यता घेतलेली नाही. मंजुरी घेवुन दर्शवावी. अन्यथा जादा कामावर झालेल्या खर्चाची जबाबदारी निश्चीत करुन जादा कामावरील खर्चाची रक्कम वसुल करुन रक्कम शासन खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे. तसेच सदरील कामाची बाब क्रमांक 10 नुसार अंदाजपत्रकानुसार 1.34 मेट्रीक टन गजाळी पुरवठा करणे पोटी प्रती मे.टन रुपये 65226.84 प्रमाणे रुपये 87,403/- चे प्रदान करणे आवश्यक होते. मोजमाप पुस्तकाप्रमाणे एकुण 2.39 मेट्रीक टन गजाळी पोटी दर रुपये 65226.84 ऐवजी पार्ट रेट रुपये 35,000/- प्रती मेट्रीक पोटी रुपये 83,650/- प्रदान केले आहेत. जादा गजाळी पुरवटा व त्यापोटी पार्ट रेट प्रमाणे प्रदान करण्याचा खुलासा व्हावा. एकुण 1.05 मेट्रीक टन जादा वापर गजाळीवर झालेल्या खर्चाची रक्कम दिलेल्या पार्ट रेटनुसार रुपये 35,000/- प्रमाणे रुपये 36,750/- ची वसुली करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार नमुना नं. 39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही ठेवुन आवश्यक त्या नोंदी घेतल्या नाहीत. त्याप्रमाणे नियम 197 प्रमाणे पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी घेतल्याबाबत नमुना 69 दर्शविली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहीत्य 1049/ प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार सिमेंट, मुरुम, खडी इत्यादीचा वापर करण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेकडुन चाचणी करुन व सदरचे प्रमाणपत्र प्राप्त करुन नंतरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

6) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी 1087/सीआर94/ईमा2, दिनांक 14/06/1989 नुसार कामाच्या जागी विहीत प्रपत्रात माहीती दर्शविणारे फलक बसविण्यात यावेत या माहिती फलकामध्ये कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश, कामाचा खर्च काम पुर्ण करण्याचा दिनांक, दोष निवारण कालावधी या सर्वाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. कामाच्या संचिकेत तसे केल्याबदलचे फोटो नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परीषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 168 (क) प्रमाणे कार्यकारी अभियंता 5 टक्के व उपअभियंता यांनी कामाच्या 100 टक्के प्रमाणे तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाच्या प्रत्येक टप्याप्रमाणे तपासणी केली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयाची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेतांना पुर्ण नांव कामाची जागा करारनामाचा क्रमांक व दिनांक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश क्रमांक कार्यपुर्तीचा दिनांक इत्यादी तपशील नमुद करणे आवश्यक असतांना अशी नोंदी / तपशिल नमुद केला नाही.

**4.217 अंगणवाडी कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती मुखेड, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती मुखेड बांधकाम विभाग सन 2015-16 मध्ये DPDC अनुदानातुन एकुण 6 अंगणवाडी बांधकामे पुर्ण केलेली असून रक्कम रुपये 20,73,761/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाडी बांधकाम ग्रामपंचायत मांजरी, चोंडी, शिरुर डबडे (फत्तु तांडा) या कामाच्या प्राक्कलन व प्रत्यक्ष झालेल्या कामाची तपासणी केली असता बाबनिहाय काम न केल्याचे दिसुन आले.

ग्रामपंचायतीच्या अंगणवाडी बांधकामात प्राक्कलनात दर्शवलेल्या बाबीचा प्रत्यक्ष केलेल्या कामात समावेश दिसुन येत नाही. त्यामुळे सदरील काम गुणवत्ता पुर्ण झाल्याचे दिसुन येत नाही. उपरोक्त काम न केलेल्या बाबीची रक्कम रुपये 13,243/- प्रत्येक ग्रामपंचायतीकडुन वसुल करुन एकुण रुपये 39,729/- शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

2) अंगणवाडी बांधकाम शिरुर डबडे यांनी केलेल्या कामाची तपासणी केली असता प्रत्यक्ष कामामध्ये प्राक्कलनात दर्शवलेली बाब क्रमांक 21, 22, 29 व 30 या कामाचा समावेश नाही. त्यामुळे सदर बाबी वरील रक्कम रुपये 9,056/- वसुल पात्र आहे.

3) अंगणवाडी बांधकाम भाटापुर प.दे. या कामाची तपासणी केली असता प्राक्कलनामध्ये दर्शवलेल्या बाबी 28, 29 व 30 याबाबीचा समावेश प्रत्यक्ष कामात नाही त्यामुळे प्राकलनात याबाबीवर दर्शवलेला खर्च रुपये 4,672/- संबंधीत ग्रामपंचायतीकडून वसुल करण्यात यावा.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक CAT/1087/CR94/इ.मा.-2, दिनांक 14/06/1989 व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक जा.क्र.20101 वि.शा./नि.यो-1/प्र.क्र.1525/का.वि.460, दिनांक 27/06/2010 मधील मुद्दा क्र.11-3 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविनारे फ़लक बसवण्यात यावे. व या माहिती फलकमध्ये कंत्राटदाराचे नाव कामाचे नाव, कार्यारंभ आदेश, कामाचा खर्च, काम पुर्ण झाल्याचा दिनांक, दोष निवारण कालावधी या बाबीचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामात नाम फ़लक बसवले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) व नियम 87 नुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.65/35, दिनांक 30/06/2000

नुसार साहित्य वापरण्या पुर्वी शासकीय प्रयोग शाळेतुन साहित्य तपासणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजमाप विषयी प्रत्येक नोंद नोंदविताना बांधकामाचे पुर्ण नाव, बांधकामाची जागा, करार नाम्याचा क्रमांक व दिनांक, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक, कार्यपुर्ती दिनांक यानुसार तपशिल नोंदविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामाच्या मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता असे केल्याचे दिसुन आले नाही.

**4.218 दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत बांधकामातील अनयिमितताबाबत.**

**पंचायत समिती भोकर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती भोकरचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत झालेल्या बांधकामात रक्कम रूपये 90,000/- खर्च करण्यात आला आहे याबाबत खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 व सार्वजनिक बांधकामे विषयक परिपत्रक क्रमांक जी.आर.34/का-4/5162, दिनांक 02/08/1987 व महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक सिमेंट-1099/प्र.क्र.156/35, दिनांक 30/06/2000 अन्वये कामावर साहीत्य / सीमेंट वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन साहीत्य वापरणे आवश्यक होते.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार कंत्राटदाराने दिलेल्या प्रत्येक बांधकामासाठी मुद्रांकीत कागदावर करण्यात येवुन त्याचे पालन करण्यात यईल आणी कंत्राटदाराने कामात कसुर केल्यास करारनामा रद्द करुन काम दुस-या कंत्राटदारामार्फत करुन घेण्याची शास्ती राखुन ठेवण्यात येईल अटी व शर्तीचा भंग केलयास करावयाच्या शास्तीचा उल्लेख करारनाम्यात असेल परंतु नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच करारनामा स्विकृत केल्याबाबत गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे करारनामा झाल्याचे स्पष्ट होत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार मोजमाप पुस्तीकेवर नोंदविलेली सर्व कामे लाल शाईने कर्णरेषा काढुन न चुकता रक्कम प्रदान केल्यानंतर अधोरेखीत करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये प्रत्येक पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नं. 69 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तसेच नियम 67(1) नुसार नमुना नं.23 मध्ये बांधकामाची प्रगती नोंदवही ठेवली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एस. 1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नवीन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधीक रक्कमेच्या दर्शक फलक कामाच्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयाची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेतांना बांधकामाचे पुर्ण नाव कामाची जागा करारनाम्याचा क्रमांक व दिनांक, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, कंत्राटाचे नाव कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक व कार्यपुर्तीचा दिनांक इत्यादीचा तपशील नोंदविणे आवश्यक आहे. तथापि मोजमापे नोंदवितांना सदरील माहिती नोंदविली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये प्रत्येक प्रदानाची पोच घेणे आवश्यक आहे. सदरील देयकावर प्रदानाची पोच घेतली नाही. तरी पोच दर्शवुन अनुपालन दर्शवावे.

**4.219 तेरावा वित्त आयोग पंचायत समिती स्तर अंतर्गत बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती भोकर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती भोकरचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात तेरावा वित्त आयोगाअंतर्गत 10 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,15,778/- खर्च झालेला असून बांधकामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 04 खालील परिशिष्ट-02 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तवरावर प्रशासकीय, तांत्रिक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 106 (1) (अ) नुसार योग्यरीत्या तपशिलवार संकल्पचित्र आणी अंदाज मंजुर करुन निधीचे नियत वाटप केलेले असेल आणी सक्षम प्राधीका-याने बांधकाम सुरु करण्याबदल आदेश दिले असतील त्याखेरीज कोणतेही बांधकाम सुरु केले जाणार नाही. अशी तरतुद असतांना गटविकास अधिकारी पंचायत समिती भोकरने उपरोक्त यातील अनुक्रमांक 8, 9 च्या कामाचे कार्यारंभ आदेश व कामाची मुदत दिलेली नसतांना केलेली कार्यवाही नियमबाहय आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहीत्य 1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहीत्य कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोग शाळेकडुन चाचणी करुन घेणे आवश्यक असतांना कामपुर्ण झाल्यानंतरचे चाचणी अहवाल संचिकेत आहे. त्यामुळे योग्य गुणवतेची खात्री होत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार एका कामासाठी एकच मोजमाप वही ठेवण्यात यावी असे निर्देश असतांना वेगवेगळया कामाचे मुल्यांकन एकाच मोजमाप वहीत नोंदविलेले आहे. याबाबत खुलासा करावा.

5) गटविकास अधिकारी यांचे सक्षमतेचे प्रमाणपत्र न घेता ग्रामपंचायतीना कामे मंजुर केलेली आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37 व 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं. 39 व 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. सदर नोंदी घेतल्याचे दर्शवुन अनुपालन सादर करावे.

**4.220 दलित वस्ती सुधार योजनेतून केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती लोहा बांधकाम विभाग सन 2015-2016 मध्ये दलित वस्ती सुधार योजनेतुन रक्कम रुपये 52,75,263/- कामावर खर्च नोंदवलेला आहे.

1) सदर कामाच्या संचिकेची तपासणी केली असता संचिकेमध्ये गटविकास अधिकारी यांनी दलित व सुधार वस्तीत असलेली अनुसुचित जातींची लोकसंख्या व पुर्वी दिलेले लाभ यांचे माहितीचे प्रमाणपत्र दिसुन आले नाही.

2) प्रशासकीय मान्यता अट क्र.2 नुसार मंजुर कामांना 90 टक्के रक्कम अदा केलेबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी (जिल्हा परिषद नांदेड) कामाची पाहणी करुन 100 टक्के काम पुर्ण झाल्याचे प्रमाण पत्र दिल्यानंतर उर्वरीत 10 टक्के रक्कम ग्रामपंचायतीस अदा करावीत व काम पुर्ण झाल्यानंतर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे मंजुर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे कामपुर्ण झाल्यावर गटविकास अधिकारी संबंधीत पंचायत समिती यांचे उपयोगिता प्रमाणपत्र उपअभियंता, बांधकाम विभाग यांचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व मंजुर आराखड्या प्रमाणे पुर्ण झाल्याबाबत ग्रामपंचायतीचे ठराव आणि निर्माण झालेली मालमत्ता ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीवर नोंद घेवुन गटविकास अधिकारी यांनी कामाचे अंतिम मुल्यांकन प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र तसेच मंजुर झालेले काम दलित वस्तीमध्ये करण्यात आले असल्याचे उपअभियंता व गटविकास अधिकारी

यांचे उपयोगिता प्रमाणपत्रासह सादर करावे व यासह अंतिम 10 टक्के निधीची मागणी जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जिल्हा परिषद नांदेड) यांच्याकडे करावी. परंतु उपरोक्त पुर्ण केलेल्या कामाची तपासणी केली असता यानुसार कार्यवाही दिसुन आली नाही.

3) प्रशासकीय मंजुरीतील अट क्रमांक 13 नुसार प्रस्तावित ठिकाणी इतर कोणत्याही शासकीय योजनेमधुन काम झाले नसल्याची खात्री करुनच गटविकास अधिकारी यांनी काम सुरु करण्याचे आदेश द्यावेत. उपरोक्त पुर्ण केलेल्या कामाच्या संचिकेची तपासणी केली असता यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक CAT/1087/CR94/इ.मा.2, दिनांक 14/06/1989 व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक जा.क्र.20101 वि.शा./नि.यो-1/प्र.क्र.1525/का.वि.460, दिनांक 27/06/2010 मधील मुद्दा क्र.11-3 नुसार प्रत्यक्ष कामा जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविनारे फ़लक बसवण्यात यावे. परंतु सदर कामात नाम फ़लक बसवले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) व नियम 87 नुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.65/35, दिनांक 30/06/2000 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोग शाळेतुन साहित्य तपासणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजमाप विषयी प्रत्येक नोंद नोंदविताना बांधकामाचे पुर्ण नाव, बांधकामाची जागा, करार नाम्याचा क्रमांक व दिनांक, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक, कार्यपुर्ती दिनांक यानुसार तपशिल नोंदविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामाच्या मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता असे केल्याचे दिसुन आले नाही.

7) प्रशासकीय मंजुरीतील अट क्रमांक 6 नुसार काम सुरु करण्या पुर्वी व काम पुर्ण झाल्यानंतर त्या परिसराची छाया चित्रे घेवुन त्याच्या प्रती संचालक समाजकल्याण पुणे यांना पाठविणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

8) उपरोक्त ग्रामपंचायत वाळकी बु. प्रमाणक क्रमांक 101, दिनांक 24/08/2015 अन्वये रुपये 50,000/- अग्रिम देण्यात आले होते. तसेच दिनांक 15/02/2016 अन्वये रुपये 1,33,757/- असे एकुण रुपये 1,83,757/- प्रदान करण्यात आले असुन सदर कामाचे मुल्यांकन तांत्रिक अधिकारी यांनी रुपये 1,33,757/- दर्शवले आहे. म्हणजेच मुल्यांकना पेक्षा खर्च ज्यादा आहे. तसेच ग्रामपंचायत खडक मांजरी यांना रुपये 2,49,753/- प्रदान केले असुन सदर ग्रामपंचायत कामाचे मुल्यांकन तांत्रिक अधिकारी यांनी रुपये 2,47,531/- दर्शवले आहे. म्हणजेच मुल्यांकनापेक्षा रुपये 2,222/- ज्यादा खर्च नोंदवलेला आहे. तरी आता उपरोक्त ग्रामपंचायतीकडून अनुक्रमे रुपयं 50,000/- व रुपये 2,222/- असे एकुण रुपये 52,222/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

**4.221 पंचायत समिती उपकरातुन 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदीतील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती मुदखेड, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,02,860/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती मुदखेडचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकाचे आनुषंगिक संचिकेची तपासणी केली असता लाभार्थीची निवड यादी, त्यांचे मागणी अर्ज तसेच 10 टक्के लाभार्थी हिस्सा इ. बाबी संचिकेत आढळुन आल्या नाहीत. लाभार्थीची निवडयादी करण्यापुर्वीच शिलाईमशीन पुरवठा आदेश दिल्याचे दिसुन येते.

2) सदरील खरेदी मेट्रो ट्रेडींग कंपनी कडुन 49 शिलाई मशीन सिंगर मशिन आय.एस.आय. मार्कची दरपत्रके मागवुन खरेदी केलेली आहे. लेखापरीक्षण कालावधी पर्यंत एकुण 20 शिलाई मशीन शिल्लक आहेत. सदरील मशीनरी लाभार्थ्यांना वाटप केल्या नाहीत. तसेच लाभार्थीची निवड झाल्या बाबत संचिकेत कोणत्याही बाबी दर्शविण्यात आल्या नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार खरेदी केलेल्या साहित्याचे गुणवत्ता व दर्जाबाबत विभाग प्रमुखाचे चाचणी प्रमाणपत्र घेतल्याचे दिसुन आले नाही.

**4.222 सी.सी.रस्ता पवनाळा बांधकाम खर्चातील नियमबाह्य वजाती करुन केलेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती माहूर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती माहुरचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात सी.सी.रस्ता बांधकाम पवनाळा रक्कम रुपये 3,25,000/- खर्चातील नियमबाह्यता बाबत खालिलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची संचिका व मोजमाप पुस्तिका व देयकाची पडताळणी केली असता प्रत्यक्षात रॉयल्टी मेतल रुपये 12,054/-, सोलिंग रुपये 11,331/- व रेती रुपये 5,997/- असे एकुण रुपये 29,382/- होते व मोजमाप पुस्तिकेत तशा प्रकारची नोंद घेण्यात आलेली आहे. व चलन असल्याने अभियंता यानी रुपये 5,997/- कमी करुन रॉयल्टी रुपये 23,385/- दर्शविलेली आहे. लेखाविभागाने सदर रुपये 23,385/- रक्कमेतुन रुपये 22,000/- वजा करुन रुपये 1,385/- देयकातुन कपात केली आहे.

2) देयका सोबत स्वामित्वधनाची चलन दिनांक 17/02/2016 रुपये 11,000/- व दिनांक 12/02/2016 रुपये 11,000/- ची पावत्या असुन सदर रक्कमा 10+10=20 ब्रास रेतीच्या आहेत. सदर पावत्या रेतीची रॉयल्टी भरल्याची असतांना व मोजमाप पुस्तिकेत अभियंत्याने नमुद रेतीची रक्कम वजा केली असतांना देयकाचे प्रदान करतांना रुपये 22,000/- वजा करण्याचा प्रश्नच नसतांना तसे केल्याने कंत्राटदारास जादा प्रदान झालेले आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37 (2) अनुसार अभिलेख्याची व्यवस्थितरित्या तपासणी होत नसल्याचे दिसुन येते.

सदर जादा प्रदानाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येवुन रक्कम दंडात्मक व्याजासह वसुल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**4.223 सी.सी.रस्ता शेकापूर बांधकाम खर्चातील नियमबाह्य वजाती करुन केलेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती माहूर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती माहुरचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात सी.सी.रस्ता बांधकाम शेकापुर खर्चातील नियमबाह्यता बाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालिलप्रमाणे आहेत.

1) सदर कामाची संचिका व मोजमाप पुस्तिका व देयकाची पडताळणी केली असता मोजमाप पुस्तिकेत तपासणी अहवाल अप्राप्त असल्याने वजा रुपये 14,353/- करावी अशा प्रकारची नोंद घेण्यात आलेली आहे. असे असतांना रुपये 14,353/- कपात न केल्याने संबंधीतास जादा प्रदान झालेले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37 (2) अनुसार अभिलेख्याची व्यवस्थितरित्या तपासणी होत नसल्याचे दिसुन येते.

सदर जादा प्रदानाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येवुन रक्कम दंडात्मक व्याजासह वसुल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**4.224 अंगणवाडी बांधकामाचे कामातील अनियमितता.**

**पंचायत समिती नायगांव, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 24,03,142/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 अन्वये उपरोक्त बांधकामाच्या देयकातून मूल्यवर्धित कराची रक्कम 5 टक्के प्रमाणे सुधारीत दराने वसूल करणे आवश्यक होते. तथापि उपरोक्त बांधकामाच्या देयकातून मूल्यवर्धित कराची रक्कम 4 टक्के प्रमाणे वसूल केलेली आहे. तेव्हा कमी कपात रक्कम रुपये 36,470/- वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षाखाली भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 व सार्वजनिक बांधकाम विषयक परिपत्रक क्रमांक जी.आर.34/का-4/5162, दिनांक 02/08/1987 व महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक सिमेट 1099/प्र.क्र.156/35, दिनांक 30/06/2000 अन्वये कामावर साहित्य / सिमेंट वापरण्यांपुर्वी प्रयोगशाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन साहित्य वापरणे आवश्यक होते,अ.क्र.1ते 7 च्या कामासाठी चाचणी अहवाल घेतलेला नाही. त्यामुळे काम योग्य दर्जाचे झाल्याची खात्री होत नाही.

3) उपरोक्त कामाचे कार्यारंभ आदेश लेखापरीक्षणास दर्शविले नाहीत.

4) ग्रामपंचायत घुंगराळा येथे अंगणवाडी बांधकाम या कामाची मोजमाप पुस्तिका तपासली असता item no.9 साठी qty.3.81*rate 5148.68=19616 प्रदान करणे आवश्यक असताना रक्कम रु.25634/- प्रदान केले आहे. अतिप्रदान रक्कम रुपये 6,018/-संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

5) शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एस-1099/प्र.क्र.-99/08, दिनाक 20/05/1998 नुसार कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा तपशिलवार खर्चासह नोंदीचा फलक लावणे आवश्यक असतांना तसे केल्याचे दिसून आले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार केलेल्या कामाचे बिल तयार करण्यास येईल, तेव्हा तपशिलवार मोजणी असलेल्या प्रत्येक पृष्ठ लाल शाईने कर्णरेषा काढुन खोदून टाकावे तथापि अशी कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 160(1) अन्वये मोजमाप पुस्तिका मध्ये कामाच्या नोंदी व मूल्यांकनाच्या नोंदी झाल्यावर दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना नं.69 मध्ये पूर्ण झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही दर्शविली नाही. दर्शवून पूर्तता करावी.

**4.225 दलित वस्ती योजनेतुन विविध केलेल्या बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती हिमायतनगर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पचांयत समिती हिमायतनगरने सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये दलित वस्ती सुधार योजना अतंर्गत बाधंकामावर खर्च नोंदविला आहे. सदर कामावरील खर्चाचे लेखापरीक्षण केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/प्र.क्र. 680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव (अ.क्रं.1 ते 17) लेखापरीक्षणात सादर केला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.472/ वित्त-09(33), दिनांक 09/02/2009 अन्वये तांत्रिक व आर्थिकदृष्टया सक्षम असलेल्या व रुपये 50,000/- पर्यत उत्पन्न असणा-या या ग्रामंपचातीना रुपये 10 लाख किमंतीपर्यत काम देता येतात. परंतु ग्रामंपचायतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आले नाही. तसेच गटविकास अधिकारी यांनी ग्रामंपचायत सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र (अ.क्रं.1 ते 17) संचिकेत आढळुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 व सार्वजनिक बाधंकामे विषयक परिपत्रक क्रमांक जी.आर.341 का-4/5162, दिनांक 02/08/1987 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट 1099/प्र.क्र.156/35, दिनांक 30/06/2000 अन्वये कामावर साहित्य / सिंमेट वापरण्यापूर्वी प्रयोग शाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन साहित्य वापरणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता अ.क्रं.1,25,67,8,13,14,15,17 चा अहवाल काम पुर्ण झाल्यावर घेतला आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार कंत्राटदाराने दिलेल्या प्रत्येक बाधंकामासाठी मुद्राकिंत कागदावर करारनामा करण्यात येवुन त्याचे पालन करण्यात येईल आणी

कंत्राटदाराने कामात कसुर केल्यास करारनामा रद करून दुस-यास देता येईल. कामाच्या अटी व शर्तीचा भंग केल्यास काय कार्यवाही करावी असे स्पष्ट नमुद आहे. पंरतु अ.क्रं.4,7,8,9,10,11,16व 17 च्या करारावर गटविकास अधिकारी यांच्या सह्या नसताना देखील करारनामा कसा केला.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलंसधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस1099/प्र.क्रं.54/08, दिनांक 20/05/1999 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत नवीन व दुरुस्तीच्यार रुपये 20,000/- व त्यापेक्षा अधिक रक्कमेच्या कामासाठी दर्शक फलक कामाच्या ठिकाणी लावणे आवश्यक आहे. परंतु 8 कामाच्या ठिकाणी दर्शक फलक लावलेला नाही.

6) अ.क्रं.06 चे अंक गणीतीय चुका करुन कंत्राटदारास जादा रक्कम रुपये 24,576/- प्रदान केलेली रक्कम रुपये 24,576/- वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

अ.क्रं. 07 पाईप खोदकामाचे अंकगणीतीय चुका करुन जादा प्रदान केलेली रक्कम रुपये 668/- वसुल करुनपुर्तता करावी. रॉयल्टी रक्कम रुपये 14,082/- असताना रुपये 12,142/- कपात केली कमी कपात रुपये 1,940/- वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

8) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार मोजमाप पुस्तीकेवर नोंदविलेली सर्व कामे लाल शाईने कर्णरेषा काढुन न चुकता रक्कम प्रदान केल्यांनतर अधोरेखीत करणे आवश्यक आहे, परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

9) अदांजपत्रकात कामाच्या सर्वात जवळच्या अंतरावरील खदानीवरुन साहित्य वापरण्यात येत असुन दर सुचीतील दर व शासनमान्य खदानीच कामासाठी वापर करण्यात येत आहे असे प्रमाणपत्र शाखा अभिंयता, उपअभिंयता व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र अदांजपत्रकासोबत दिसुन आले नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे निश्म 168 (क) प्रमाणे कार्यकारी अभिंयता / उपअभिंयता यांनी कामाच्या 5 टक्के प्रमाणे तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कामाच्या प्रत्येक टप्याप्रमाणे कार्यकारी अभिंयता / उपअभिंयता यानी तपासणी केली नाही.

11) अ.क्रं.2 Pro and lay.situ cement m10 1 3 6 17.30 दर्शविलेली व देयकात घेतलेली 19.20 जादा 1.90 दर रुपये 3996.86 रुपये 7,594/- जादा काम केले सदरील जादा कामास नियम 118 प्रमाणे सक्षम अधिका-याची पुर्व परवानगी न घेताच काम केले.

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पचांयत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153 प्रमाणे अदांजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा खर्च करता येत नाही.

**4.226 लोकप्रतिनिधींनी सूचविलेली कामे योजनेंतर्गत केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,79,373/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 11/05/2015 चे महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग 4 अ अंक 30(2) अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियम) नियम 2013 मध्ये सूधारणा केल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्र गौणखनिज (विकास व विनियम) 2015 मधील अनुसूची 1 नुसार स्वामित्व धनाचे दर दाखल करण्यात आले असून सदर राजपत्राच्या दिनांकापासून हे दर लागू आहेत. पुढील कामाच्या तांत्रिक मान्यतेच्या दिनांकाची तपासणी केली असता असे आढळले की, सदर राजपत्रच्या दिनांकाच्या नंतर तांत्रिक मान्यता देताना उपरोक्त दाखल स्वामित्व धनाचे प्रमाणीत दर गृहीत धरण्यात आले नसून जुन्या दराप्रमाणेच स्वामित्व धनास प्राक्कलनात मान्यता देण्यात आली आहे. या कामात स्वामित्व धन रुपये 1,48,154/- असताना जुन्या दराने गणना केल्याने रुपये 74,077/- शासनास कमी भरणा झाली आहे. या प्रकरणी संबंधीतावर योग्य ती कारवाई करुन पूर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 197 नुसार नमुना क्रमांक 69 पूर्ण कामाची नोदंवही ठेवून त्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु सदर नोंदवही लेखापरिक्षणास दर्शविली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 168 अन्वये रुपये 1,00,000/- च्या वरील बांधकामाची उपअभियंता यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(C) नुसार कंत्राटदाराचा टॅन / पॅन क्रमांक नसल्यास 20 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतने केलेल्या कामाचे देयकातुन 20 टक्के ऐवजी 2 टक्के आयकर कपात केलेला आहे. त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. कमी कपात रक्कम रुपये 4,05,296/- वसुल करुन शासनखाती भरणा करावी व इतर कामामधुन या प्रकारे कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

6) ग्रामपंचायत जागजी येथील कामासंबंधी अभिलेखे दर्शविले नाहीत.

**4.227 राष्ट्रीय ग्रामस्वराज्य योजनेंतर्गत केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** उस्मानाबाद पंचायत समिती, उस्मानाबादचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात राष्ट्रीय ग्रामस्वराज्य योजनेंतर्गत केलेल्या कामांवर रक्कम रूपये 3,19,373/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा नामफल्क बसविणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे ठिकाणी नामफलक बसविलेला नाही.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(C) नुसार कंत्राटदाराचा टॅन / पॅन क्रमांक नसल्यास 20 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामाचे देयकातुन 2 टक्के आयकर कपात केलेला आहे. कमी आयकर कपात रक्कम रुपये 1,72,899/- वसुल करुन आयकर खाती भरणा करावी.

**4.228 दलित वस्ती सुधार योजनांतर्गत रद्द केलेल्या बांधकामातील अनियमिततेबात.**

**पंचायत समिती उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** उस्मानाबाद पंचायत समिती, उस्मानाबादचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात दलित वस्ती सूधार योजना मार्च 2016 मासिक प्रगती अहवाल दिनांक 03/06/2016 तसेच अभिलेखे तपासले असता सदर योजनेवर रक्कम रूपये 7,79,759/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दलित वस्ती सूधार योजनांतर्गत रुपये 7,79,759/- प्रदान केले आहेत. तथापि कामे न करता कामे अर्धवट ठेवणे, अपहार, वसूली कार्यवाही प्रस्तावित केल्याने रुपये 7,79,759/- वसूल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक होते. तथापि, पंचायत समिती तर्फे अशी कार्यवाही झाली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता अधिनियम 1961 चे कलम 98 (2 घ) नुसार गटविकास अधिकारी यांनी सर्व कामाचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही न झाल्याने उपरोक्त 11 कामे अपूर्ण अवस्थेत राहील्याने शासन निधीचे नुकसान झाले आहे.

**4.229 मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मंजूरी न दिलेल्या कामावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 9,96,474/- खर्च केलेला आहे. पंचायत समिती कळंब सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात हावरगाव येथील मागासवर्गीय स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधकाम या कामाऐवजी मुस्लीम स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त प्रमाणकान्वये नोंदविलेल्या खर्चावर पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी मौजे हावरगाव येथील मागासवर्गीय स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधकामास जनसुविधा योजनेअंतर्गत आदेश क्रमांक 160/2014, दिनांक 21/08/2014 अन्वये मंजूरी प्रदान केलेली असताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 151 व 152 (2) च्या तरतूदी अव्हेरून मौजे हावरगाव येथील मुस्लीम स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधकाम हे काम केलेले आहे. जे नियमबाह्य आहे. याबाबत जबाबदारी निश्चीत होणे आवश्यक आहे.

2) कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद उस्मानाबादव्दारा तांत्रिक मंजूरी आदेश क्रमांक 4/2014, दिनांक 30/08/2014 अन्वये मौजे हावरगाव येथील मागासवर्गीय स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधकाम व मौजे हावरगाव येथील मुस्लीम स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधकाम या दोन्ही कामासाठी एकाच आदेशाव्दारे तांत्रिक मंजूरी कशी दिली ? प्रशाकीय मान्यता प्रदान केलेल्या कामाऐवजी दूसरे कामास तांत्रिक मंजूरी प्रदान केलेली आहे.

3) कामाचे अंतीम देयकातून आयकर रुपये 5,454/- व मुल्यावर्धीत कर रुपये 13,634/- कपात करून शासनखाती जमा केलेला नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 अन्वये उप कार्यकारी अभियंता यांची कामासाठी 100 टक्के तपासणी केलेली नाही.